

जानेवारी २०२०/पाने ६०/किंमत ₹१०

# लोकराज्य

## शेतकऱ्यांना लाखमोलाचा दिलासा




## महात्मा जोतिराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजना

**शेतकऱ्यांना चिंतामुक्त करणारी : सहज, सोपी आणि पारदर्शक कर्जमुक्ती योजना**



सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

# शेतकऱ्यांना लाखमोलाचा दिलासा



महात्मा जोतिराव फुले
शेतकरी कर्जमुक्ती योजना

## २ लाखांपर्यंत कर्ज घेतलेल्या शेतकऱ्यांचे पीक कर्ज माफ

- अर्ज करण्याची आवश्यकता नाही
- थकबाकी भरण्याची अट नाही

## शेतकऱ्यांना मिळणारा लाभ

दि. १ एप्रिल २०१५ ते ३१ मार्च २०१९ या कालावधीत घेतलेले व ३० सप्टेंबर २०१९ रोजी थकीत असलेले अल्पमुदत पीक कर्ज आणि अल्पमुदत पीक पुनर्गठित कर्ज होणार माफ!

प्रति शेतकरी रु.२ लाखांपर्यंतची कर्जमुक्तीची रक्कम राज्य शासन शेतकऱ्यांच्या कर्ज खात्यात थेट भरणार!

जमीनधारणेचे क्षेत्र विचारात न घेता कर्जमुक्तीचा दिला जाणार लाभ!

राष्ट्रीयकृत बँका, व्यापारी बँका, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका, ग्रामीण बँका, विविध कार्यकारी सहकारी संस्था यांच्याकडून शेतकऱ्यांनी घेतलेले पीक कर्ज माफ!

शेतकऱ्यांनी कृपया आपला आधार क्रमांक बँकेच्या कर्जखात्याशी संलग्न करून त्याचे प्रमाणीकरण करावे.

**शेतकऱ्यांना चिंतामुक्त करणारी, सहज, सोपी आणि पारदर्शक कर्जमुक्ती योजना**





सहकार विभाग, महाराष्ट्र शासन
माहिती व जनसंपर्क महासंचालनालय-महाराष्ट्र शासन

श्री. उद्धव ठाकरे
मा. मुख्यमंत्री

श्री. अजित पवार
मा. उपमुख्यमंत्री

श्री. बाळासाहेब थोरात
मा. मंत्री

# अंतरंग



## कर्जमुक्ती.... ६

विश्वासदर्शक ठरावाला सामोरे जाताना विधानसभेत शेतकऱ्यांच्या पाठीशी शासन ठामपणे उभे राहील हे सांगणाऱ्या मुख्यमंत्र्यांनी आपल्या पहिल्याच अधिवेशनात दोन लाखांपर्यंत पीक कर्जमुक्तीची घोषणा करून हे शासन शेतकरी हिताचे निर्णय घेणारे असल्याचे स्पष्ट केले.

## घाबरायचे नाही, आश्वस्त राहा... २६


राज्याच्या विविध प्रश्नांबाबत विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहात आत्मविश्वास आणि सकारात्मकतेने उत्तरे राज्य शासनातर्फे देण्यात आली. लोकाभिमुख शासन देतानाच प्रगतीची नवी शिखरे गाठणारे राज्य निर्माण करून, देशातील इतर राज्यांपुढे आदर्श निर्माण करण्याचा मानसही मुख्यमंत्र्यांनी व्यक्त केला.


| | |
|---|---|
| कर्जमुक्ती.... | ६ |
| आपले नवे मंत्री | ९ |
| राज्यमंत्री | २२ |
| घाबरायचे नाही, आश्वस्त राहा... | २६ |
| एकमेवाद्वितीय | ३४ |
| दृष्टिक्षेप | ३६-३७ |
| मंत्रिमंडळात ठरले... | ३८ |
| महाराष्ट्राचा मानबिंदू : शिवनेरी | ४० |
| सुलभ आणि जलद | ४४ |
| सुरक्षित बँकिंग | ४६ |
| अशा आहेत स्पर्धा परीक्षा | ४९ |
| सरळसेवेची तयारी | ५३ |
| चांगला उद्देश आणि प्रयत्नांची जोड | ५४ |
| फुलपाखरांचे बारसे | ५८ |




## एकमेवाद्वितीय ३४

शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे महाराष्ट्रातील एक उत्तुंग अष्टपैलू व्यक्तिमत्त्व. देशातील अनेक प्रश्नांवर त्यांनी घेतलेली रोखठोक भूमिका केवळ महाराष्ट्रातीलच नव्हे, तर देशातील अनेक नेत्यांना धडकी भरवणारी होती. शिवसैनिक किंवा अनेक लोकांसाठी ते मोटिव्हेटर होते.



## महाराष्ट्राचा मानबिंदू : शिवनेरी ४०



गडकिल्ल्यांची भ्रमंती हा मराठी माणसाचा केवळ सुटीत वेळ घालवण्यासाठीचा उद्योग नाही, त्याकडे तो पर्यटन म्हणूनही पाहत नाही. गडावर जाणे ही त्याच्यासाठी अत्यंत अभिमानाची बाब असते, शिवछत्रपतींना त्याने केलेले ते वंदन असते.

वर्ष ७१ वे | अंक ७ | जानेवारी २०२०

**माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,**
**महाराष्ट्र शासन**

लोकराज्य

- मुख्य संपादक — ब्रिजेश सिंह
- प्रबंध संपादक — अजय अंबेकर
- संपादक — सुरेश वांदिले
- कार्यकारी संपादक — अनिल आलूरकर
- सहसंपादक — मनीषा पिंगळे
- उपसंपादक — प्रवीण कुलकर्णी, गजानन पाटील, राजाराम देवकर

- वितरण अधिकारी — मंगेश वरकड
- वितरण साहाय्य — अश्विनी पुजारी
- साहाय्य — भारती वाघ

- मुखपृष्ठ — सीमा रनाळकर, सुशिम कांबळे

- मांडणी, सजावट — शैलेश कदम
- मुद्रितशोधन — उमा नाबर
- मुद्रण — मे. मुद्रण प्रिंट एन पॅक प्रा.लि., कोपरखैरणे, नवी मुंबई.

माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,
नवीन प्रशासन भवन, १७वा मजला,
मंत्रालयासमोर, हुतात्मा राजगुरू चौक,
मुंबई-४०० ०३२.
Email : lokrajya.dgipr@maharashtra.gov.in

वर्गणीदार व तक्रार निवारण: ९३७२२३०३२०
(सकाळी १०.३० ते ५.३० कार्यालयीन कामकाजा दिवशी)


**ई – लोकराज्य** http://dgipr.maharashtra.gov.in

या अंकात प्रकाशित लेखातील मतांशी
शासन सहमतच असेल असे नाही.

# व्वा! छान


## लोकराज्यचे दुर्मीळ अंक बघून मुख्यमंत्री श्री. उद्धव ठाकरे उत्स्फूर्ततेने उद्गारले, ‘व्वा! छान’

गेली ७१ वर्षे लोकराज्य महाराष्ट्राच्या जनमाणसावर आपला प्रभाव टिकवून आहे. लोकराज्यने वेळोवेळी प्रकाशित केलेले अनेक विशेषांक केवळ संग्राह्यच नाही, तर ते संदर्भ म्हणूनही सिद्ध ठरले आहेत. लोकराज्यच्या या अंकांबाबत वेळोवेळी लोकांकडून मागणी होत असते. हे अंक लोकांना बघता यावेत, यासाठी नागपूरच्या हिवाळी अधिवेशनाच्यावेळी त्याचे विशेषत्वाने प्रदर्शन भरवले जाते. या वर्षीही नागपूर विधानभवन परिसरात ‘लोकराज्य’ मासिकाच्या दुर्मीळ अंकाचे प्रदर्शन भरवण्यात आले होते. या प्रदर्शनाला मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी भेट दिली. त्यांनी काही अंक चाळले. हे अंक पाहून त्यांनी समाधान व्यक्त केले. माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाने या प्रदर्शनाचे केलेले आयोजन कौतुकास्पद असल्याचे त्यांनी सांगितले. ‘लोकराज्य’ने वेळोवेळी प्रकाशित केलेले हे विशेषांक संग्रही ठेवण्यासारखे असून नव्या पिढीने त्याचे अवलोकन करावे, असे प्रशंसोद्गार मुख्यमंत्र्यांनी काढले. या वेळी खासदार संजय राऊत उपस्थित होते.



**लोकराज्यच्या दुर्मीळ अंकाचे अवलोकन करताना मुख्यमंत्री उद्धव ठाकरे, सोबत खासदार संजय राऊत.**

# स्थापना लोक-राज्याची



**जयंत पाटील**
वित्त व नियोजन मंत्री

'लोकराज्य'च्या मार्फत महाराष्ट्राच्या तमाम जनतेला नववर्षाच्या शुभेच्छा देताना, मला अतिशय आनंद होत आहे. महाविकास आघाडीच्या रूपाने महाराष्ट्रात खऱ्या अर्थाने 'लोक-राज्याची' स्थापना झाली आहे. महाराष्ट्राचा श्वास मोकळा झाला आहे. प्रगती आणि विकासाच्या नव्या आशा व आकांक्षाची पायाभरणी यानिमित्त झाली आहे. महाविकास आघाडीचे सरकार हे जनतेच्या मनातील अपेक्षांची पूर्तता व्हावी म्हणून अथक परिश्रमासाठी सज्ज झाले आहे.

गेल्या काही वर्षांपासून राज्यातील शेतकऱ्याला अनेकविध नैसर्गिक व इतर संकटांचा सामना करावा लागत आहे. त्यामुळे त्याला नैराश्याने गाठले आहे. उत्पादन खर्चात वाढ, मात्र उत्पन्नात घट यामुळे तो हवालदिल झाला आहे. अजूनही शेती हाच आपल्या अर्थव्यवस्थेचा कणा असल्याने, शेतकऱ्याने असे हवालदिल होणे, योग्य नाही. शेतीत नांगर चालतो तेव्हाच शेती जिवंत होते, हसते, बागडते आणि आपणास नवसंजीवनी देण्याची भूमिका पार पाडते. त्यामुळेच शेतीत नांगर चालवणाऱ्या शेतकऱ्याला बळ देणे, सामर्थ्य देणे, त्याला आत्मशक्ती देणे, हे महाविकास आघाडीचे पहिले कर्तव्य ठरते, याची जाणीव ठेवूनच आम्ही पहिल्या दिवसापासून कार्यरत आहोत. मंत्रिमंडळाच्या पहिल्याच बैठकीत आर्थिकदृष्ट्या अडचणीत सापडलेल्या महाराष्ट्रातील शेतकऱ्याला भरघोस साहाय्य देण्याचा आम्ही निर्णय घेतला. त्यानुसार महिन्याभराच्या आत आम्ही राज्यातील शेतकऱ्यांना दोन लाख रुपयांपर्यंतचे कर्ज माफ करणारी 'महात्मा जोतिराव फुले कर्जमाफी योजना', अमलात आणली आहे. ही योजना क्लिष्ट, किचकट अशी राहणार नसून ती साधी, सोपी, सरळ, सुलभ अशी राहील, याची आम्ही पूर्णपणे काळजी घेतली आहे. योजनेसाठी पात्र शेतकऱ्यांना विनासायास व फारशा कागदपत्रांच्या फेऱ्यात न सापडता लाभ मिळणार आहे.



प्रायोगिक स्तरावर आम्ही १० रुपयात सकस भोजनाची, 'शिवभोजन थाळी' देणाऱ्या योजनेसही लवकरच प्रारंभ करणार आहोत. याचा आढावा घेऊन आम्ही नजीकच्या काळात संपूर्ण महाराष्ट्रात ही योजना लागू करणार आहोत.

सामाजिक हिताच्या व जनतेच्या दैनंदिन जीवनाची गुणवत्ता व दर्जा वाढवणाऱ्या अशा अनेक योजनांची आखणी आणि त्यांच्या अत्यंत प्रभावी व कालबद्ध अंमलबजावणीवर आम्ही लक्ष केंद्रित करणार आहोत.

महाराष्ट्राला देशाचा मुकुटमणी समजले जाते, कारण हा प्रदेश संपन्न व समृद्ध आहे. विविध क्षेत्रात आपण आघाडी घेतली आहे. छत्रपती शिवाजी महाराज, छत्रपती शाहू महाराज, महात्मा फुले, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर अशा थोर विभूतींचा वारसा राज्याला आहे. सामाजिकदृष्ट्या एकसंध असलेला, आर्थिकदृष्ट्या सर्व घटकांना न्याय देणारा, शैक्षणिकदृष्ट्या नव्या संधी युवकांपर्यंत पोहोचवणारा, औद्योगिकदृष्ट्या रोजगार आणि स्वयंरोजगाराच्या विपुल संधी निर्माण करणाऱ्या नव्या महाराष्ट्राची उभारणी आम्हाला करावयाची आहे. महाविकास आघाडीच्या रूपाने त्याची सुरुवात झाली आहे.

प्रगती आणि विकासात निर्माण झालेला अडथळा दूर करून या प्रक्रिया गतिमान आणि पारदर्शक करण्यावर आमचा अधिकाधिक भर राहील. सर्वसमावेशकता हे आमचे वैशिष्ट्य असेल. या राज्यातील प्रत्येक नागरिकाला समान संधी; समान न्याय मिळाला पाहिजे. त्यांचे नैसर्गिक आणि घटनेने दिलेले मूलभूत स्वातंत्र्य कायम राहिले पाहिजे, यासाठी आम्ही प्रयत्नांची पराकाष्ठा करणार आहोत.

मात्र, हे करायला नागरिकांची साथही तेवढीच महत्त्वाची आहे. राज्याकडे असलेल्या उपलब्ध साधनसामग्रीचा काटेकोर उपयोग व व्यवस्थापन करावे लागणार आहे. अशा वेळी काही कटू निर्णय घ्यावे लागतात. असे निर्णय हे अंतिमत: राज्य आणि जनतेच्याच हिताचे व लाभाचे असतात हे एकदा लक्षात घेतले की, परस्पर सहकार्याने कोणतेही उद्दिष्ट गाठणे अवघड जात नाही.

नव्या वर्षात सारे मिळून आपल्या महाराष्ट्राला नव्या उंचीवर नेण्यासाठी वचनबद्ध होऊ या.

लोकराज्यचा हा अंक आपणास आवडेल अशी आशा आहे. पुनश्च नवीन वर्षाच्या शुभेच्छा !

**जयंत पाटील**
(अतिथी संपादक)



कर्जमाफी केल्याबद्दल शेतकऱ्यांकडून मुख्यमंत्री श्री. उद्धव ठाकरे यांचा सत्कार. या वेळी अर्थ व नियोजन मंत्री श्री. जयंत पाटील, गृहमंत्री श्री. एकनाथ शिंदे आदी.

# कर्जमुक्ती....

राज्यात एक कोटी ५३ लाख शेतकरी आहेत. यातील बहुतांश शेतकऱ्यांचे अवलंबित्व शेतीवर असल्याने त्यांना शेतीसाठी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका किंवा व्यापारी बँकांकडून कर्ज घ्यावे लागते. २०१५ ते २०१८-१९ या कालावधीत राज्यातील विविध भागात दुष्काळसदृश स्थिती निर्माण झाली होती. त्यामुळे मोठ्या प्रमाणात ५० टक्क्यांपेक्षा कमी पैसेवारी जाहीर झाली होती. दुष्काळाबरोबरच आलेल्या अवकाळी पावसामुळे राज्यातील शेतकरी प्रभावित झाला. या शेतकऱ्याला शासनाकडून तत्काळ मदत मिळाली पाहिजे ही भूमिका मुख्यमंत्री श्री. उद्धव ठाकरे यांनी घेतली. शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन पिकांच्या झालेल्या नुकसानीचा आढावाही मुख्यमंत्र्यांनी घेतला.

शेतकऱ्यांचे अश्रू पुसून त्यांच्या वाढलेल्या चिंता दूर करण्यासाठी शासन सर्वोच्च प्राथमिकता देणार असल्याचे श्री. ठाकरे यांनी पदाची शपथ घेतल्यानंतर लगेचच स्पष्ट केले होते. विश्वासदर्शक ठरावाला सामोरे जातानाही मुख्यमंत्र्यानी शेतकऱ्यांचा सर्वांगीण विकास हेच शासनाचे ध्येय असल्याचे सांगितले. कर्जमुक्ती हा शेतकऱ्यांच्या समस्या सोडवण्यातील एक घटक असून ती केली जाईलच पण त्याशिवाय शेती आणि शेतकरी विकासाच्या अनेकविध योजना राबवून शेतकरी चिंतामुक्त कसा होईल, याकडे विशेषत्वाने लक्ष देण्यात येईल, असे त्यांनी स्पष्ट केले. पीकविम्याची प्रकरणे गतीने पूर्ण करतानाच त्यामध्ये कोणत्याही शेतकऱ्यावर अन्याय होणार नाही याची दक्षता घेण्याच्या सूचना संबंधित यंत्रणेला त्यांनी दिल्या आहेत.

### आश्वासनपूर्ती

विधिमंडळाच्या नागपूर येथे झालेल्या हिवाळी अधिवेशनात कर्जमुक्ती योजनेची घोषणा करून मुख्यमंत्री श्री. ठाकरे यांनी हे



**राज्यात पडलेल्या अवकाळी पावसानंतर शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन त्यांचे अश्रू पुसणाऱ्या मुख्यमंत्री श्री. उद्धव ठाकरे यांनी शेतकऱ्यांना केवळ कर्जमुक्तच नव्हे तर त्यांना चिंतामुक्त करणार असल्याचे सांगितले होते. विश्वासदर्शक ठरावाला सामोरे जाताना विधानसभेत शेतकऱ्यांच्या पाठीशी शासन ठामपणे उभे राहील हे सांगणाऱ्या मुख्यमंत्र्यांनी पहिल्याच अधिवेशनात दोन लाखांपर्यंत पीक कर्जमुक्तीची घोषणा करून आश्वासनपूर्तीच्या दिशेने ठोस पाऊल टाकले. याबरोबरच १० रुपयांत शिवभोजनाची घोषणा करून कष्टकरी जनतेला अल्पदरात भोजनाची व्यवस्था करून दिली आहे. छत्रपती शिवाजी महाराज यांच्या कल्याणकारी राज्याचा आदर्श ठेवूनच राज्याचा कारभार चालवला जाईल, असेही मुख्यमंत्र्यांनी स्पष्ट केले. बोलणे कमी आणि काम जास्त ही केवळ घोषणा न ठेवता, विधिमंडळात केलेल्या घोषणांना मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली.**

शासन शेतकऱ्यांच्या हिताचे निर्णय घेणारे असेल, असे आश्वासित केले. नागपूरच्या अधिवेशनात घोषणा केलेल्या महात्मा जोतिराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजनेच्या आराखड्यास मंत्रिमंडळाच्या बैठकीत मान्यता घेऊन तिला मूर्तस्वरूप दिले.

महात्मा जोतिराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजनेनुसार १ एप्रिल २०१५ ते ३१ मार्च २०१९ पर्यंत उचल केलेल्या एकापेक्षा जास्त कर्जखात्यात अल्पमुदत पीक कर्ज व अल्पमुदत पीक कर्जाच्या पुनर्गठित कर्जाची ३० सप्टेंबर २०१९ रोजी असलेली थकबाकी व परतफेड न केलेली रक्कम दोन लाखांपेक्षा कमी असल्यास अशा सर्व खात्यास दोन लाख मर्यादेपर्यंत कर्जमुक्तीचा लाभ देण्यात येणार आहे. याचा लाभ राज्यातील लाखो शेतकऱ्यांना होणार आहे. विशेष म्हणजे ही कर्जमुक्ती देताना शेतकऱ्यांचे कोणत्याही प्रकारे जमीन धारणेचे क्षेत्र विचारात घेतले जाणार नाही याचाच अर्थ अल्पभूधारकांना या योजनेचा लाभ मिळणार आहेच शिवाय जे शेतकरी अल्पभूधारक नाहीत त्यांनाही या योजनेचा लाभ मिळणार आहे.

या योजनेमध्ये ज्या अल्पमुदत पीक कर्ज खात्याची अथवा अल्पमुदत पीक कर्जाचे पुनर्गठन केलेल्या कर्ज खात्याचे मुद्दल व व्याजासह ३० सप्टेंबर २०१९ रोजी थकीत असलेली व परतफेड न झालेली रक्कम दोन लाखांपेक्षा जास्त असल्यास अशा कर्ज खात्यांची माहिती बँकांकडून मागवण्यात येणार असून अशा शेतकऱ्यांबाबतही यथावकाश योग्य समर्पक योजनेद्वारे दिलासा देण्याचा प्रयत्न करण्यात येईल. तसेच जे शेतकरी अल्पमुदत पीक कर्जाची नियमितपणे परतफेड करीत असतात अशा शेतकऱ्यांना प्रोत्साहन देण्यासाठी लवकरच नवीन योजना जाहीर करण्यात येईल.

शेतकरी हा ग्रामीण अर्थव्यवस्थेचा कणा आहे. त्यामुळे शेतीकेंद्रित विकास करण्याकडे नव्या शासनाचे धोरण आहे. मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी विदर्भाच्या जिल्हा आढावा बैठकीतही शेतीविषयक सर्व बाबींवर विशेषत्वाने लक्ष पुरविल्याचे दिसून येते. शेतीमाल खरेदी व्यवस्था भक्कम करण्याबरोबरच सिंचन आणि पतपुरवठा अशा सर्वच बाबीतून शेतकऱ्याला चिंतामुक्त करण्याचे शासनाचे धोरण आहे.

### कर्जमुक्तीचा लाभ

महात्मा जोतिराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजना राबवताना महसूल यंत्रणेची मोठी जबाबदारी आहे. यंत्रणांनी शेतकऱ्यांना आपुलकीची वागणूक द्यावी, असे निर्देश मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी दिले आहेत. योजनेचा आढावा घेण्यासाठी मुख्यमंत्र्यांनी उपमुख्यमंत्री अजित पवार, सहकार मंत्री जयंत पाटील, मंत्री अनिल परब, मुख्य सचिव अजोय मेहता यांच्यासह राज्यातील सर्व विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी यांच्याशी व्हिडीओ कॉन्फरन्सिंगद्वारे संवाद साधला.

### वेळापत्रकानुसार योजना पूर्ण करा

शेतकऱ्याला आपण काही देतोय या भावनेपेक्षा शेतकऱ्यांचे आशीर्वाद आपण घेतोय या भावनेपोटी कर्जमुक्तीची योजना राबवली जात आहे. जिल्हास्तरीय यंत्रणांनी ही भावना लक्षात घेऊन योजनेची अंमलबजावणी करावी, असे मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी सांगितले. राज्य शासनाला एक महिना होण्याच्या आत कर्जमुक्तीची ही महत्त्वाकांक्षी योजना आणली असून योजना प्रत्यक्ष अंमलात आणण्याचे काम क्षेत्रीय यंत्रणेचे आहे.

दिलेल्या वेळापत्रकानुसार ही योजना पूर्ण करा, असे निर्देश मुख्यमंत्र्यांनी दिले.

पात्र शेतकऱ्यांना कर्जमुक्तीचा लाभ मिळण्यासाठी कुठलाही अर्ज करावा लागणार नाही तसेच त्यांना रांगेत उभे राहू लागू नये अशा पद्धतीने ही योजना आखली असून शासनाच्या शेवटच्या टोकातील घटकाला विश्वासात घेऊन ही योजना यशस्वीरीत्या राबवावी.

### खात्यांची यादी

आधारसंलग्न नसलेल्या कर्जखात्यांची यादी ७ जानेवारी पर्यंत प्रसिद्ध केली जाणार आहे. त्यानंतर शेतकऱ्यांनी आपले कर्जखाते आधारसंलग्न करुन घ्यावे.





### बसची व्यवस्था

आधार प्रमाणिकरणासाठी इंटरनेटची आवश्यकता असून दुर्गम भागात इंटरनेट सुविधा नाही अशा गावातील शेतकऱ्यांना नजीकच्या गावात नेऊन आपले सरकार केंद्रावर आधार प्रमाणीकरण आणि अन्य बाबी पूर्ण कराव्यात. अशा वेळी शेतकऱ्यांची ने-आण केल्यास त्यांना हेलपाटे मारावे लागणार नाही. त्यासाठी बसची व्यवस्था करण्याचे निर्देश मुख्यमंत्र्यांनी दिले आहेत.

### सातबाऱ्यावरील कर्ज कमी

योजनेसाठी शेतकऱ्यांमध्ये जाणीवजागृती आवश्यक असून जिल्हा यंत्रणेने योजनेची योग्य ती माहिती विविध माध्यमातून शेतकऱ्यांपर्यंत पोहोचवावी, शेतकऱ्यांचे कर्जखाते आधारसंलग्न करावे. जिल्हाधिकाऱ्यांच्या नियंत्रणाखाली पोर्टलवर माहिती अपलोड करावी. दुर्गम भागात बायोमेट्रिकची सुविधा उपलब्ध करून द्यावी. जे शेतकरी कर्जमुक्त झाले, त्यांच्या सातबाऱ्यावरील कर्ज कमी करण्याची जबाबदारी गावपातळीवरील यंत्रणेची असून त्यावर जिल्हाधिकाऱ्यांनी संनियंत्रण करावे, अशा सूचना मुख्यमंत्र्यांनी या वेळी केल्या.

### दहा रुपयात शिवभोजन

गरीब व गरजू जनतेला अल्पदरात भोजन मिळायला हवे, कोणीही भुकेल्या पोटी राहू नये यासाठी शासनाने शिवभोजन योजना राबवण्यास मंजुरी दिली आहे. मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यासाठी प्रचंड आग्रही होते. विधिमंडळाच्या हिवाळी अधिवेशनात मुख्यमंत्र्यांनी याबाबत सूतोवाच केले होते. त्यानुसार राज्यात केवळ १० रुपयात 'शिवभोजन' उपलब्ध करून देण्यास मंत्रिमंडळाच्या बैठकीत मान्यता देण्यात आली. राज्य शासनास ही योजना प्रायोगिक तत्त्वावर सुरू करण्यासाठी तीन महिन्यात ६ कोटी ४८ लक्ष खर्च अपेक्षित आहे.

राज्यातील गरीब जनतेच्या पाठीशी हे शासन खंबीरपणे उभे आहे. महाराष्ट्रासारख्या प्रगत आणि पुरोगामी राज्यात कोणीही भुकेले राहू नये, यासाठी शासनाने शिवभोजन योजना आणली आहे. प्रायोगिक तत्त्वावर या योजनेच्या पहिल्या टप्प्यात राज्यातील प्रत्येक जिल्ह्याच्या मुख्यालयाच्या ठिकाणी किमान एक भोजनालय तसेच प्रत्येक भोजनालयात कमाल ५०० थाळी सुरू करण्यास शासनाने मान्यता दिली आहे. या योजनेला मिळणारा प्रतिसाद पाहून ही योजना राज्याच्या इतर भागातही राबवण्यात येणार आहे.

### काय असेल या थाळीमध्ये

शासनातर्फे सुरू करण्यात येणाऱ्या भोजनालयात प्रत्येकी ३० ग्रॅमच्या दोन चपात्या, १०० ग्रॅमची एक वाटी भाजी, १५० ग्रॅमचा एक मूद भात व १०० ग्रॅमचे एक वाटी वरण समाविष्ट असलेली शिवभोजनाची थाळी १० रुपयात देण्यात येईल. ही भोजनालये दुपारी १२ ते २ या कालावधीत कार्यरत राहतील.

### मिळणार अनुदान

'शिवभोजन' थाळीची किंमत शहरी भागामध्ये प्रतिथाळी ५० रुपये व ग्रामीण भागामध्ये ३५ रुपये इतकी राहील. प्रत्येक ग्राहकाकडून प्राप्त झालेल्या १० रुपयाव्यतिरिक्त उर्वरित रक्कम अनुदान म्हणून या विभागाकडून थेट जिल्हाधिकाऱ्यांना देण्यात येऊन त्यांच्यामार्फत संबंधितांना वितरित करण्यात येईल. शहरी भागासाठी प्रतिथाळी ४० रुपये आणि ग्रामीण भागासाठी प्रतिथाळी २५ रुपये अनुदान असेल.

### भोजनालय कोण सुरू करू शकतो?

शिवभोजनालय सुरू करू इच्छिणाऱ्या व्यक्तीकडे स्वत:ची पर्याप्त जागा असणे गरजेचे आहे. योजना राबवण्यासाठी सद्य:स्थितीत सुरू असलेल्या खानावळ, महिला बचतगट, भोजनालय, रेस्टॉरंट, अशासकीय संस्था यापैकी सक्षम असलेल्या भोजनालयाची निवड करण्यात येईल. त्यासाठी महापालिका स्तरावर जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली तर तालुका स्तरावर तहसीलदार यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्यात येईल. गरीब किंवा मजूर लोकांची वर्दळ जास्त असलेल्या जिल्हा रुग्णालये, बस स्थानके, रेल्वे स्थानक परिसर, बाजारपेठा, शासकीय कार्यालये यासारख्या ठिकाणी थाळीची विक्री केली जाईल.

**टीम लोकराज्य**

मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी दिनांक ३० डिसेंबर २०१९ रोजी मंत्रिमंडळाचा विस्तार केला. विधान मंडळाच्या परिसरात झालेल्या या शपथविधी सोहळ्यात राज्यपाल श्री. भगत सिंह कोश्यारी यांनी श्री. अजित पवार यांना उपमुख्यमंत्रिपदाची शपथ दिली. याच वेळी २५ मंत्री आणि १० राज्यमंत्री यांनीही शपथ घेतली.



राज्यपाल श्री. भगत सिंह कोश्यारी यांच्याकडून राज्याच्या उपमुख्यमंत्रिपदाची शपथ घेताना श्री. अजित पवार.

# आपले नवे मंत्री

## श्री. अजित अनंतराव पवार, उपमुख्यमंत्री

**जन्म** : २२ जुलै १९५९. **जन्म ठिकाण** : देवळाली-प्रवरा, तालुका राहुरी, जिल्हा अहमदनगर. **शिक्षण** : बी. कॉम. **ज्ञात भाषा** : मराठी, हिंदी व इंग्रजी **वैवाहिक माहिती** : विवाहित, पत्नी श्रीमती सुनेत्रा **अपत्ये** : एकूण २ (दोन मुले) **व्यवसाय** : शेती

**पक्ष** : राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष **मतदारसंघ** : २०१-बारामती, जिल्हा पुणे.

**इतर माहिती** : विश्वस्त, विद्या प्रतिष्ठान, बारामती; संचालक, छत्रपती शिक्षण संस्था, भवानीनगर, ता. इंदापूर; संचालक, श्री. छत्रपती सहकारी साखर कारखाना, लि., भवानीनगर, माळेगाव सहकारी साखर कारखाना व सोमेश्वर सहकारी साखर कारखाना, लि., जिल्हा पुणे; संचालक, महाराष्ट्र राज्य सहकारी संघ, मुंबई, वसंतदादा शुगर इन्स्टिट्यूट पुणे; मार्च १९९१ ते ऑगस्ट १९९१ तसेच डिसेंबर १९९४ ते डिसेंबर १९९८ अध्यक्ष, पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक; ११ डिसेंबर १९९८ ते १७ ऑक्टोबर १९९९ अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य सहकारी बँक, मुंबई : १९ डिसेंबर २००५ पासून संचालक, महाराष्ट्र राज्य सहकारी दुध उत्पादक संघ; २८ सप्टेंबर २००६ पासून अध्यक्ष, पुणे जिल्हा शिक्षण मंडळ; सप्टेंबर २००५ ते २३ मार्च २०१३; अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य कबड्डी असोसिएशन; १३ ऑगस्ट २००६ पासून अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य खो-खो असोसिएशन; १७ जून १९९१ ते १८ सप्टेंबर १९९१ सदस्य, लोकसभा; १९९१-९५ (पो.नि.) १९९५-९९, १९९९-२००४, २००४-२००९, २००९-२०१४, २०१४-२०१९ सदस्य, महाराष्ट्र विधानसभा; २८ जून १९९१ ते नोव्हेंबर १९९२ कृषी, फलोत्पादन व ऊर्जा खात्याचे राज्यमंत्री; नोव्हेंबर १९९२ ते फेब्रुवारी १९९३ जलसंधारण, ऊर्जा व नियोजन खात्याचे राज्यमंत्री : २७ ऑक्टोबर १९९९ ते २५ डिसेंबर २००३ पाटबंधारे (कृष्णा खोरे व कोकण पाटबंधारे महामंडळे), फलोत्पादन खात्याचे मंत्री; २६ डिसेंबर २००३ ते ३१ ऑक्टोबर २००४ ग्रामविकास, पाणीपुरवठा व स्वच्छता, पाटबंधारे (कृष्णा खोरे कोकण पाटबंधारे महामंडळे) खात्याचे मंत्री : ९ नोव्हेंबर २००४ ते ७ नोव्हेंबर २००९ जलसंपदा (कृष्णा खोरे पाटबंधारे महामंडळ वगळून) लाभक्षेत्र विकास, पाणीपुरवठा व स्वच्छता खात्याचे मंत्री; ७ नोव्हेंबर २००९ ते ९ नोव्हेंबर २०१० जलसंपदा (कृष्णा खोरे पाटबंधारे महामंडळ वगळून) व ऊर्जा खात्याचे मंत्री; ११ नोव्हेंबर २०१० ते सप्टेंबर २०१४ महाराष्ट्र राज्याचे उप मुख्यमंत्री (वित्त व नियोजन आणि ऊर्जा); ऑक्टोबर २०१९ मध्ये महाराष्ट्र विधानसभेवर फेरनिवड. दि. २३ नोव्हेंबर, २०१९ ते २६ नोव्हेंबर, २०१९ पर्यंत उपमुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य.

**संदर्भः १३ वी महाराष्ट्र विधानसभा सदस्यांचा संक्षिप्त जीवन परिचय**

## श्री. अशोकराव शंकरराव चव्हाण

**जन्म** : २८ ऑक्टोबर १९५८ **जन्म ठिकाण** : मुंबई. **शिक्षण** : बी. एस्सी., एम. बी. ए. **ज्ञात भाषा** : मराठी, हिंदी व इंग्रजी. **वैवाहिक माहिती** : विवाहित, पत्नी श्रीमती अमिता **अपत्य** : एकूण २ (दोन मुली) **व्यवसाय** : शेती व उद्योग **पक्ष** : भारतीय राष्ट्रीय काँग्रेस (आय) **मतदारसंघ** : ८५-भोकर, जिल्हा-नांदेड..



**इतर माहिती** : १९८६ - १९९२ या काळात सरचिटणीस आणि उपाध्यक्ष, महाराष्ट्र प्रदेश युवक काँग्रेस कमिटी; १९९५ ते १९९९ सरचिटणीस, महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटी; १९८७-८९ सदस्य, लोकसभा, १९९२-९८ सदस्य, महाराष्ट्र विधानपरिषद, १९९९-२००४, २००४-२००९ सदस्य, महाराष्ट्र विधानसभा, ऑक्टोबर २००९ मध्ये महाराष्ट्र विधानसभेवर फेरनिवड; मार्च १९९३ ते सप्टेंबर १९९४ राज्यमंत्री, सार्वजनिक बांधकाम विभाग, नगरविकास आणि संसदीय कार्य; सप्टेंबर १९९४ ते मार्च १९९५ राज्यमंत्री, गृह व संसदीय कार्य; ऑक्टोबर १९९९ ते जानेवारी २००३ मंत्री, महसूल, राजशिष्टाचार; जानेवारी २००३ ते ऑक्टोबर २००४ मंत्री, परिवहन, बंदरे, सांस्कृतिक कार्य आणि राजशिष्टाचार; नोव्हेंबर २००४ ते ४ डिसेंबर २००८ मंत्री, उद्योग, खनिकर्म, सांस्कृतिक कार्य व राजशिष्टाचार; ८ डिसेंबर २००८ ते २६ ऑक्टोबर २००९ महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री; ७ नोव्हेंबर २००९ रोजी मुख्यमंत्रिपदी दुसऱ्यांदा शपथ. ऑक्टोबर, २०१९ मध्ये विधानसभेवर निवड; १९८५ अध्यक्ष, संजय गांधी निराधार योजना, नांदेड शहर; १९८७ - १९८९ सदस्य, कन्सल्टेटिव्ह कमिटी - केंद्रीय पर्यावरण व वन मंत्रालय, कार्मिक, सार्वजनिक तक्रारी आणि निवृत्तिवेतन मंत्रालय, विभागीय रेल्वे यूजर्स समिती, हैद्राबाद, आणि दक्षिण मध्य रेल्वे; १९९१-९२ सदस्य, सल्लागार पॅनल, केंद्रीय चित्रपट परिरक्षण, मुख्य प्रवर्तक, भाऊराव चव्हाण सहकारी साखर कारखाना लक्ष्मीनगर देगाव-येळेगाव, जि. नांदेड, या कारखान्यास सलग तीन वेळा केंद्र शासनाचे प्रथम पारितोषिक, त्याचप्रमाणे स्पेनमधील माद्रिदच्या बिझनेस इनिशिएटिव्ह डायरेक्शनचे आंतरराष्ट्रीय दर्जासाठी क्राऊन ॲवॉर्ड; अध्यक्ष, शारदा भवन शिक्षण संस्था, नांदेड; अध्यक्ष, साई सेवाभावी ट्रस्ट, नांदेड.

**संदर्भः १२ वी महाराष्ट्र विधानसभा सदस्यांचा संक्षिप्त जीवन परिचय**

---

## श्री. दिलीप दत्तात्रय वळसे-पाटील

**जन्म** : ३० ऑक्टोबर, १९५६ **जन्म ठिकाण** : निरगुडसर, तालुका आंबेगाव, जिल्हा पुणे. **शिक्षण** : बी. ए. (ऑनर्स), डी. जे., एल.एल.एम. **ज्ञात भाषा** : मराठी, हिंदी व इंग्रजी **वैवाहिक माहिती** : विवाहित, पत्नी श्रीमती किरण **अपत्ये** : एकूण १ (एक मुलगी) **व्यवसाय** : शेती व व्यापार **पक्ष** : राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष **मतदारसंघ** : १९६ - आंबेगाव, जिल्हा पुणे.



**इतर माहिती** : महाविद्यालयीन जीवनापासूनच राजकारणात तसेच सहकारी चळवळीमध्ये राज्यातील नेत्यांच्या सानिध्यात राहून सक्रिय सहभाग; संस्थापक - अध्यक्ष, राष्ट्रीय ग्रामीण विकास केंद्र, पुणे, या संस्थेमार्फत ग्रामीण, दुर्गम आदिवासी भागातील जनतेच्या शैक्षणिक, सामाजिक व आर्थिक उन्नतीसाठी विविध उपक्रम राबवले; ग्रामीण भागात दुग्ध व्यवसायास प्रोत्साहन देऊन संस्थांचे जाळे विकसित केले व त्याद्वारे सर्वसामान्य जनता विशेषतः ग्रामीण महिला वर्गाच्या आर्थिक सक्षमीकरणाचे कार्य; विश्वस्त. यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई व महाराष्ट्रातील अनेक सामाजिक व शैक्षणिक संस्थांशी निकटचा संबंधः संचालक, पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक; संस्थापक-चेअरमन, भीमाशंकर सहकारी साखर कारखाना; १९९०-९५, १९९५-९९, १९९९-२००४, २००४-२००९,२००९-२०१४, २०१४-२०१९ सदस्य, महाराष्ट्र विधानसभा; १९९२-९३ समिती प्रमुख, विधिमंडळ अंदाज समिती सन १९९८-९९ मध्ये राष्ट्रकुल संसदीय मंडळ, महाराष्ट्र शाखेतर्फे दिल्या जाणाऱ्या महाराष्ट्र विधान सभेतील उत्कृष्ट संसदपटू या पुरस्काराने सन्मानित; ऑक्टोबर १९९९ ते डिसेंबर, २००२ उच्च व तंत्रशिक्षण खात्याचे मंत्री; डिसेंबर, २००२ ते नोव्हेंबर २००४ ऊर्जा, व उच्च व तंत्रशिक्षण खात्याचे मंत्री; नोव्हेंबर २००४ ते मार्च २००५ ऊर्जा (अपारंपरिक ऊर्जा वगळून) व वैद्यकीय शिक्षण खात्याचे मंत्री; मार्च २००५ ते डिसेंबर २००८ ऊर्जा (अपारंपरिक ऊर्जा वगळून), वैद्यकीय शिक्षण, उच्च व तंत्रशिक्षण खात्याचे मंत्री; डिसेंबर २००८ ते ऑक्टोबर, २००९ वित्त व नियोजन खात्याचे मंत्री; **उल्लेखनीय निर्णय** - 'महाराष्ट्र ज्ञान महामंडळ' या कंपनीची स्थापना; विद्युत कायदा २००३ ची अंमलबजावणी; महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाचे विभाजन करून सूत्रधारी कंपनी, महानिर्मिती, महापारेषण व महावितरण या चार कंपन्यांची स्थापना; ऊर्जा विकासासाठी रोडमॅप; ६००० मेगावॅटचे प्रकल्प उभारण्याचे व विद्युत पायाभूत सुविधा निर्माण करण्याचे काम; २००९-२०१४ अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा; २०१२-१३ मध्ये महाराष्ट्र विधान मंडळाच्या अमृतमहोत्सव समारंभाचे भारताच्या राष्ट्रपती महामाहिम प्रतिभाताई पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत आयोजन केले; तसेच यशवंतराव चव्हाण व वसंतराव नाईक यांच्या जन्मशताब्दी निमित्त प्रदर्शन व चर्चासत्रांचे आयोजन ऑक्टोबर, २०१९ मध्ये महाराष्ट्र विधानसभेवर फेरनिवड.

**संदर्भः १३ वी महाराष्ट्र विधानसभा सदस्यांचा संक्षिप्त जीवन परिचय**

## श्री. धनंजय पंडितराव मुंडे

**जन्म** : १५ जुलै, १९७५ **जन्म ठिकाण** : मुंबई **शिक्षण** : बी.एस.एल. **ज्ञात भाषा** : मराठी, हिंदी, इंग्रजी.

**वैवाहिक माहिती** : विवाहित, पत्नी श्रीमती राजश्री. **अपत्ये** : एकूण २ (दोन मुली) **व्यवसाय** : शेती, व्यापार व समाजसेवा **पक्ष** : राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी **मतदारसंघ** : २३३-परळी



**इतर माहिती** : अध्यक्ष, नाथ प्रतिष्ठान, परळी वैजनाथ, या संस्थेमार्फत सामूहिक विवाह, वृक्षलागवड, आरोग्य तपासणी शिबीरांचे, विविध क्रीडा स्पर्धाचे तसेच सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन विद्यार्थ्यांना शालोपयोगी वस्तूंचे वाटप; २००३ मध्ये घाटनांदूर येथील रेल्वे अपघातात १२ जणांचे प्राण वाचवले; ग्रामीण भागातील पिण्याच्या पाण्याचा गंभीर प्रश्न सोडवण्यासाठी अनेक गावात २०० पेक्षा अधिक विंधन विहिरी घेतल्या; २००१ मध्ये बेरोजगार व दहशतवादविरोधी युवक मोर्चा; २००८ दिल्ली येथील युवाक्रांती रॅलीत महाराष्ट्रातील युवकांचे नेतृत्व; २००९ मध्ये पुणे येथे युवा संकल्प रॅलीचे आयोजन केले. १९९७ - ९८ भारतीय जनता युवा मोर्चा महाराष्ट्र प्रदेश विद्यार्थी आघाडीचे प्रमुखः १९९८ - २००१ उपाध्यक्ष व २००१ - २००७ सरचिटणीस व २००७-२०१० अध्यक्ष, भारतीय जनता युवा मोर्चा; २००२-२००७ सदस्य, २००७-२०१० उपाध्यक्ष, जिल्हापरिषद बीड; संचालक, संत जगमित्र सहकारी सूतगिरणी मर्यादित टोकवाडी, परळी वैजनाथ; २०१०-१३, २०१३-१६ सदस्य महाराष्ट्र विधानपरिषद डिसेंबर २०१४ ते जुलै, २०१६ विरोधी पक्षनेता, विधानपरिषद, जुलै, २०१६ मध्ये महाराष्ट्र विधानपरिषदेवर फेरनिवड, विधानपरिषदेचे विरोधी पक्षनेते; २०१९ मध्ये महाराष्ट्र विधानसभेवर निवड.

---

## श्री. विजय नामदेवराव वडेट्टीवार

**जन्म** : १२ डिसेंबर, १९६२. **जन्म ठिकाण** : करंजी, तालुका गोंडपिंपरी, जिल्हा चंद्रपूर. **शिक्षण** : एच. एस. सी. **ज्ञात भाषा** : मराठी, हिंदी, इंग्रजी व तेलुगू. **वैवाहिक माहिती** : विवाहित, पत्नी श्रीमती किरण. **अपत्ये** : एकूण ४ (एक मुलगा व तीन मुली) **व्यवसाय** : शेती व व्यापार. **पक्ष** : भारतीय राष्ट्रीय काँग्रेस (आय) **मतदारसंघ** : ७३-ब्रम्हपुरी, जिल्हा चंद्रपूर



**इतर माहिती** : संस्थापक-अध्यक्ष, सेमाना वन विकास शैक्षणिक संस्थाः विदर्भस्तरीय एकांकिका स्पर्धा, कविसंमेलने, क्रीडा स्पर्धांचे आयोजन; गरीब विद्यार्थ्यांना सर्वतोपरी मदत; शिवसेनेच्या माध्यमातून आरोग्य तपासणी शिबिरे, रक्तदान, नेत्रदान. नेत्रचिकित्सा व मोफत चष्मेवाटप शिबिरांचे आयोजन; बेरोजगारांना मार्गदर्शन आणि शेतकरी, शेतमजूर, वन कामगारांच्या न्याय्य हक्कांसाठी मोर्चे, आंदोलने करून न्याय मिळवून देण्यासाठी प्रयत्न; गडचिरोली जिल्ह्यातील कारवाफा, तुलतुली, दिना या उपसा सिंचन प्रकल्पांसाठीच्या आंदोलनाचे नेतृत्व पूरग्रस्तांना मदत; दूध उत्पादन व प्रक्रिया केंद्र सुरू करून (शिवाणी डेअरी) गरीब, आदिवासी, शेतकरी यांना गाई-म्हशी उपलब्ध करून रोजगाराची साधने उपलब्ध करून दिली; अध्यक्ष, चंद्रपूर जिल्हा मध्यवर्ती बँक, संचालक, महाराष्ट्र राज्य सहकारी बँक; अध्यक्ष, स्वदेशी कुक्कुटपालन सहकारी संस्था, गडचिरोली; अध्यक्ष, सेमाना विद्या व वनविकास प्रशिक्षण संस्था, गडचिरोली; चिमूर व सिंदेवाही येथे नगरपरिषद स्थापनेसाठी प्रयत्न; गडचिरोली, वडसा (दे), भद्रावती, वरोरा, चंद्रपूर, ब्रम्हपुरी नगरपरिषद निवडणुकीद्वारे शिवसेनेची सत्तेसाठी विशेष प्रयत्न; कुरखेडा, आरमोरी, वडसा, गडचिरोली, चामोशी, धानोरा व मुलचेरा पंचायत समित्यांमध्ये शिवसेनेची सत्ता संपादन केली; गडचिरोली जिल्हा निर्मिती आंदोलनात सहभाग, अटक व कारावासः १९८६ पासून गडचिरोली शिवसेना जिल्हाप्रमुख; १९९५-९८ अध्यक्ष, वनविकास महामंडळ, या काळात जंगल कामगार, वन मजूर सहकारी संस्थांच्या अडचणी सोडवून तोट्यातील महामंडळ नफ्यामध्ये आणले; शिवसेनेच्या ५५० गावात शाखा काढल्याः १९९७ पासून गडचिरोली जिल्ह्यातील व चिमूर भागातील बहुसंख्य ग्रामपंचायतीवर वर्चस्व मिळवले; २००५ पासून काँग्रेस पक्षाचे कार्य; सदस्य, जिल्हा परिषद, गडचिरोली; १९९८ - २००४ सदस्य, महाराष्ट्र विधानपरिषद; २००४-२००९, २००९-२०१४, २०१४-२०१९ सदस्य, महाराष्ट्र विधानसभा; विधिमंडळाच्या रोजगार हमी, लोकलेखा व आश्वासन समितीचे सदस्य नोव्हेंबर २००९ ते नोव्हेंबर, २०१० जलसंपदा व संसदीय कार्य वित्त व नियोजन आणि ऊर्जा खात्याचे राज्यमंत्री; काही काळ विधानसभेचे विरोधी पक्षाचे काम पाहिले; ऑक्टोबर, २०१९ मध्ये महाराष्ट्र विधानसभेवर फेरनिवड.

**संदर्भः १३ वी महाराष्ट्र विधानसभा सदस्यांचा संक्षिप्त जीवन परिचय**

## श्री. अनिल वसंतराव देशमुख



**जन्म** : ९ मे, १९५० **जन्म ठिकाण** : नागपूर **शिक्षण** : एम.एस्सी. (अंग्री.) **ज्ञात भाषा** : मराठी, हिंदी व इंग्रजी. **वैवाहिक माहिती** : विवाहित, पत्नी श्रीमती आरती **अपत्य** : एकूण ३ (दोन मुलगे एक मुलगी) **व्यवसाय** : शेती **पक्ष** : राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष **मतदारसंघ** : ४८ - काटोल, जिल्हा - नागपूर

**इतर माहिती** : अनेक सामाजिक व सांस्कृतिक संस्थांशी निकटचा संबंध, शिक्षणाचा दर्जा उंचावण्यासाठी विशेष प्रयत्न, विविध खात्यांच्या मंत्रीपदाची धुरा सांभाळताना शेतकरी, महिला व युवकांना केंद्रस्थानी ठेऊन विविध योजना राबवल्या. कौशल्य विकासाचे विविध उपक्रम राबवले. शेतकरी व महिलांना आर्थिक स्थैर्य प्राप्त करून देण्यासाठी प्रयत्न. विविध सामाजिक कार्यात त्यांचा सहभाग असतो.

१९७० ते १९९९ काँग्रेस पक्षाचे कार्य, १९९९ पासून राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे कार्य; २३ मे १९७२ ते ९ जून १९९२ सभापती, पंचायत समिती, नरखेड, जिल्हा नागपर; ९ जुलै १९९२ ते १२ मार्च १९९५. अध्यक्ष, जिल्हा परिषद, नागपूर, १९९५ - ९९, १९९९ - २००४, २००४-२००९, २००९-१४ सदस्य, महाराष्ट्र विधानसभा; मार्च १९९५ ते जुलै १९९९ शालेय शिक्षण, उच्च व तंत्र शिक्षण, सांस्कृतिक कार्य खात्याचे राज्यमंत्री; ऑक्टोबर १९९९ ते मार्च २००१ शालेय शिक्षण, माहिती व जनसंपर्क, क्रीडा व युवक कल्याण खात्याचे राज्यमंत्री; मार्च २००१ ते ऑक्टोबर २००४ राज्य उत्पादन शुल्क, अन्न व औषध प्रशासन खात्याचे राज्यमंत्री; नोव्हेंबर २००४ ते डिसेंबर २००८ सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) खात्याचे मंत्री; ऑक्टोबर २०१९ मध्ये महाराष्ट्र विधानसभेवर फेरनिवड.

कृषी, शैक्षिणिक व सांस्कृतिक क्षेत्रात भरीव कामगिरी. वसंतराव देशमुख प्रतिष्ठान अंतर्गत विविध सामाजिक उपक्रम. यामध्ये सामूहिक विवाह सोहळा, शेतकरी व युवकांच्या कल्याणासाठीच्या विविध उपक्रमांचा समावेश.

**संदर्भः १२ वी महाराष्ट्र विधानसभा सदस्यांचा संक्षिप्त जीवन परिचय**

---

## श्री. हसन मियालाल मुश्रीफ



**जन्म** : २४ मार्च १९५४ **जन्म ठिकाण** : कागल, जिल्हा कोल्हापूर. **शिक्षण** : बी. ए. (अर्थशास्त्र) **ज्ञात भाषा** : मराठी, हिंदी, इंग्रजी. **वैवाहिक माहिती** : विवाहित, पत्नी श्रीमती साहेरा. **अपत्ये** : एकूण ४ (तीन मुलगे व एक मुलगी) **व्यवसाय** : शेती. **पक्ष** : राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी **मतदारसंघ** : २७३ - कागल, जिल्हा - कोल्हापूर

**इतर माहिती** : विद्यार्थी चळवळीत सहभाग; अध्यक्ष, आदर्श शिक्षण संस्था, कागल; अध्यक्ष, भाई माधवराव बागल शिक्षण संस्था, कोल्हापूरः अध्यक्ष, नागनाथ शिक्षण संस्था, एकोंडी; शेतकरी, दुर्बल घटक व मागासवर्गीयांच्या विकासासाठी सातत्याने प्रयत्नशील; महाराष्ट्र कर्नाटक सीमाप्रश्नी मा. शरदरावजी पवार यांच्या नेतृत्वाखालील आंदोलनात सक्रिय सहभागः शेतकरी संघटनेच्या तंबाखू व दूध दरवाढ आंदोलनात सक्रिय सहभाग; सदस्य व १९९७-९८ सभापती, पंचायत समिती, कागल; सदस्य, जिल्हा परिषद, कोल्हापूर : १९८६ - २०१५ संचालक, काही काळ व्हाईस चेअरमन व चेअरमन, कोल्हापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक; या बँकेच्या माध्यमातून अनेक नावीन्यपूर्ण योजना सभासदांच्या हितार्थ राबवल्या. त्यामुळे शासनाने या बँकेचा विशेष गौरव केला; अध्यक्ष, संजय गांधी निराधार योजना, कागल; संचालक व उपाध्यक्ष, महाराष्ट्र राज्य सहकारी दूध महासंघ मर्या. (महानंद), गोरेगाव, मुंबई; व्हाईस चेअरमन, खा. सदाशिवराव मंडलिक, कागल तालुका सहकारी साखर कारखाना, हमीदवाडा; सदस्य, कागल तालुका खरेदी विक्री संघ संस्थापक - संचालक. छत्रपती शाहू सह. साखर कारखाना लि. कागल; व्हाईस चेअरमन, कागल तालुका सह. सूतगिरणी मर्या. व शरद सह. सूतगिरणी मर्या. कागल; संचालक, कोल्हापूर जिल्हा सहकारी कृषी उद्योग सहकारी संस्था; उपाध्यक्ष, जिल्हा काँग्रेस कमिटी; १९९९ पासून राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे कार्य; १९९९-२००४, २००४-२००९, २००९-२०१४, २०१४-२०१९ सदस्य, महाराष्ट्र विधानसभा; मार्च २००१ ते जुलै २००४ पशुसंवर्धन व दुग्धविकास खात्याचे राज्यमंत्री; जुलै २००४ ते ऑक्टोबर २००८ पशुसंवर्धन, दुग्धविकास, शालेय शिक्षण, औकाफ खात्यांचे राज्यमंत्री; नोव्हेंबर २००८ ते नोव्हेंबर २००९ नगरविकास, पशुसंवर्धन, दुग्धविकास, मत्स्यव्यवसाय, अल्पसंख्याक, औकाफ. विधी व न्याय खात्याचे राज्यमंत्री : नोव्हेंबर २००९ ते जून २०१४, कामगार खात्याचे मंत्री; २७ जून २०१४ ते ऑक्टोबर २०१४ जलसंपदा (कृष्णाखोरे महामंडळ) या खात्याचे मंत्रीः ऑक्टोबर २०१९ मध्ये महाराष्ट्र विधानसभेवर फेर निवड.

**परदेश प्रवास** : युरोप, न्यूझीलंड, ऑस्ट्रेलिया, चीन व जिनेव्हा इत्यादी देशांचा अभ्यासदौरा.

**संदर्भः १३ वी महाराष्ट्र विधानसभा सदस्यांचा संक्षिप्त जीवन परिचय**

## प्रा. वर्षा एकनाथ गायकवाड



**जन्म :** ३ फेब्रुवारी, १९७५ **जन्म ठिकाण :** मुंबई **शिक्षण :** एम. एस्सी. (गणित), बी.एड्. **ज्ञात भाषा :** मराठी, हिंदी व इंग्रजी **वैवाहिक माहिती :** विवाहित, पती श्री. राजू बाबू गोडसे **व्यवसाय :** सामाजिक कार्य **पक्ष :** भारतीय राष्ट्रीय काँग्रेस (आय). **मतदारसंघ :** १७८-धारावी (अनुसूचित जाती)

**इतर माहिती :** अध्यक्षा, निर्मल महिला मागासवर्गीय औद्योगिक सहकारी संस्था, विक्रोळी, मुंबई; रयत महासंघ व अभय शिक्षण केंद्र या संस्थांच्या माध्यमातून शैक्षणिक व सामाजिक उपक्रम सुरू केले; विशेषत: महिलांच्या सक्षमीकरणासाठी विविध उपक्रमांच्या माध्यमातून कार्यरत; वंचित आणि उपेक्षित घटकातील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक उत्थानासाठी मदत; नागरी समस्यांच्या सोडवणुकीसाठी विशेष भर; संघटनेच्या माध्यमातून महिला आणि युवतींचे संघटन करून त्यांच्यातील उद्यमशिलता आणि सामाजिक जाणिवा वृद्धिंगत करण्यात विशेष प्रयत्न; कार्यकारी समिती सदस्या, महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटी; २००४-२००९, २००९-२०१४, २०१४-२०१९ सदस्या, महाराष्ट्र विधानसभाः २००४-२००८ सदस्या, व २००८-२००९ समिती प्रमुख, महिलांचे हक्क व कल्याण समिती; राष्ट्रकुल संसदीय मंडळ महाराष्ट्र शाखेतर्फे २००६-२००७ साठीचा महाराष्ट्र विधानसभेतील उत्कृष्ट संसदपटू पुरस्कार प्राप्त; ७ नोव्हेंबर, २००९ ते १० नोव्हेंबर २०१० वैद्यकीय शिक्षण, उच्च व तंत्र शिक्षण, पर्यटन व विशेष साहाय्य खात्याच्या राज्यमंत्री. ११ नोव्हेंबर, २०१० ते २६ सप्टेंबर, २०१४ महिला व बालविकास खात्याचे मंत्री. ऑक्टोबर, २०१९ मध्ये महाराष्ट्र विधानसभेवर फेरनिवड.

**परदेश प्रवास :** अमेरिकेच्या अध्यक्षांच्या निवडणुकीची पाहणी करण्यासाठी नियुक्त केलेल्या प्रतिनिधी मंडळात सहभाग; २००८ मध्ये राष्ट्रकुल संसदीय मंडळ, महाराष्ट्र शाखेतर्फे अमेरिकेच्या अभ्यास दौऱ्यात सहभाग; २००९ मध्ये ऑस्ट्रेलिया, न्युझीलंड व सिंगापूर देशांचा अभ्यासदौरा.

**संदर्भः १३ वी महाराष्ट्र विधानसभा सदस्यांचा संक्षिप्त जीवन परिचय**

---

## डॉ. राजेंद्र भास्करराव शिंगणे



**जन्म :** ३० मार्च, १९६१ **जन्म ठिकाण :** डोंगर शेवली, जिल्हा-बुलडाणा. **शिक्षण :** बी. ए. एम. एस. **ज्ञात भाषा :** मराठी, हिंदी, इंग्रजी. **वैवाहिक माहिती :** विवाहित, पत्नी श्रीमती रजनी. **अपत्ये :** एकूण १ (एक मुलगी) **व्यवसाय :** शेती. **पक्ष :** राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी **मतदारसंघ :** २४-सिंदखेडराजा, जिल्हा बुलडाणा

**इतर माहिती :** अध्यक्ष, सिद्धेश्वर शिक्षण प्रसारक मंडळ, साखरखेर्डा, राष्ट्रमाता जिजाऊ कन्या विद्यालय, सिंदखेडराजा, जिल्हा बुलडाणा; मुख्य प्रशासक, महाराष्ट्र राज्य कापूस पणन महासंघ, जिजामाता सहकारी साखर कारखाना लि., दुसरबीड, तालुका सिंदखेडा, संचालक, पैनगंगा सहकारी सूतगिरणी, साखरखेर्डा. तालुका सिंदखेडा, १९९२-२००१ अध्यक्ष, बुलडाणा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक १९९३ संचालक, महाराष्ट्र राज्य सहकारी बँक, २००७ संचालक, (बिनविरोध) महाराष्ट्र राज्य मार्केटिंग फेडरेशन मुंबई; १९८५ अध्यक्ष, जिल्हा युवक काँग्रेस, जुलै २००४ पासून सरचिटणीस, महाराष्ट्र प्रदेश राष्ट्रवादी काँग्रेस, १९९५-९९, १९९९-२००४, २००४-२००९, **अध्यक्ष :** राजमाता जिजाऊ मुलींची सैनिकी शाळा, चांधई, ता. चिखली. अध्यक्षः (१९९० ते २००५) सहकार महर्षी स्व.भास्कररावजी शिंगणे नागरी सहकारी पतसंस्था म. बुलडाणा, अध्यक्ष (२०१५ पासून) : दि. विदर्भ को-ऑपरेटिव्ह मार्केटिंग फेडरेशन लि. नागपूर. १९९५ ते १९९८ दरम्यान विधिमंडळाच्या लोकलेखा, सार्वजनिक उपक्रम व अंदाज समितीवर सदस्य. २००९-१४ सदस्य, महाराष्ट्र विधानसभा, मार्च २००१ ते जुलै २००२ शालेय शिक्षण, पणन, माहिती व जनसंपर्क खात्याचे राज्यमंत्री; जुले २००२ ते जानेवारी २००३ शालेय शिक्षण, पणन खात्याचे राज्यमंत्री; जानेवारी २००३ ते जुलै २००४ शालेय शिक्षण राज्यमंत्री, १६ नोव्हेंबर २००४ ते डिसेंबर २००८ महसूल, पुनर्वसन, माहिती व जनसंपर्क, भूकंप पुनर्वसन व मदत कार्य, क्रीडा व युवक कल्याण व माजी सैनिकांचे कल्याण खात्यांचे राज्यमंत्री, डिसेंबर २००८ ते ऑक्टोबर २००९ सार्वजनिक आरोग्य व कुटुंबकल्याण खात्याचे मंत्री; ऑक्टोबर २०१९ मध्ये महाराष्ट्र विधानसभेवर फेरनिवड.

शैक्षणिक, सामाजिक, सांस्कृतिक तसेच सहकार क्षेत्रात भरीव कामगिरी. युवकांना रोजगार मिळावा यासाठी विविध सहकारी संस्थांची पायाभरणी केली. शेतकऱ्यांच्या प्रश्नांची चांगली जाण असल्याने त्यांच्यासाठी विविध योजना व कार्यक्रम राबवले. महिला व युवकांना रोजगार उपलब्ध करून दिला.

**संदर्भः १२ वी महाराष्ट्र विधानसभा सदस्यांचा संक्षिप्त जीवन परिचय**

## श्री. नवाब मोहम्मद इस्लाम मलिक

**जन्म :** २० जून १९५९ **जन्म ठिकाण :** धुसवा / इटई - रामपूर, तालुका उतरौला, जिल्हा - बलरामपूर (उत्तर प्रदेश) **शिक्षण :** एफ. वाय. बी. ए. **ज्ञात भाषा :** मराठी, हिंदी, इंग्रजी व उर्दू. **वैवाहिक माहिती :** विवाहित, पत्नी श्रीमती मेहजबीन **अपत्ये :** एकूण ४ (दोन मुलगे दोन मुली) **व्यवसाय :** व्यापार **पक्ष :** राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष **मतदारसंघ :** १७२ - अणुशक्ती नगर, जिल्हा - मुंबई उपनगर.



**इतर माहिती :** सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रात भरीव योगदान. विद्यार्थ्यांच्या प्रश्नांसाठी सदैव पुढाकार. वंचित आणि उपेक्षित घटकातील विद्यार्थ्यांना हक्काचे आणि दर्जेदार शिक्षण उपलब्ध करून देणयासाठी विशेष प्रयत्न. अध्यक्ष, ह्युमन वेल्फेअर ऑर्गनायझेशन, रक्तदान शिबिरे, छात्र आंदोलन, विद्यापीठीय शिक्षण फी वाढ विरोधी आंदोलन, विद्यार्थी. संसद आंदोलनात सक्रिय सहभाग; १९९३-९५ सामाजिक ऐक्य - अखंडता व धार्मिक सद्भावना व जातीय सलोखा वाढवण्यासाठी विविध कार्यक्रमांचे आयोजन, १९९८ मुंबई सेंट्रल रेल्वे स्थानकावरील रेल रोको आंदोलनात सक्रिय सहभाग; १८७ कोटी रुपयांचा उड्डाण पूल प्रस्ताव मंजुरीसाठी प्रयत्न; कुर्ला (प.) कमानी जंक्शन अग्निशमन केंद्र सुरू केले; झोपडपट्टीधारकांना फोटो पाससाठी मदत; झोपडपट्टी रहिवाशांना मोफत घरे मिळवून देण्यासाठी प्रयत्न; रेल्वेलाईन झोपडपट्टी रहिवाशांच्या पुनर्वसन कार्यात मदत, राज्यातील तृतीयपंथीयांना विशेष साहाय्य योजनेंतर्गत दरमहा मानधन देण्यासाठी विशेष प्रयत्न, १९९६-९९ (पो. नि.), १९९९-२००४, २००४-२००९, २०१९-१४ सदस्य, महाराष्ट्र विधानसभा; ऑक्टोबर १९९९ ते ऑक्टोबर २००४ गृहनिर्माण, झोपडपट्टी सुधारणा व गलिच्छवस्ती सुधारणा, विशेष साहाय्य व औकाफ खात्याचे राज्यमंत्री; जुलै २००४ ते ऑक्टोबर २००४ विशेष साहाय्य व तंत्रशिक्षण खात्याचे मंत्री; नोव्हेंबर २००४ ते मार्च २००५ कामगार खात्याचे मंत्री; ऑक्टोबर २०१९ मध्ये महाराष्ट्र विधानसभेवर फेरनिवड.

---

## श्री. राजेश अंकुशराव टोपे

**जन्म :** ११ जानेवारी १९६९ **जन्म ठिकाण :** औरंगाबाद **शिक्षण :** बी. ई. (मेकॅनिकल) **ज्ञात भाषा :** मराठी, हिंदी, इंग्रजी. **वैवाहिक माहिती :** विवाहित, पत्नी श्रीमती मनीषा. **अपत्ये :** एकूण १ (एक मुलगा) **व्यवसाय :** शेती. **पक्ष :** राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी **मतदारसंघ :** १०० - घनसावंगी, जिल्हा जालना.



**इतर माहिती :** १९९१-९५ कार्यकारिणी सदस्य, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद; सचिव, मत्स्योदरी शिक्षण संस्था, जालना; अध्यक्ष, खोलेश्वर बहुउद्देशीय संस्था, अंकुशनगर, जालना या संस्थेतर्फे सामुदायिक विवाहाचे आयोजन; १९९७ पासून अध्यक्ष, समर्थ सहकार साखर कारखाना लि., अंकुशनगर; १९९४ पासून संस्थापक-अध्यक्ष, यशवंत सहकारी सूत गिरणी लि.. अंबड; १९९५ पासून संचालक, दि महाराष्ट्र स्टेट को.-ऑप. हाऊसिंग फायनान्स कार्पोरेशन, मुंबई; अध्यक्ष, समर्थ सहकारी बँक, जालना; सदस्य व १९९६ ते ऑक्टोबर १९९९ विरोधी पक्ष नेता, जिल्हा परिषद, जालना; १९९६ राष्ट्रीय युवक काँग्रेसच्या नेतृत्वाखाली जेल भरो आंदोलनात सहभागः १९९७ बेरोजगार युवकांच्या आंदोलनात अटक; १९९२-९६ अध्यक्ष, जालना जिल्हा युवक काँग्रेस (आय); १९९६-९९ उपाध्यक्ष, महाराष्ट्र प्रदेश युवक काँग्रेस (आय); मे १९९९ पासून राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे कार्य; १९९९-२००४, २००४-२००९, २००९-२०१४, २०१४-२०१९ सदस्य, महाराष्ट्र विधानसभा मार्च २००१ ते जानेवारी २००३ जलसंधारण, व्यापार, वाणिज्य आणि पर्यावरण खात्याचे राज्यमंत्री; जानेवारी २००३ ते जुले २००४ पर्यावरण व उद्योग खात्याचे राज्यमंत्री; नोव्हेंबर २००४ ते डिसेंबर २००८ नगरविकास, सामान्य प्रशासन, नागरी जमीन कमालधारणा, जलसंधारण व संसदीय कार्य खात्याचे राज्यमंत्री; डिसेबर २००८ ते ऑक्टोबर २००९ उच्च व तंत्रशिक्षण वैद्यकीय शिक्षण खात्याचे मंत्री नोव्हेंबर २००९ ते सप्टेंबर, २०१४ उच्च व तंत्र शिक्षण खात्याचे मंत्री; ऑक्टोबर २०१९ मध्ये महाराष्ट्र विधानसभेवर फेरनिवड.

१९९४ व २०१० मध्ये त्यांनी अनुक्रमे लंडन व ऑस्ट्रेलियाचा दौरा केला. शैक्षणिक क्षेत्रात त्यांनी आपले भरीव योगदान दिले आहे. विविध संस्थांच्या माध्यमातून युवकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून दिल्या. कौशल्य विकास कार्यक्रम राबवले. विविध शिक्षण संस्थाची उभारणी करून उच्च शिक्षणाच्या संधी उपलब्ध करून दिल्या.

विविध सहकारी संस्थांच्या माध्यमातून शेतकऱ्यांचे जीवनमान उंचावण्यासाठी विशेष प्रयत्न, विशेषतः महिलांचे सबलीकरण करून त्यांना आत्मनिर्भर करण्यावर भर, ग्रामीण पतपुरवठा सुधारण्यासाठी विशेष कार्य.

**संदर्भः १३ वी महाराष्ट्र विधानसभा सदस्यांचा संक्षिप्त जीवन परिचय**

## श्री. सुनील छत्रपाल केदार

**जन्म :** ७ एप्रिल १९६१ **जन्म ठिकाण :** नागपूर **शिक्षण :** बी. एस्सी. (कृषी), एम. बी. ए. **ज्ञात भाषा :** मराठी, हिंदी व इंग्रजी **वैवाहिक माहिती :** विवाहित, पत्नी श्रीमती अनुजा **अपत्ये :** एकूण २ (दोन मुली) **व्यवसाय :** शेती व लघुउद्योग **पक्ष :** भारतीय राष्ट्रीय काँग्रेस (आय) **मतदारसंघ :** ४९ - सावनेर, जिल्हा नागपूर.



**इतर माहिती :** १९९२ सदस्य, जिल्हा परिषद, नागपूर, १९९२ अध्यक्ष, गणेश प्रासादिक शिक्षण संस्था; या संस्थेद्वारे ४ माध्यमिक शाळा व महाविद्यालय सुरू केले; दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांच्या समस्या सोडविण्यासाठी सतत प्रयत्नरत; संचालक, दि विदर्भ को-ऑप. मार्केटिंग सोसायटी नागपूर; संचालक, श्री बाबासाहेब केदार जिनिंग प्रेसिंग सोसायटी सावनेर; संचालक, बॅरिस्टर शेषराव वानखेडे ट्रस्ट, नागपूर; नागपूर जिल्ह्यातील दूध संघाची स्थापना केली; नागपूर जिल्ह्यात शेतकऱ्यांच्या विविध प्रश्नांसाठी शेतकरी, शेतमजूर व कामगारांच्या मेळाव्याचे आयोजन; दुर्गम भागातील वीज समस्या, शेतीमालाला योग्य भाव मिळावा यासाठी प्रयत्नरत; युवकांना संघटित करून कला, क्रीडा व सांस्कृतिक मंडळे स्थापन केली; ग्रामीण भागातील जनतेसाठी पाणीपुरवठा, रस्ते, आरोग्य इत्यादी सुविधा मिळवून देण्यासाठी प्रयत्न; गरीब रुग्णांना मदत; अध्यक्ष, नागपूर जिल्हा कापूस उत्पादक सहकारी सूतगिरणी, पाटण-सावंगी; १९९३ अध्यक्ष, नागपूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक; संचालक, बॅ. शेषराव वानखेडे ट्रस्ट १९९५-९९, २००४-२००९,२००९-२०१४,२०१४-२०१९ सदस्य, महाराष्ट्र विधानसभा; मार्च १९९५ ते जून १९९५ ऊर्जा आणि परिवहन खात्याचे राज्यमंत्री, जून १९९५ ते १९९६ ऊर्जा, परिवहन आणि बंदरे खात्याचे राज्यमंत्री; ऑक्टोबर २०१९ मध्ये महाराष्ट्र विधानसभेवर फेरनिवड.

**संदर्भः १३ वी महाराष्ट्र विधानसभा सदस्यांचा संक्षिप्त जीवन परिचय**

---

## श्री. संजय दुलिचंद राठोड

**जन्म :** ३० जून, १९७१ **जन्म ठिकाण :** यवतमाळ **शिक्षण :** बी.कॉम., बी.पी.एड. **ज्ञात भाषा :** मराठी, हिंदी व बंजारा **वैवाहिक माहिती :** विवाहित, पत्नी श्रीमती शीतल **अपत्ये :** एकूण २ (एक मुलगा व एक मुलगी) **व्यवसाय :** शेती **पक्ष :** शिवसेना **मतदारसंघ :** ७९-दिग्रस, जिल्हा यवतमाळ



**इतर माहिती :** संघटनकौशल्याचे कसब, दांडगा जनसंपर्क आणि प्रबळ इच्छाशक्तीच्या जोरावर त्यांनी ग्रामपंचायत, पंचायत समिती, जिल्हा परिषद अशी कोणतीही निवडणूक न लढविता थेट विधानसभा निवडणूक लढवली. २००४ मध्ये दारव्हा मतदारसंघातून विजयी; सचिव, छत्रपती शिवाजी कला, शिक्षण क्रीडा, कृषी व ग्रामीण विकास प्रतिष्ठान, शिवपुरी, तालुका कळंब, जिल्हा यवतमाळ; आर्थिकदृष्ट्या मागासलेल्या विद्यार्थ्यांना शालोपयोगी साहित्याचे वाटप; आदिवासींसाठी नृत्य व लोकनृत्य स्पर्धांचे आयोजन; प्लास्टिकमुक्ती, मच्छरमुक्ती अभियानांचे आयोजन; कुपोषित बालकांना दूध पावडर व बिस्किटांचे वितरण; आत्महत्या केलेल्या शेतकऱ्यांच्या कुटुंबीयांना आर्थिक मदत; गरीब गरजू रुग्णांना सर्वोतोपरी मदत; सहकाराच्या माध्यमातून जनतेच्या विकासासाठी विशेष प्रयत्न; ग्रामविकास सहकारी संस्था, आदिवासी सहकारी संस्था, विविध कार्यकारी संस्था, जिनिंग प्रेसिंग सहकारी संस्था, तालुका देखरेख सहकारी संस्था, खरेदी-विक्री सहकारी संस्था, कृषी उत्पन्न बाजार समितीच्या कार्यात सक्रिय सहभाग; १९९१ पासून शिवसेनेचे कार्य; १९९७ जिल्हा प्रमुख, शिवसेना यवतमाळ जिल्हा; शिवसेनेच्या सर्व आंदोलनात सक्रिय सहभाग; विदर्भस्तरीय आदिवासी परिषद, बंजारा समाज मेळावा व सरपंच परिषदेचे आयोजन; निराधारांना अनुदानासाठी तसेच पाणी प्रश्न व शेतकऱ्यांचे प्रश्न सोडवण्यासाठी धरणे तसेच अन्याय अत्याचाराच्या विरोधात आंदोलने केली; २००४-२००९,२००९-२०१४, सदस्य, महाराष्ट्र विधानसभा; सदस्य, पंचायत राज समिती व उपविधान समिती; ५ डिसेंबर २०१४ पासून महसूल खात्याचे राज्यमंत्री; २०१४-२०१९ सदस्य, महाराष्ट्र विधानसभा; ऑक्टोबर २०१९ मध्ये महाराष्ट्र विधानसभेवर फेरनिवड.

रुग्णांसाठी 'माँ आरोग्य सेवा समिती'ची स्थापना, वैद्यकीय महाविद्यालयाच्या परिसरात रुग्णांच्या नातेवाईकांसाठी सर्व सोयींनी सुसज्ज असे 'मातोश्री प्रतीक्षालय व विश्रामगृह' बांधले, मतदारसंघातील २३४ गावांमध्ये नेत्र तपासणी शिबिरे, ३४ हजार रूग्णांना चष्मे वाटप, मतदारसंघात नियमितपणे 'महाआरोग्य' शिबिराचे आयोजन आदी सामाजिक कार्यात पुढाकार.

प्रशासन सुशासन व्हावे, नागरिकांच्या समस्या तत्काळ निकाली निघून त्यांचा वेळ, श्रम व पैसा बचत व्हावा म्हणून जिल्ह्यात उपविभागीय स्तरावर 'जनता दरबार' अर्थात समाधान दिवसाचे आयोजन.

**संदर्भः १३ वी महाराष्ट्र विधानसभा सदस्यांचा संक्षिप्त जीवन परिचय**

## श्री. गुलाबराव रघुनाथ पाटील

**जन्म :** ५ जून, १९६७ **जन्म ठिकाण :** बोरखेडा, तालुका-धरणगाव, जिल्हा-जळगाव. **शिक्षण :** एच. एस. सी. **ज्ञात भाषा :** मराठी, हिंदी, इंग्रजी व मारवाडी **वैवाहिक माहिती :** विवाहित, पत्नी श्रीमती माया **अपत्ये :** एकूण ३ (दोन मुलगे व एक मुलगी) **व्यवसाय :** शेती व व्यापार **पक्ष :** शिवसेना **मतदारसंघ :** १४-जळगाव (ग्रामीण), जिल्हा-जळगाव



**इतर माहिती :** गरीब व दिव्यांग विद्यार्थ्यांना शिक्षण मिळावे आणि त्यातून त्यांचे सक्षमीकरण व्हावे यासाठी सर्वोतोपरी मदत कार्य; रक्तदान शिबिरांचे आयोजन; गरीब, गरजू रुग्णांना आरोग्यसेवा मिळावी यासाठी सर्वतोपरी मदत; सामाजिक अन्यायाविरुद्धच्या जनआंदोलनात सक्रिय सहभाग; १९९२-९७ सदस्य, पंचायत समिती; १९९७-९८ सदस्य व सभापती, पंचायत समिती, एरंडोल; १९९७ सदस्य व सभापती, कृषी समिती जिल्हा परिषद, जळगाव १९९५-९७ संचालक, कृषी उत्पन्न बाजार समिती, धरणगाव; १९९६-९९ सदस्य, म्हाडा नाशिक विभाग; १९८४-८९ शिवसेना पक्षाचे शाखाप्रमुख, उप तालुका प्रमुख व १९९६ जिल्हाप्रमुख, २००३ उपनेता म्हणून कार्य ; १९९९-२००४, २००४-२००९, २०१४-२०१९ सदस्य, महाराष्ट्र विधानसभा; विधानमंडळाच्या पंचायत राज, रोजगार हमी, अंदाज समिती, आश्वासन समितीचे सदस्य; ऑक्टोबर, २०१९ मध्ये महाराष्ट्र विधानसभेवर फेरनिवड. राज्याच्या मंत्रिमंडळाचे सदस्य म्हणून त्यांनी अनेक महत्वपूर्ण निर्णय घेतले. संघटनेच्या माध्यमातून लोकसंग्रह आणि त्या माध्यमातून विविध प्रश्नांच्या सोडवणुकीसाठी प्रयत्न. शेतीच्या आधुनिकीकरणातून शेतकऱ्यांच्या समस्या सोडविल्या पाहिजेत यासाठी आग्रही, त्यासाठी विविध योजना प्रभावीपणे राबवण्यासाठी प्रयत्नशील.

**संदर्भः १३ वी महाराष्ट्र विधानसभा सदस्यांचा संक्षिप्त जीवन परिचय**

---

## श्री. अमित विलासराव देशमुख

**जन्म :** २१ मार्च, १९७६ **शिक्षण :** बी.ई.(केमिकल) **ज्ञात भाषा :** मराठी, हिंदी व इंग्रजी. **वैवाहिक माहिती :** विवाहित, पत्नी श्रीमती आदिती. **व्यवसाय :** शेती व उद्योग. **पक्ष :** भारतीय राष्ट्रीय काँगेस (आय) **मतदारसंघ :** २३५-लातूर शहर, जिल्हा लातूर.



**इतर माहिती :** १९९७ पासून युवक काँग्रेसचे कार्य, त्या माध्यमातून युवकांचे संघटन, त्यांचे सक्षमीकरण करण्यावर भर; २००० पासून संस्थापक-अध्यक्ष, विकास सहकारी साखर कारखाना लि.; कारखान्यास सात वर्षात राज्यस्तरीय नऊ पुरस्कार मिळवण्यात यश तसेच, आयएसओ व पर्यावरण नामांकन मिळविणारा देशातील एकमेव कारखाना; २००२ व २००८ उपाध्यक्ष, महाराष्ट्र प्रदेश युवक काँग्रेस (आय); सांगली व सोलापूर जिल्ह्याचे प्रभारी; लातूर मतदारसंघात लोकसभा व विधानसभा निवडणुकीच्या वेळी महत्त्वाची जबाबदारी व भूमिका बजावली; २००२ संस्थापक अध्यक्ष, विकास को-ऑप. बँक लि., २००८ संस्थापक अध्यक्ष, विकास को-ऑप ॲग्रो इंडस्ट्रिज लि., २००८ अध्यक्ष, लातूर तालुका समन्वय समिती; २००६ कृषी उत्पन्न समितीची निवडणूक बिनविरोध करण्यात महत्त्वाची भूमिका; गरीब व गरजू विद्यार्थ्यांना शालोपयोगी वस्तूंचे वाटप, आर्थिकदृष्ट्या दुर्बल व गरीब कुटुंबातील व्यक्तींना संसारोपयोगी वस्तूंचे वाटप; दिव्यांगांना सायकलींचे वाटप; पर्यावरण संवर्धन, वृक्षारोपण, पाणपोई सुविधा उपलब्ध करून दिल्या; सामूहिक विवाह सोहळा, तरुणांना मार्गदर्शन शिबिर, आरोग्य तपासणी शिबिरांचे आयोजन; विद्यार्थ्यांसाठी व्यक्तिमत्त्व विकासासाठी वक्तृत्व, निबंध, वादविवाद, रांगोळी व वेषभूषा इत्यादी स्पर्धांचे आयोजन; तरुण नाटककारांना आणि रंगकर्मींना व्यासपीठ मिळावे यासाठी पु. ल. देशपांडे राज्यस्तरीय नाटक स्पर्धांचे आयोजन; संगीत, नाटक, लोककला, लोकनृत्य, भजन स्पर्धांचे आयोजनांतून कलाकारांना व्यासपीठ मिळवून देऊन त्यांच्या कलागुणांना वाव मिळवून दिला; युवकांसाठी विविध उद्योग. व्यवसाय, शेतीपूरक व्यवसाय, जोडधंदा, कृषी यांत्रिकीकरण, दुग्धव्यवसाय यासारखे रोजगार उपलब्ध करून देऊन बेरोजगारी कमी करण्याचा प्रयत्न, विशेषतः तरुणांमधील उद्यमशीलता वाढीस लागावी यासाठी त्यांना आवश्यक ती मदत, ग्रामीण आणि नागरी समस्यांची जाण, त्यांच्या सोडवणुकीसाठी विविध योजनां राबवण्यावर विशेषत्वाने भर, क्रिकेट व्हॉलीबॉल, कबड्डी, खो-खो, धावणे, सायकलिंग इत्यादी स्पर्धांचे आयोजन; महिला, अल्पसंख्याक, मागास व इतर मागासवर्गीयांच्या विकासासाठी विशेष प्रयत्न; २००९-२०१४, २०१४-२०१९ सदस्य, महाराष्ट्र विधानसभा, २ जून २०१४ ते ऑक्टोबर २०१४ पर्यटन, अन्न व औषध प्रशासन राज्य उत्पादन शुल्क, नवीन व नवीकरण ऊर्जा खात्याचे राज्यमंत्री; ऑक्टोबर २०१९ मध्ये महाराष्ट्र विधानसभेवर फेरनिवड.

**संदर्भः १३ वी महाराष्ट्र विधानसभा सदस्यांचा संक्षिप्त जीवन परिचय**

## श्री. दादाजी दगडू भुसे

**जन्म** : ६ मार्च, १९६४ **जन्म ठिकाण** : मालेगांव, जिल्हा नाशिक **शिक्षण** : डी. सी. ई. **ज्ञात भाषा** : मराठी, हिंदी व इंग्रजी **वैवाहिक माहिती** : विवाहित, पत्नी श्रीमती अनिता. **अपत्ये** : एकूण २ (दोन मुलगे) **पक्ष** : शिवसेना **मतदारसंघ** : ११५- मालेगाव बाह्य, जिल्हा-नाशिक




**इतर माहिती** : शिवसेना तालुका प्रमुख, मालेगाव; पक्षाच्या सर्व उपक्रमांत सक्रिय सहभाग; जागर शिवशाहीच्या माध्यमातून सर्वसामान्य माणसांना शासनाच्या विविध योजनांची माहिती दिली; संजय गांधी निराधार योजना, इंदिरा गांधी राष्ट्रीय वृद्धापकाळ निवृत्तिवेतन अनुदान योजना व श्रावणबाळ पक्ष योजनेचे अनुदान लाभार्थ्यांना मिळवून दिले; रस्ते, पिण्याचे पाणी, आरोग्य सुविधा यांसारखी सामाजिक कामे केली; महिला बचतगटाच्या माध्यमातून महिलांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून दिल्या; शासकीय पडिक जागा व गावठाणातील सरकारी जमीन १५,००० लाभार्थ्यींना मिळवून दिली; वनहक्क समितीच्या माध्यमातून वनजमिनी नियमित केल्या; दारिद्र्यरेषेखालील व्यक्तींना मदतः मालेगाव येथे अतिरिक्त जिल्हाधिकारी कार्यालय सुरू करण्यासाठी प्रयत्न; आमआदमी विमा योजना, स्वर्णजयंती ग्रामीण रोजगार योजना राबवली; लोकसहभागातून ए. पी. जे. अब्दुल कलाम बंधारा तयार केला; गरिबांना अल्प किमतीत घरे मिळवून दिली; भारतनिर्माण व राष्ट्रीय पेयजल अंतर्गत पाणीपुरवठा योजना कार्यान्वित केली; सामूहिक विवाह, गोरगरीब रुग्णांना मदत, रक्तदान, आरोग्य तपासणी शिबिरांचे आयोजन रुग्णवाहिका उपलब्ध करून दिली; शालोपयोगी वस्तूंचे वाटप; संगणक प्रशिक्षण केंद्र सुरू केले; जिमखाना सुरू केला; व्यसनमुक्ती व स्वच्छता अभियान राबवले; वनहक्क समितीद्वारे वनजमीन नियमित करणे, जागर शिवशाहीचा कार्यक्रमाच्या माध्यमातून जातीचे दाखले मिळवून देणे इ. कार्य केले; २००४-२००९, २००९-२०१४ सदस्य, महाराष्ट्र विधानसभा; २०१४-२०१९ सदस्य, महाराष्ट्र विधानसभा; सहकार खात्याचे राज्यमंत्री; ऑक्टोबर २०१९ मध्ये विधानसभेवर फेरनिवड.

**संदर्भः १३ वी महाराष्ट्र विधानसभा सदस्यांचा संक्षिप्त जीवन परिचय**

---

## डॉ. जितेंद्र सतीश आव्हाड


**जन्म** : ५ ऑगस्ट १९६३ **जन्म ठिकाण** : नाशिक **शिक्षण** : बी. ए., मास्टर ऑफ लेबर स्टडीज (एम. एल. एस.), पीएच. डी. (मुंबई विद्यापीठ.) **ज्ञात भाषा** : मराठी, हिंदी व इंग्रजी **वैवाहिक माहिती** : विवाहित, पत्नी श्रीमती ऋता **अपत्ये** : एकूण १ (एक मुलगी) **व्यवसाय** : शेती व व्यापार **पक्ष** : राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्ष **मतदारसंघ** : १४९- मुंब्रा - कळवा, जिल्हा ठाणे



**इतर माहिती** : शालेय जीवनापासून सामाजिक कार्यात सहभाग; १९७७ ठाणे येथील सेंट जॉन या शाळेतील स्कूल पार्लमेंटमध्ये पंतप्रधान म्हणून निवड; १९८०-८१ जिमखाना सचिव, बी. एन. बांदोडकर विज्ञान महाविद्यालय, ठाणे; १९८१ सरचिटणीस, ऑल इंडिया स्टुडंट ऑर्गनायझेशन; १९८७-८८ विद्यापीठ प्रतिनिधी, महाराष्ट्र इन्स्टिट्यूट ऑफ लेबर स्टडीज ८ ऑक्टोबर २०१३ रोजी महाराष्ट्रातील सामाजिक, धार्मिक चळवळी या विषयावरील शोधप्रबंधास मुंबई विद्यापीठाकडून डॉक्टरेट पदवी प्राप्त; सिनेट सदस्य, मुंबई विद्यापीठ; संस्थापक, संघर्ष सेवाभावी संस्था, ठाणे; के. लीलावती सतीश आव्हाड एज्युकेशन या संस्थेमार्फत औरंगाबाद येथे एरोनॉटिकल महाविद्यालय तसेच मुखेड, जि. नांदेड येथे डी. एड. कॉलेज सुरू केले; अध्यक्ष, अखिल भारतीय वंजारी युवक संघ; अध्यक्ष, ठाणे जिल्हा योगा असोसिएशन; प्रमुख सल्लागार, कास्ट्राईब जीवन प्राधिकरण व आरोग्य सेवा कर्मचारी व महाराष्ट्र राज्य माथाडी आणि जनरल कामगार संघटनाः अध्यक्ष, महाराष्ट्र बेसबॉल असोसिएशन; अध्यक्ष, इंडियन पायलट गिल्ड कर्मचारी संघटना; ठाणे येथील नवा - ए - फन संस्थेच्या वतीने सामाजिक कार्यातील योगदानाबद्दल जीवन गौरव पुरस्काराने सन्मानित; मुंबई क्रिकेट असोसिएशनच्या घटना उपसमितीवर निवड; अध्यक्ष, ठाणे जिल्हा खो - खो संघटना; १९८८-९१ सरचिटणीस, महाराष्ट्र प्रदेश एन. यु.एस.आय. विद्यार्थी संघटनाः १९९१-९३ सरचिटणीस, अखिल भारतीय एन.यु.एस.आय; १९९३-९८ अध्यक्ष, ठाणे महानगरपालिका शिक्षण मंडळ; १९९३-९६ सरचिटणीस, महाराष्ट्र प्रदेश युवक कॉंग्रेस कमिटी; १९९९-२००६ अध्यक्ष, अखिल भारतीय राष्ट्रवादी युवक कॉंग्रेस कमिटी; २००६ पासून राष्ट्रीय सचिव, अखिल भारतीय राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्ष; २००८ पासून अध्यक्ष, ठाणे शहर राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षः २०१२ प्रवक्ता, राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्ष; २०१३-१४ कार्याध्यक्ष महाराष्ट्र प्रदेश राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षः सदस्य, महाराष्ट विधानमंडळ आश्वासन समिती, आमदार निवास व्यवस्था समिती; २००८ मुख्यप्रतोद, विधानपरिषद राष्ट्रवादी कॉंग्रेस विधिमंडळ पक्ष; २००९ व २०१४ प्रतोद ( विधानसभा ) विधिमंडळ राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्ष; २०१० नवीन युवाधोरण ठरवण्यासाठी शासनाने गठित केलेल्या समितीचे सदस्य; एड्स फोरम समितीचे सदस्य; २०११ सदस्य, राज्यातील खासगी व धर्मादाय रुग्णालय तपासणी विधिमंडळ तदर्थ समिती; २०१२ समिती प्रमुख, उपविधान समिती; डिसेंबर २००९ तालिका अध्यक्ष, विधानसभा; २००२-२००८, २००८-२००९ सदस्य, महाराष्ट्र विधानपरिषद, २००९-२०१४, २०१४-२०१९ सदस्य, महाराष्ट्र विधानसभा; मे २०१४ ते सप्टेंबर, २०१४ वैद्यकीय शिक्षण आणि फलोत्पादन खात्याचे मंत्री; ऑक्टोबर, २०१९ मध्ये महाराष्ट्र विधानसभेवर फेरनिवड.

**संदर्भः १३ वी महाराष्ट्र विधानसभा सदस्यांचा संक्षिप्त जीवन परिचय**

## श्री. संदिपानराव आसाराम भुमरे



**जन्म** : १३ जुलै, १९६३ **जन्म ठिकाण** : पाचोड बु ||, तालुका पैठण, जिल्हा औरंगाबाद. **शिक्षण** : एस. एस. सी. **ज्ञात भाषा** : मराठी, हिंदी व इंग्रजी **वैवाहिक माहिती** : विवाहित, पत्नी श्रीमती पुष्पा **अपत्ये** : एकूण ३ (एक मुलगा व दोन मुलगी) **व्यवसाय** : शेती **पक्ष** : शिवसेना **मतदारसंघ** : ११०-पैठण, जिल्हा औरंगाबाद

**इतर माहिती** : साक्षरता अभियान कार्यक्रमात सहभाग; ग्रामीण भागात प्राथमिक शाळा सुरू करण्यासाठी प्रयत्न; वंचित आणि उपेक्षित घटकातील विद्यार्थ्यांना दर्जेदार आणि हक्काचे शिक्षण मिळावे यासाठी सातत्याने प्रयत्नशील; संघटनेच्या माध्यमातून तरुणांचे संघटन करून त्यांना उद्यमशील आणि सामाजिकदृष्ट्या जागरुत करण्यासाठी विशेष प्रयत्न; महिलांचे सक्षमीकरण व्हावे आणि समाजातील वाईट प्रथांचे निर्मूलन व्हावे यासाठी हुंडाविरोधी चळवळ राबवली; शेतकरी आणि कष्टकरी समाजातील मुलींच्या खर्चाचा भार कुटुंबावर पडू नये त्याबरोबरच हुंड्यासारख्या अनिष्ठ प्रथांचे निर्मूलन व्हावे, यासाठी सामूहिक विवाहांचे आयोजन; ग्रामीण भागातील कलाकारांना हक्काचे व्यासपीठ उपलब्ध व्हावे आणि त्यांच्या कलागुणांना वाव मिळावा यासाठी नाट्य स्पर्धा; तरुणांमधील खिलाडूवृत्ती वाढावी त्याबरोबरच मन, मेंदू आणि मनगट बळकट व्हावे यासाठी कबड्डी, क्रिकेट, व्हॉलीबॉल स्पर्धांचे आयोजन; आपल्या उच्च सांस्कृतिक वारशाचे जतन व्हावे यासाठी प्रयत्नशील त्याबरोबरच लेजीम पथक व व्यायाम शाळा सुरू करून तरुणांमधील सांधिकभाव वृद्धिंगत करण्यासाठी प्रयत्नशील; १९८९ शिवसेना शाखाप्रमुख व सर्कलप्रमुख, पाचोड; १९८९-९४ सदस्य, ग्रामपंचायत, पाचोड; १९९२-९४ उपसभापती, पंचायत समिती, पैठण; संचालक, औरंगाबाद जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक; १९९३-२०१४ संचालक, संत एकनाथ सहकारी साखर कारखाना, पैठण; १९९५-९९, १९९९-२००४, २००४-२००९, २०१४-२०१९ सदस्य, महाराष्ट्र विधानसभा; ऑक्टोबर २०१९ मध्ये महाराष्ट्र विधानसभेवर फेरनिवड.

**संदर्भः १३ वी महाराष्ट्र विधानसभा सदस्यांचा संक्षिप्त जीवन परिचय**

---

## श्री. शामराव ऊर्फ बाळासाहेब पांडुरंग पाटील



**जन्म** : २९ जुलै, १९६१ **जन्म ठिकाण** : कराड, जिल्हा सातारा **शिक्षण** : एफ. वाय. बी. ए. **ज्ञात भाषा** : मराठी, हिंदी, इंग्रजी. **वैवाहिक माहिती** : विवाहित, पत्नी श्रीमती जयमाला. **अपत्ये** : एकूण १ (एक मुलगा) **व्यवसाय** : शेती व सामाजिक कार्य **पक्ष** : राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी **मतदारसंघ** : २५९- कराड (उत्तर), जिल्हा सातारा

**इतर माहिती** : शेतकरी आणि ऊसतोड मजुरांच्या कल्याणासाठी विविध उपक्रमांच्या माध्यमातून प्रयत्नशील; शेतीच्या आधुनिकीरणासाठी प्रयत्नशील; शेतीमधील उत्पादन खर्च कमी व्हावा आणि उत्पादकता वाढीस लागावी यासाठी प्रयत्न; वंचित आणि उपेक्षित घटकातील विद्यार्थ्यांना हक्काचे आणि दर्जेदार शिक्षण मिळावे यासाठी विविध संस्थांच्या माध्यमातून कार्यरत; संघटनेच्या माध्यमातून तरुणांचे आणि महिलांचे सक्षमीकरण व्हावे यासाठी कार्यरत; ग्रामीण समस्यांच्या सोडवणुकीसाठी विशेष प्रयत्न; शेतकरी, मजूर यांना हक्काचा पतपुरवठा व्हावा त्यातून शेतीतील आणि ग्रामीण कुटीर व्यवसायातील गुंतवणूक वाढावी यासाठी संस्थात्मक कार्य; बेरोजगार तरुणांना रोजगार मिळवून देण्यासाठी प्रयत्नशील; २००८ पासून अध्यक्ष, सह्याद्री शिक्षण संस्था, यशवंतनगर; २००२ पासून अध्यक्ष, महाराष्ट्र एज्युकेशन संस्था, कराड; १९९४ पासून गव्हर्निंग कौन्सिल सदस्य, शिक्षण मंडळ; २००५ पासून कार्यकारी विश्वस्त, वेणुताई चव्हाण चॅरिटेबल पब्लिक ट्रस्ट, कराड, २०१३ पासून अध्यक्ष, श्री शिवाजी एज्युकेशन सोसायटी, कराड, २०१४ पासून अध्यक्ष, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई विभागीय केंद्र, कराड; १९९२ पासून संचालक व १९९६ पासून चेअरमन, सह्याद्री सहकारी साखर लि., यशवंतनगर; या कारखान्यास राष्ट्रीय साखर संघाकडून १९९८-९९ चा केन डेव्हलमेंट द्वितीय क्रमांक ॲवार्ड; २०११-१२ उत्कृष्ट आर्थिक व्यवस्थापन प्रथम पुरस्कार; २०१२-१२ चा तिसरा तसेच केन डेव्हलमेंटचा तृतीय पुरस्कार मिळवला; १९९४-९६ चेअरमन, सह्याद्री ऊस उत्पादक व तोडणी वाहतूक संस्था; अध्यक्ष, पी. डी. पाटील सहकारी बँक लि., कराड; चेअरमन, संजीवनी नागरी सहकारी पतसंस्था, कराड, चेअरमन, कृष्णाई सहकारी दूध उत्पादक संस्था, कराड, २०१० पासून संचालक, राष्ट्रीय सहकारी साखर कारखाना संघ, नवी दिल्ली; डिसेंबर २००३ पासून उपाध्यक्ष, महाराष्ट्र राज्य सहकारी साखर कारखाना संघ, मुंबई, १९९२-९९ काँग्रेस पक्षाचे कार्य, १९९९ पासून राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे कार्य १९९९-२००४, २००४-२००९, २००९-२०१४, २०१४-२०१९ सदस्य, महाराष्ट्र विधानसभा; २०१२-१४ समिती प्रमुख अंदाज समिती; ऑक्टोबर २०१९ मध्ये महाराष्ट्र विधानसभेवर फेरनिवड.

**परेदश प्रवास** : मॉरिशस, ब्राझिल, इंग्लंड, इटली, ऑस्ट्रेलिया, सिंगापूर इत्यादी देशांचा अभ्यास दौरा.

**संदर्भः १३ वी महाराष्ट्र विधानसभा सदस्यांचा संक्षिप्त जीवन परिचय**

## ॲड. यशोमती ठाकूर (सोनवणे)

**जन्म** : १७ मे १९७४ **जन्म ठिकाण** : अमरावती **शिक्षण** : बी. ए., एलएल.बी. **ज्ञात भाषा** : मराठी, हिंदी व इंग्रजी **वैवाहिक माहिती** : विवाहित, पती कै. राजेश सोनवणे **अपत्ये** : एकूण २ (एक मुलगा व एक मुलगी) **व्यवसाय** : शेती. **पक्ष** : भारतीय राष्ट्रीय काँग्रेस (आय) **मतदारसंघ** : ३९-तिवसा, जिल्हा अमरावती.



**इतर माहिती** : १९८९ ड्युक ऑफ एडनबर्गचे ब्राँझ पदक प्राप्त; १९९३ ऑल इंडिया एन . सी . सी.च्या बेसिक लीडरशीप कॅम्पमध्ये नेमबाजीचे सुवर्णपदक प्राप्त; १९९४ मध्ये प्रजासत्ताक दिनाच्या दिल्ली येथील मार्चिंगमध्ये सहभाग; ग्रामीण भागातील गुणात्मक शिक्षण विकासासाठी गरीब, गरजू विद्यार्थ्यांना शालोपयोगी वस्तूंचे वाटप व ग्रामीण भागातील २६२ माध्यमिक शाळांमधील ग्रंथालयांना विविध उपयुक्त विषयांवरील पुस्तकांचे वाटप; तसेच मुलांच्या व्यक्तिमत्त्व विकासासाठीच्या विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करून त्यांच्यात गुणात्मक फरक निर्माण करण्यासाठी प्रयत्न; ग्रामीण भागातील महिला व बालकांच्या नित्याच्या विविध समस्या सोडविण्यासाठी सातत्याने प्रयत्नरत; समाजातील गरजू आणि गरीबांना कायदेविषयक सल्ला व मागदर्शन देऊन त्यांच्या समस्यांचे निराकरण करण्यासाठी सातत्याने प्रयत्नशील; भूकंपग्रस्तांना मदत, विविध सामाजिक कार्यक्रमांचे आयोजन करून समाज प्रबोधन करण्यासाठी महत्त्वाचे कार्य. मुलांमध्ये सांघिक भावना वाढीस लागण्यासाठी क्रीडाविषयक मार्गदर्शन, तरुणांमध्ये खिलाडूवृत्ती जागी व्हावी, त्याबरोबरच त्यांच्यातील खेळाडूला एक सक्षम व्यासपीठ उपलब्ध व्हावे यासाठी विविध क्रीडा स्पर्धांचे आयोजन; गरीब रुग्णांना आरोग्यसेवा मिळावी यासाठी विविध उपक्रमांच्या माध्यमातून मदत, ग्रामीण महिलांच्या आथिक उन्नतीतून त्यांचे सक्षमीकरण करण्यासाठी बचत गटांची चळवळ रुजवण्यावर भर; रुक्मिणीचे माहेर श्रीक्षेत्र कौंडण्यपूरचा विकास करून कार्तिकी एकादशीला शासकीय पूजा सुरू केली; संत तुकडोजी महाराज व संत गाडगेबाबा यांच्या कर्मभूमी व निर्वाण भूमीचा सर्वांगीण विकास केला; २००४-२००८ सरचिटणीस, महाराष्ट्र प्रदेश युवक काँग्रेस; २००७ पासून सचिव, महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कायदेविषयक सल्लागार समिती; २००८ पासून सरचिटणीस, अखिल भारतीय युवक काँग्रेस; २०१०-२०१४ जनरल सेक्रेटरी, महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटी २००४ पासून सदस्या, महाराष्ट्र राज्य महिला आयोग; २००९-२०१४, २०१४-२०१९ सदस्या, महाराष्ट्र विधानसभा; २०१०-२०१२ समिती प्रमुख, महिलांचे हक्क व कल्याण समिती; ऑक्टोबर २०१९ मध्ये महाराष्ट्र विधानसभेवर फेरनिवड.

**संदर्भ: १३ वी महाराष्ट्र विधानसभा सदस्यांचा संक्षिप्त जीवन परिचय**

---

## ॲड. अनिल दत्तात्रय परब

**जन्म** : ३१ डिसेंबर १९६४. **जन्मठिकाण** : मुंबई, **शिक्षण** : बी. कॉम. एलएल.बी. **ज्ञात भाषा** : मराठी, हिंदी व इंग्रजी. **वैवाहिक माहिती** : विवाहित, पत्नी श्रीमती सुनिता. **अपत्ये** : एकूण २ (दोन मुली). **व्यवसाय** : उद्योग. **पक्ष** : शिवसेना. **मतदारसंघ** : महाराष्ट्र विधानसभा सदस्यांद्वारा निर्वाचित.



**इतर माहिती** : संघटनेच्या माध्यमातून सामाजिक व सांस्कृतिक कार्य; गरीब, गरजू विद्यार्थ्यांना शालोपयोगी साहित्यांचे वाटप; गरीब रुग्णांना सर्वतोपरी आरोग्य सेवा मिळावी यासाठी कायम तत्पर, दहीहंडी, गणेशोत्सव, नवरात्रोत्सव कार्यक्रमांच्या आयोजनातून तरुणाईमध्ये संघटन कौशल्य वाढीस लागावे, त्यांच्यातील विविध कला-गुणांना वाव मिळावा याबरोबरच त्यांच्यातील सामाजिक जाणिवा वाढीस लागाव्या यासाठी प्रयत्नशील; आरोग्य तपासणी, रक्तदान शिबिरांचे आयोजन; गरीब वंचित आणि सर्वसामान्य घटकांतील नागरिकांना कायदेविषयक मोफत सल्ला देऊन त्यांचे हक्क त्यांना मिळवून देण्यासाठी मदत; विविध क्रीडा स्पर्धांचे तसेच सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन; बांद्रा येथील शासकीय वसतिगृहाच्या समस्या सोडवण्याचा प्रयत्न; स्पर्धा परीक्षांसाठी मार्गदर्शन शिबिराचे आयोजन; २००१ पासून शिवसेना विभागप्रमुख, पक्षाच्या कायदेविषयक कामाची जबाबदारी, पक्षाच्या सर्व आंदोलनात सक्रिय सहभाग; २००४-२०१०, २०१२-२०१८ सदस्य, महाराष्ट्र विधानपरिषद; जुलै २०१८ मध्ये विधानपरिषदेवर फेरनिवड. विधान परिषदेत विविध प्रश्न मांडून सर्वसामान्यांचे प्रश्न ऐरणीवर आणण्याचे महत्त्वाचे कार्य. विधिमंडळात एक अभ्यासू आणि राज्याच्या प्रश्नांची आणि राज्याच्या बलस्थानाची उत्तम जाण, याबरोबरच मुंबई महानगरीच्या विविध प्रश्नांच्या सोडवणुकीसाठी आग्रही, मुंबईतील झोपडपट्टी आणि दुर्लक्षित वस्त्यांच्या विकासासाठी सातत्याने पाठपुरावा करणारा नेता म्हणून ओळख. महाविद्यालयीन जीवनापासूनच विद्यार्थी संघटनेचे काम करणाऱ्या श्री. परब यांनी तरुणांच्या संघटनेतून विविध सामाजिक, सांस्कृतिक कार्य केले आहे. नागरी समस्यांची जाण असलेल्या श्री परब यांनी त्यांच्या सोडवणुकीसाठी सुचवलेले उपायही महत्त्वाचे आहेत. वंचित आणि गरजू लोकांच्या मदतीसाठी कायम तत्पर असलेल्या श्री. परब यांचा लोकसंग्रह दांडगा आहे.

## श्री. उदय रवींद्र सामंत

**जन्म** : २६ डिसेंबर, १९७५ **जन्म ठिकाण** : गोवा. **शिक्षण** : डिप्लोमा इन ऑटोमोबाईल इंजिनिअरिंग. **ज्ञात भाषा** : मराठी, हिंदी व इंग्रजी **वैवाहिक माहिती** : विवाहित, पत्नी श्रीमती जया **अपत्ये** : एकूण २ (दोन मुली) **व्यवसाय** : शेती व व्यापार **पक्ष** : शिवसेना **मतदारसंघ** : २६६-रत्नागिरी, जिल्हा रत्नागिरी.

**इतर माहिती** : अध्यक्ष, रत्नागिरी जिल्हा क्रिकेट असोसिएशन; श्रीसाई अनिरुद्ध एज्युकेशन सोसायटी (इंग्रजी माध्यम शाळा, औद्योगिक प्रशिक्षण संस्था व महाविद्यालय सुरू केले), पाली पंचक्रोशी विविध कार्यकारी सोसायटी व रत्नागिरी जिल्हा कला व सांस्कृतिक कलाकार संघटना; उपाध्यक्ष, रत्नागिरी जिल्हा ऑटो चालक, मालक संघटना; संस्थापक, शांतादुर्गा नागरी सहकारी पतसंस्था, रत्नागिरी; २०००-२००३ अध्यक्ष, रणजित ग्रामीण बिगर शेती सहकारी पतसंस्था व लोकमान्य ग्राहक सहकारी संस्था, पाली; संस्थापक सदस्य, अभिनव स्वयंरोजगार सेवा सहकारी संस्था; संस्थापक, ज्ञानज्योती सार्वजनिक ग्रंथालय, पाली; मुख्य प्रवर्तक, नियोजित रत्नागिरी स्वयंरोजगार सेवा संस्था फेडरेशन; सल्लागार, सह्याद्री स्वयंरोजगार सेवा सहकारी संस्था; संस्थापक, श्रीलक्ष्मी पल्लिनाथ ग्राहक सहकारी संस्था व नियोजित रत्नागिरी तालुका अपंग पुनर्वसन सेवा संस्था मर्यादित; २००० मध्ये रत्नागिरीमध्ये राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वतीने खादी ग्रामोद्योग शिबिराचे आयोजन; चाटे क्लासेस विरोधी मोर्चात सहभाग; जयहिंद संस्था स्थापन करून या संस्थेमार्फत रक्तदान शिबिर कार्यक्रमाचे आयोजन जिल्हास्तरीय जाखडी स्पर्धेचे आयोजन; गरीब रुग्णांना मदत; स्वामी विवेकानंद व्याख्यानमालेचे आयोजन; गरीब व होतकरू विद्यार्थ्यांना शालोपयोगी वस्तूंचे वाटप; गरीब व गरजूंना दिवाळी सणासाठी मोफत फराळाच्या साहित्याचे वाटप; वृक्षारोपण कार्यक्रमाचे आयोजन; आंतर महाविद्यालयीन युवा महोत्सवाचे आयोजन स्वातंत्र्यसैनिक व गुणवंत विद्यार्थी यांच्या सत्कार समारंभाचे आयोजन; रत्नागिरी जिल्ह्यात ८० गावात युवक जोडो कार्यक्रमाचे आयोजन; श्रमदानातून खानू, जोयशीवाडी, पाथरट, पावस, तोणदे व कशेळी या गावात बंधारे बांधले; नाचणे गावाच्या नळपाणी योजनेसाठी जीवन प्राधिकार कार्यालयावर मोर्चा काढला; पूर्णगड येथील वादळग्रस्तांना मदत; जिल्हास्तरीय मॅरेथॉन स्पर्धेचे आयोजन; कोकण रेल्वे प्रकल्पग्रस्तांचे प्रश्न सोडवण्यासाठी प्रयत्नः न्यू इंग्लिश हायस्कूल, पाली, माध्यमिक विद्यामंदिर, नाणीज, अ. आ. देसाई हायस्कूल, हातखंबा, न्यू इंग्लिश स्कूल, टेंभे, आदर्श विद्यामंदिर, कुरतडे, महालक्ष्मी माध्यमिक विद्यामंदिर, खेडशी व जागुष्टे माध्यमिक हायस्कूल, कुवारबांव या शाळांना संगणक सॉफ्टवेअर मिळवून दिले; सदस्य, अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद नियामक मंडळ, मुंबई: अध्यक्ष, अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद, रत्नागिरी शाखाः बालमहोत्सव, नाट्यस्पर्धा, एकांकिका स्पर्धा व रंगसंमेलनाचे आयोजन; २००३-२००४ चा महाराष्ट्र पत्रकार संघाचा 'कोकणरत्न' पुरस्कार व २००४-२००५ चा रमजान मुबारकतर्फे 'युवारत्न' पुरस्कार प्राप्त; २००७ चा दि प्राईड ऑफ इंडिया चा भास्कर ॲवॉर्ड, २०१३ मध्ये कोकण मराठी साहित्य परिषदेचा साहित्य मित्र सन्मान पुरस्कार प्राप्त; १९९६-९९ एन. एस. यु. आय. च्या कार्यात सक्रिय सहभाग, फेब्रुवारी १९९५ ते मे १९९९ उपाध्यक्ष, जिल्हा युवक काँग्रेस; १९९९-२००० चिटणीस, जुले २०१० ते २०१२ अध्यक्ष, महाराष्ट्र प्रदेश राष्ट्रवादी युवक काँग्रेस; १९९६-९९ अध्यक्ष, पाली युवा मंच : १९९९-२००१ निरीक्षक, कोल्हापूर जिल्हा राष्ट्रवादी युवक काँग्रेस; २००२-२००३ अध्यक्ष, रणजीत ग्रामीण सहकारी पतसंस्था, पाली; अध्यक्ष, रत्नागिरी जिल्हा राष्ट्रवादी युवक काँग्रेस; २०१४ पासून शिवसेना पक्षाचे कार्य २००४-२००९, २००९-२०१४, २०१४-२०१९ सदस्य, महाराष्ट्र विधानसभा; ११ जून २०१३ ते सप्टेंबर २०१४ नगरविकास वने, विधी व न्याय, बंदरे व मत्स्यव्यवसाय खात्याचे राज्यमंत्री; विधिमंडळाच्या रोजगार हमी व पंचायत राज समितीचे सदस्य; ऑक्टोबर, २०१९ मध्ये महाराष्ट्र विधानसभेवर फेरनिवड;



**१३ वी महाराष्ट्र विधानसभा सदस्यांचा संक्षिप्त जीवन परिचय**

---

## ॲड. के.सी. पाडवी



**जन्म** : ३ मार्च १९५७ **जन्म ठिकाण** : असली, तालुका अक्राणीमहाल, जिल्हा नंदुरबार. **शिक्षण** : बी. ए., एलएल. एम. **ज्ञात भाषा** : मराठी, हिंदी, इंग्रजी व आदिवासी भाषा. **वैवाहिक माहिती** : विवाहित, पत्नी श्रीमती हेमलता **अपत्ये** : एकूण २ (एक मुलगा एक मुलगी) **व्यवसाय** : शेती व वकिली. **पक्ष** : भारतीय राष्ट्रीय काँग्रेस (आय) **मतदारसंघ** : १-अक्कलकुवा (अनुसूचित जमाती), जिल्हा नंदुरबार.

**इतर माहिती** : संस्थापक अध्यक्ष, अखिल भारतीय आदिवासी विद्यार्थी संघटना; अध्यक्ष, सातपुडा मानव मुक्ती केंद्र, असली अस्तंबा; अध्यक्ष, माता मोगरा शिक्षण संस्था, असली या संस्थेमार्फत आदिवासी भागात दोन आश्रम शाळा, तीन हायस्कूल्स सुरू केली; आदिवासी समाज जागृतीसाठी विविध कार्यक्रमांचे आयोजन संघटनात्मक कार्यावर भर; होळी दिवाळी महोत्सवांचे आयोजन; चेअरमन, दि हिलव्हॉली फूड अँड फूट प्रोसेसिंग को-ऑप. सोसायटी लि. असली, तालुका अक्रणी, जिल्हा नंदुरबार; १९९० पर्यंत जनता दलाचे कार्य; १९९१ पासून काँग्रेस पक्षाचे कार्य; १९९०-९५, १९९५-९९, १९९९-२००४, २००४-२००९, २००९-२०१४, २०१४-२०१९ सदस्य, महाराष्ट्र विधानसभा; ऑक्टोबर २०१९ मध्ये विधानसभेवर फेरनिवड.

**संदर्भः १३ वी महाराष्ट्र विधानसभा सदस्यांचा संक्षिप्त जीवन परिचय**

## श्री. शंकरराव यशवंतराव गडाख



**जन्म** : २९ मे, १९७० **शिक्षण** : बी. कॉम **पक्ष** : शिवसेना **मतदारसंघ** : २२१-नेवासा

**इतर माहिती** : विधानसभा सदस्य, ऑक्टो. २००९ पासून ते २०१४ पर्यंत; संचालक, अ. नगर जिल्हा सह. बँक लि . अ . नगर २००७ ते २०१६; चेअरमन, अ. नगर डिस्ट्रिक्ट सेंट्रल को. ऑप. बँक लि. २००७ ते २००८; चेअरमन - मुळा सह. साखर कारखाना लि . सोनई १९९४ ते २००५; संस्थापक, मुळा सहकारी बँक लि. सोनई; संस्थापक, 'मुळा बाजार' मुळा मध्यवर्ती सहकारी ग्राहक संस्था लि. सोनई संस्थापक, नेवासा तालुका सह. दूध संघ लिमिटेड सोनई; विश्वस्त, मुळा एज्युकेशन सोसायटी, सोनई; नेवासा तालक्यातील शेतकऱ्यांच्या पाटपाणी व विजेच्या प्रश्नासाठी वेळोवेळी आंदोलने केली; नेवासा तालुका मार्केट कमिटीच्या घोडेगाव उपआवारात शेतकऱ्यांच्या सोईसाठी मोठ्या उलाढालीचे कांदा मार्केट सुरू; पांढरीपूल एम.आय.डी.सी. कार्यान्वित होण्यासाठी सातत्याने प्रयत्न; जिल्ह्यात सर्वाधिक महिला बचतगटांचे संघटन; जिल्हा सहकारी बँकेच्या अध्यक्षीय काळात शेती, शिक्षण व महिला बचतगटांचे बाबतीत सुवर्णमहोत्सवी निर्णय घेण्यात पुढाकार; मुळा कारखान्याचा ३० मेगावॅट क्षमतेचा सहवीज निर्मिती प्रकल्प सुरू करण्यात पुढाकार; मुळा कारखान्याचे अध्यक्षीय काळात कारखान्यास सलग २ वर्षे त.ड.ख.कडून उत्कृष्ट आर्थिक व्यवस्थापनाचे पुरस्कार; २००३ चे दुष्काळात ६००० जनावरांसाठी छावणी चालवली; संघटनात्मक कामासाठी वेळोवेळी युवक व शेतकरी मेळाव्यांचे आयोजन; नियंत्रणाखालील संस्थांच्या माध्यमातून प्रभावी जनसंपर्क; सार्वजनिक ठिकाणी लोकांना भेटून अडचणी सोडवण्यासाठी प्रयत्न व त्यासाठी स्वतंत्र जनसंपर्क कार्यालय.

---

## श्री. अस्लम रमजान अली शेख



**जन्म** : ५ नोव्हेंबर, १९६८ **जन्म ठिकाण** : मुंबई **शिक्षण** : आठवी **ज्ञात भाषा** : मराठी, हिंदी व इंग्रजी, गुजराती व उर्दू **वैवाहिक माहिती** : विवाहित, पत्नी श्रीमती रिजवाना **अपत्ये** : एकूण ३ (एक मुलगा व दोन मुली) **व्यवसाय** : सामाजिक कार्य **पक्ष** : भारतीय राष्ट्रीय काँग्रेस (आय). **मतदारसंघ** : १६२ - मालाड पश्चिम, जिल्हा - मुंबई उपनगर.

**इतर माहिती** : अध्यक्ष, व्हिजन फाऊंडेशन, मंबई : सचिय, रमजान अली इंग्लिश हायस्कूल आणि कनिष्ठ महाविद्यालय; गोरगरीब रुग्णांना मदत, विद्यार्थ्यांना शालोपयोगी वस्तूंचे वाटप; २००२-२०१२ नगरसेवक, २००७-२००८ अध्यक्ष, पी उत्तर प्रभाग समिती, महानगरपालिका, मुंबई; कांग्रेस पक्षाच्या सर्व उपक्रमात सक्रिय सहभाग; २००९-२०१४, २०१४-२०१९ सदस्य, महाराष्ट्र विधानसभा; ऑक्टोबर, २०१९ मध्ये महाराष्ट्र विधानसभेवर फेरनिवड.

**संदर्भ: १३ वी महाराष्ट्र विधानसभा सदस्यांचा संक्षिप्त जीवन परिचय**

---

## श्री.आदित्य उद्धव ठाकरे



**जन्म** : १३ जून, १९९० **शिक्षण** : बी. ए., एलएल.बी **ज्ञात भाषा** : मराठी, हिंदी, इंग्रजी. **वैवाहिक माहिती** : अविवाहित **पक्ष** : शिवसेना **मतदारसंघ** : १८२-वरळी

**इतर माहिती** : वरळी विधानसभा मतदारसंघातून विधानसभा निवडणूक २०१९ मध्ये विजयी, सध्या युवा सेनेचे प्रमुख आणि २०१७ मध्ये मुंबई जिल्हा फुटबॉल असोसिएशनचे अध्यक्ष, वर्ष २००७ मध्ये My Thoughts in White and Black हा कवितासंग्रह प्रसिद्ध. उम्मीद या खासगी अल्बमसाठी ८ गाण्यांची रचना, महाविद्यालयीन जीवनापासूनच आपल्या नेतृत्व शैलीची छाप पाडत पुढे राजकारणात आपले नेतृत्व गुण सिद्ध करीत आज युवकांचे प्रश्न ज्वलंतपणे मांडत तरुणांना आपला हक्क मिळवून देण्यात मोलाची कामगिरी बजावत आहेत. आपल्या विशेष कार्यशैलीतून, शैक्षणिक क्षेत्रात आमूलाग्र बदल घडविण्यासाठी ते सतत प्रयत्नशील असतात. शालेय विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाकरिता आपले विशेष योगदान देत तंत्रज्ञ विकसित शिक्षण पद्धतींचा अंगीकार करण्यावर त्यांचा विशेष भर आहे. शैक्षणिक सुधारणांसोबत तरुणांच्या रोजगारासाठी ते विशेष प्रयत्नशील आहेत. २३ जानेवारी, २०१८ पासून शिवसेना नेते; ऑक्टोबर, २०१९ मध्ये महाराष्ट्र विधानसभेवर निवड. तरुणांबरोबरच शेतकरी, कष्टकरी जनतेच्या विकासासाठी सातत्याने ते प्रयत्नशील आहेत.

# राज्यमंत्री

## श्री. अब्दुल नबी सत्तार



**जन्म** : १ जानेवारी, १९६५ **जन्म ठिकाण** : सिल्लोड, जिल्हा औरंगाबाद. **शिक्षण** : बी.ए. **ज्ञात भाषा** : मराठी, हिंदी व इंग्रजी **वैवाहिक माहिती** : विवाहित, पत्नी श्रीमती नफीजा बेगम **अपत्ये** : एकूण ७ (दोन मुलगे व पाच मुली) **व्यवसाय** : व्यापार **पक्ष** : शिवसेना

**मतदारसंघ** : १०४-सिल्लोड, जिल्हा औरंगाबाद.

**इतर माहिती** : अध्यक्ष, नॅशनल एज्युकेशन संस्था; अध्यक्ष, प्रगती शिक्षण संस्था; अध्यक्ष, प्रियदर्शनी क्रीडा मंडळ सिल्लोड; सार्वजनिक गणेशोत्सव तसेच रक्तदान शिबिरांचे आयोजन, आदिवासी व दलित समाजातील सामुहिक विवाहांचे आयोजन; किल्लारी, जि.लातूर येथील व गुजरातमधील भूज येथील भूकंपग्रस्तांना मदत कार्य; मोहाडी पूरग्रस्तांना मदत; १९८४ ते १९९० सदस्य, ग्रामपंचायत सिल्लोड; ५ मार्च, १९९४ ते ९ जानेवारी, ९१९६, २९ ऑगस्ट, १९९८ ते ४ मार्च, १९९९ व १५ फेब्रुवारी, २००० ते ६ सप्टेंबर, २००१, अध्यक्ष, नगरपरिषद, सिल्लोड; चेअरमन, विविध कार्य सेवा सोसायटी, सिल्लोड; संचालक, कृषी उत्पन्न बाजार समिती, सिल्लोड; संचालक, म्हसोबा महाराज तेलबिया उत्पादक सहाकारी संस्था; संचालक, दूध उत्पादक सहकारी संस्था, सिल्लोड; संचालक, औरंगाबाद जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक; २००१-२००६ सदस्य, महाराष्ट्र विधानपरिषद; ऑक्टोबर २००९-२०१४, २०१४-२०१९ सदस्य, महाराष्ट्र विधानसभा, २ नोव्हेंबर, २००९ ते डिसेंबर २०१० अन्न व नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण आणि सार्वजनिक बांधकाम खात्याचे राज्यमंत्री. २ जून २०१४ ते सप्टेंबर २०१४ पशुसंवर्धन, दुग्धविकास व मत्स्यव्यवसाय खात्याचे मंत्री, ऑक्टोबर २०१९ मध्ये महाराष्ट्र विधानसभेवर फेरनिवड.

**१३ वी महाराष्ट्र विधानसभा सदस्यांचा संक्षिप्त जीवन परिचय**

---

## श्री. सतेज उर्फ बंटी डी. पाटील



**जन्म** : १२ एप्रिल, १९७२ **जन्म ठिकाण** : कसबा बावडा, तालुका करवीर, जिल्हा कोल्हापूर **शिक्षण** : डीबीए **ज्ञात भाषा** : मराठी, हिंदी व इंग्रजी **वैवाहिक माहिती** : विवाहित, पत्नी श्रीमती प्रतिमा **अपत्ये** : एकूण २ (एक मुलगा व एक मुलगी) **व्यवसाय** : शेती

**पक्ष** : भारतीय राष्ट्रीय काँग्रेस (आय).

**मतदारसंघ** : कोल्हापूर स्थानिक प्राधिकारी संस्था

इतर माहिती :१९९२-९३ अध्यक्ष, शिवाजी विद्यापीठ स्टुडंट्स कौन्सिल, २००४-२०१० सिनेट सदस्य, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूरः चेअरमन, पद्मश्री डॉ. डी. वाय पाटील सहकारी साखर कारखाना लि. गगनबावडा; अध्यक्ष, श्री.मौनी विद्यापीठ, गारगोटी, व हनुमान भक्त मंडळ, कसबा बावडा; उपाध्यक्ष, डॉ. डी. वाय. पाटील एज्युकेशन सोसायटी, पुणे व कोल्हापूर; उपाध्यक्ष, कोल्हापूर डिस्ट्रिक्ट मॅच्युअर बॉक्सिंग असोसिएशन, कोल्हापूर; भारतीय राष्ट्रीय काँग्रेस (आय) पक्षाचे कार्य; जांबुसर जिल्हा मरोच, गुजरात येथे पक्ष निरिक्षक, संचालक, कोल्हापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक सल्लागार, टेलिफोन ॲडव्हाईझर कमिटी सदस्य. वसंतदादा शुगर इन्स्टिट्यूट, पुणे; श्रीराम सेवा सोसायटीचे कार्य; डी. वाय. पाटील हॉस्पिटलच्या माध्यमातून गरीब रुग्णांना मदत; आरोग्य शिबिराचे आयोजन; करवीर तालुक्यात एकाच दिवशी १० हजार वृक्षांची लागवड केली. कोल्हापूर जिल्ह्यातील पूरग्रस्तांना मदतकार्य; डी. वाय. पाटील शैक्षणिक संकुलाच्या माध्यमातून रक्तदान शिबिराचे आयोजन; महिला प्रशिक्षण शिबिरांचे, एडस् जनजागरण कार्यक्रमांचे आयोजन; गरीब, गरजू विद्यार्थी दत्तक योजना, व्यक्तिमत्त्व विकास शिबिर, गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार, व्यक्तिमत्त्व विकासासाठी विद्यार्थ्यांकरिता विविध उपक्रमांचे आयोजन; आंतरराष्ट्रीय स्तरावरील खेळाडूंना मदत; जिल्हापरिषद व महानगरपालिकेतील विद्यार्थ्यांना शालोपयोगी वस्तूंचे वाटप; भारतीय संस्कृतीमधील एकत्र कुटुंबपद्धती राहावी यासाठी ट्रस्ट व फायटर्स स्पोर्ट्स क्लब यांच्या मार्फत प्रा. संजय देसाई यांच्या स्मरणार्थ आदर्श एकत्र कुटुंब पुरस्कार २००२ पासून सुरू केला; महिला बचतगटांना प्रोत्साहन व मार्गदर्शन करण्यासाठी महिला महोत्सवाचे आयोजन; विवाहपूर्व एडस् चाचणी शासनाकडून सक्तीची करावी यासाठी प्रयत्न; वाढदिवसानिमित्त प्रोत्साहन म्हणून शालेय विद्यार्थ्यांना वह्या वाटपाची २०१४ मध्ये लिम्का बुक ऑफ रेकॉर्ड व २०१६ मध्ये वर्ल्ड रेकॉर्डस् ऑफ इंडिया मध्ये नोंद; २००४-२००९, २००९-२०१४ सदस्य, महाराष्ट्र विधानसभा, २०१० ते २०१४ गृह, ग्रामविकास, अन्न व औषध प्रशासन, फलोत्पादन खात्याचे राज्यमंत्री; जानेवारी २०१६ मध्ये महाराष्ट्र विधानपरिषदेवर निर्वाचित.

## श्री. शंभूराज शिवाजीराव देसाई

**जन्म** : १७ नोव्हेंबर, १९६६ **जन्म ठिकाण** : मुंबई. **शिक्षण** : बी.कॉम. **ज्ञात भाषा** : मराठी, हिंदी व इंग्रजी **वैवाहिक माहिती** : विवाहित, पत्नी श्रीमती स्मितादेवी **अपत्ये** : एकूण २ (एक मुलगा व एक मुलगी ) **व्यवसाय** : शेती **पक्ष** : शिवसेना

**मतदारसंघ** : २६१-पाटण, जिल्हा सातारा.



**इतर माहिती** : १९८६ पासून प्रमुख विश्वस्त, दौलत औद्योगिक प्रशिक्षण संस्था; मोरणा शिक्षण संस्था मर्या., दौलतनगर, मरळी, तालुका पाटण या संस्थेतर्फे पॉलिटेनिक कॉलेज, ज्युनिअर व सिनिअर कॉलेज, इंग्लिश मेडिअम स्कूल सुरू केले; वैद्यकीय शिबिर व वृक्षारोपण कार्यक्रमांचे आयोजन; ग्रामीण डोंगराळ भागात वैद्यकीय सेवा कार्य सुरू केले; १९८६ पासून संचालक व १९८६-९६ चेअरमन, १९९६ २०१४ मार्गदर्शक-संचालक, लोकनेते बाळासाहेब देसाई सहकारी साखर कारखाना, लि. दौलतनगर, मरळी, तालुका-पाटण, जिल्हा-सातारा; सहकार क्षेत्रात १९व्या वर्षी अशिया खंडातील सर्वात कमी वयाचे चेअरमन म्हणून निवड; २००० संस्थापक, शिवदौलत सहाकरी बँक, मल्हारपेठ; सदस्य, नॅशनल फेडरेशन ऑफ शुगर फॅक्टरी, नवी दिल्ली; २००२-२००४ केंद्रीय प्रतिनिधी, बँक ऑफ महाराष्ट्र; संचालक, महाराष्ट्र राज्य सहकारी साखर कारखाना संघ; १९८६ पासून सामाजिक कार्यात सक्रिय सहभाग; १९९७ पासून पाटण तालुक्यात व सातारा जिल्ह्यात शिवसेनेचे संघटनात्मक कार्यः १९९२-१९९७ सदस्य, पंचायत समिती पाटण; १९९२-२००२ सदस्य, जिल्हा परिषद, सातारा; २००४-२००९ सदस्य, महाराष्ट्र विधानसभा; सदस्य, ग्रंथालय समिती, राष्ट्रकुल संसदीय मंडळ महाराष्ट्र शाखेतर्फे २००७-२००८ चा उत्कृष्ट संसदपटू पुरस्कार भारताच्या राष्ट्रपती प्रतिभाताई पाटील यांच्या हस्ते देऊन गौरवण्यात आले; २०१४-२०१९ सदस्य, महाराष्ट्र विधानसभा; ऑक्टोबर २०१९ मध्ये महाराष्ट्र विधानसभेवर फेरनिवड.



## श्री. ओमप्रकाश ऊर्फ बच्चू बाबाराव कडू

**जन्म** : ५ जुलै, १९७० **जन्म ठिकाण** : बेलोरा, तालुका चांदूरबाजार, जिल्हा अमरावती. **शिक्षण** : बी.कॉम. **ज्ञात भाषा** : मराठी, हिंदी व इंग्रजी **वैवाहिक माहिती** : विवाहित, पत्नी श्रीमती नयना **अपत्ये** : एकूण १ (एक मुलगा) **व्यवसाय** : शेती **पक्ष** : अपक्ष **मतदारसंघ** : ४२ -अचलपूर, जिल्हा अमरावती

.



**इतर माहिती** : आठव्या इयत्तेत शिकत असताना गावातील तमाशाबंदीकरिता आंदोलन; १९९४ शालेय विद्यार्थ्यांच्या प्रवेशाकरिता आंदोलन; कापूस व वीज प्रश्नाकरिता डेरा आंदोलन; आदिवासींच्या जमिनीकरिता अर्धदफन आंदोलन; स्वतःच्या लग्नाच्या खर्चातून बचत करून २५० अपंगांना लग्न समारंभात ३ चाकी सायकली व कृत्रिम अवयवांचे वाटप, विद्यार्थ्यासाठी पुस्तकपेढी योजना तयार केली; पूर्णा उत्सवांतर्गत विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन; विदर्भस्तरीय कुस्ती व कब्बड्डी स्पर्धांचे आयोजन; १५०० हृदय रुग्णांना दत्तक घेऊन उपचार व शस्त्रक्रिया; २०० ब्रेन ट्युमरच्या रुग्णांवर मुंबई येथे सर्वतोपरी उपचार; १०० कर्करोग रुग्णांना वैद्यकीय साहाय्य व सर्वतोपरी मदत, २००० रुग्णांवर मोतीबिंदू शस्त्रक्रिया; १००० रक्तदान शिबिरांचे आयोजन करून १५००० बाटल्या रक्त के. ई. एम. रुग्णालय, मुंबई, जनरल हॉस्पिटल, अमरावती व मेडिकल कॉलेज, नागपूर येथील रक्तपेढ्यांना पुरवठा केला; स्वतः ७० वेळा रक्तदान केले; अपंगाना सायकलीचे वाटप; १९८९-९२ भारतीय विद्यार्थी सेनेचे प्रमुख; १९९२-९८ शिवसेना तालुका प्रमुख संस्थापक अध्यक्ष, प्रहार विद्याथी संघटना सदस्य, सत्यशोधक बहुउद्देशीय संघटना टोंगलापूर, ता. चांदूरबाजार, जि. अमरावती; संस्थापक. प्रहार कामगार संघटना, प्रहार महिला दूध उत्पादक संघ, प्रहार कृषी प्रक्रिया निर्यातदार संस्था, प्रहार औद्योगिक विकास संस्था. बेलोरा. ता. चांदूरबाजार, जि. अमरावती; संस्थापक, प्रहार युवा शक्ती संघटनाः १९९९ प्रहार संघटना पक्षातर्फ उल्लेखनीय सामाजिक कार्याबद्दल २०१३-१४ चा सह्याद्री वाहिनीचा आर्य चाणक्य पुरस्कार; एम.आय.टी.चा उत्कृष्ट लोकप्रतिनिधी पुरस्कार; महाराष्ट्र शासनाच्या वतीने २०११-१२ चा रक्त मित्र पुरस्काराने सन्मानित; ग्रामपंचायत, पंचायत समिती, जिल्हा परिषद व नगर परिषदेमध्ये ९६ सदस्य, निवडून आणण्यात यश; १९९३-९८ सदस्य, ग्रामपंचायत; १९९७-२००२ सदस्य व १९९७-९८ सभापती, पंचायत समिती, चांदूर बाजार; १९९७-९८ सदस्य, जिल्हा परिषद अमरावती; २००४-२००९, २००९-२०१४, सदस्य, महाराष्ट्र विधानसभा; सदस्य, विधिमंडळ पंचायत राज समिती, ग्रंथालय समिती; २०१४-२०१९ सदस्य, महाराष्ट्र विधानसभा; ऑक्टोबर, २०१९ मध्ये महाराष्ट्र विधानसभेवर फेरनिवड.

## डॉ. विश्वजीत पतंगराव कदम

**जन्म** : १३ जानेवारी, १९८१ **शिक्षण** : बी.ई., एम.बी.ए., पीएच.डी. **ज्ञात भाषा** : मराठी, हिंदी व इंग्रजी. **वैवाहिक माहिती** : विवाहित, पत्नी श्रीमती स्वप्नाली. **व्यवसाय** : सामाजिक कार्य, शिक्षण क्षेत्र **पक्ष** : भारतीय राष्ट्रीय काँग्रेस (आय). **मतदारसंघ** : पलुस कडेगांव



**इतर माहिती** : कार्यवाह, भारती विद्यापीठ, महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे कार्याध्यक्ष म्हणून ऑगस्ट २०१९ पासून कार्यरत, रयत शिक्षण संस्थेच्या संचालक मंडळाचे सदस्य म्हणून नेमणूक तसेच या संस्थेच्या कार्यकारी मंडळावरही (एक्झिक्युटिव्ह कौन्सिल) निवड; प्रकुलगुरू, भारती विद्यापीठ अभिमत विश्वविद्यालय, प्रदीर्घ काळपासून सोनहिरा सहकारी साखर कारखाना; आणि सागरेश्वर सहकारी सूतगिरणी; कडेगांव, जि. सांगली या दोन सहकारी उद्योगांच्या संचालकपदी काम करीत आहेत, वेस्टर्न इंडिया फुटबॉल असोसिएशनचे उपाध्यक्ष, पुणे; जिल्हा फुटबॉल असोसिएशनचे निर्वाचित अध्यक्ष, फुटबॉल खेळाच्या विविध स्पर्धांचे आयोजन करणाऱ्या डेक्कन इलेव्हन क्लब या क्षेत्रातील प्रतिष्ठित फुटबॉल संघटनेशी ते निगडित आहेत; युवक काँग्रेसच्या निवडणुकीत प्रथम सप्टेंबर २०११ मध्ये व पुन्हा दुसऱ्यांदा जानेवारी २०१४ मध्ये महाराष्ट्र प्रदेश युवक काँग्रेसच्या अध्यक्षपदी निवडणुकीच्या माध्यमातून त्यांची बहुमताने निवड झाली होती. डॉ. विश्वजीत कदम यांनी २७ शाखा असलेल्या भारती सहकारी बँक लि. पुणे या मल्टिस्टेट शेड्यूल बँकेचे अनेक वर्षे काम पाहिलेले आहे; अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, (ए.आय.सी.टी.ई). नवी दिल्ली या भारत सरकारच्या मानव संसाधन मंत्रालयाने निर्माण केलेल्या संस्थेवर सदस्य म्हणून काम केले आहे; भारत सरकारच्या अन्नप्रक्रिया उद्योग व्यवसाय विभागाच्या भारतीय द्राक्ष प्रक्रिया मंडळाचे अध्यापन, संशोधन, हॉस्पिटॅलिटी व्यवसाय इत्यादीचे प्रतिनिधी सदस्य म्हणून नामांकन झाले होते; भारत सरकारच्या मानव व संसाधन विभागांतर्गत उपशिक्षण विभागांतर्गत नियोजन आयोगाच्या तंत्रविज्ञानविषयक अभ्यासगटाचे सदस्य; शैक्षणिक, सांस्कृतिक आणि समाजोपयोगी कार्य करणाऱ्या अभिजित कदम मेमोरियल फौंडेशनचे व्यवस्थापकीय विश्वस्त आहेत. २०१८ मधील पोटनिवडणुकीत सदस्य, महाराष्ट्र विधानसभा; ऑक्टोबर, २०१९ मध्ये महाराष्ट्र विधानसभेवर निवड.

---

## श्री. दत्तात्रय विठोबा भरणे



**जन्म** : १ जून, १९६८ **जन्म ठिकाण** : अंथुर्णे **शिक्षण**: बी.कॉम. **ज्ञात भाषा** : मराठी, हिंदी, इंग्रजी. **वैवाहिक माहिती** : विवाहित, पत्नी श्रीमती सारिका. **अपत्ये** : एकूण १ (एक मुलगा) **व्यवसाय** : शेती **पक्ष** : राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी **मतदारसंघ** : २००-इंदापूर

**इतर माहिती** : १९९२ पासून संचालक, २००३-२००८ चेअरमन, श्रीछत्रपती सहकारी साखर कारखाना, भवानीनगर, इंदापूर; १९९६ पासून संचालक, २००२-२००३ चेअरमन, पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक; १९९१-९९ काँग्रेस पक्षाचे कार्य १९९९ पासून राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे कार्य; २०१२-१४ सदस्य व मार्च २०१२ ते सप्टेंबर २०१४ अध्यक्ष, जिल्हापरिषद, पुणे; या काळातील उत्कृष्ट कार्याबद्दल समाज कल्याण विभागाचा २०१३ चा अपंग कल्याण राज्य पुरस्कार प्राप्त; २०१४-१९ सदस्य महाराष्ट्र विधानसभा; ऑक्टोबर २०१९ मध्ये महाराष्ट्र विधानसभेवर निवड.

**संदर्भ: १२ वी महाराष्ट्र विधानसभा सदस्यांचा संक्षिप्त जीवन परिचय**

---

## श्रीमती आदिती सुनील तटकरे



**शिक्षण** : बी.ए., मास्टर ऑफ आर्टस्

**ज्ञात भाषा** : मराठी, हिंदी, इंग्रजी.

**पक्ष** : राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी

**मतदारसंघ** : १९३-श्रीवर्धन

**इतर माहिती** : जयहिंद कॉलेजमध्ये २००२-२००९ प्राध्यापक म्हणून काम केले. यूपीएससी परीक्षांसाठी २००२-२००९ पर्यवेक्षक (सुपरवायझर) म्हणून काम केले.२००२-२००९ पासून सामाजिक आणि राजकीय कार्यात सक्रिय. २०१२ साली राष्ट्रवादी युवती काँग्रेसमध्ये सामील. कोकण विभागीय समन्वयक म्हणून काम सुरू. २३ फेब्रुवारी २०१७ रोजी वरसे येथील रोहा ग्रुपमधून रायगड जिल्हा परिषद सदस्य.२१ मार्च, २०१७ रोजी रायगड जिल्हा परिषदेच्या अध्यक्षपदी निवड.

२५ नोव्हेंबर २०१९ पर्यंत रायगड जिल्हा परिषदेचे अध्यक्ष. ऑक्टोबर, २०१९ महाराष्ट्र विधानसभेवर निवड.

## श्री.संजय बाबुराव बनसोडे



**जन्म :** १ जुलै, १९७३ **शिक्षण :** १२ वी **ज्ञात भाषा :** मराठी, हिंदी व इंग्रजी **वैवाहिक माहिती :** विवाहित, पत्नी शिल्पा **व्यवसाय :** शेती/राजकारण **पक्ष :** भारतीय राष्ट्रीय काँग्रेस (आय). **मतदारसंघ :** २३७- उदगीर (अनुसूचित जाती)

**इतर माहिती :** ऑक्टोबर, २०१९ मध्ये महाराष्ट्र विधासभेवर निवड. गावपातळीवर प्रचंड मोठा जनसंपर्क. सर्वसामान्यांचे जिव्हाळ्याचे प्रश्न सोडवण्यासाठी सातत्याने प्रयत्नशील; तरुणांचे संघटन करून गावपातळीवरच बदल घडवून आणण्यासाठी प्रयत्न; विद्यार्थी संघटनेचे कार्य करीत असताना विविध प्रश्नांच्या सोडवणुकीसाठी विशेष प्रयत्न. ग्रामीण महाराष्ट्राची जाण असलेल्या श्री. बनसोडे यांनी वंचित आणि गरीब जनतेसाठी असेलेल्या विविध शासकीय योजना त्यांच्यापर्यंत पोहोचविण्यासाठी केलेले प्रयत्न महत्त्वपूर्ण आहेत. गरीब आणि वंचित घटकांतील तरुणांनी शिक्षणाच्या माध्यमातून आपला जीवनस्तर उंचवावा आणि त्यातून सामाजिक बदल घडवून आणावा यासाठी ते प्रयत्नशील असून विद्यार्थ्यांना त्यांचा नेहमीच मदतीचा हात असतो.

---

## श्री. प्राजक्त प्रसादराव तनपुरे



**जन्म :** १३ सप्टेंबर १९७६

**शिक्षण :** बी.ई.,एम.बी.ए., एम.एस. **ज्ञात भाषा :** मराठी, हिंदी व इंग्रजी **वैवाहिक माहिती :** विवाहित **व्यवसाय :** शेती **पक्ष :** राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष **मतदारसंघ :** २२३-राहुरी

**इतर माहिती :** प्रसाद साखर कारखान्याचे चेअरमन, लोकनियुक्त नगराध्यक्ष, ऑक्टोबर, २०१९ मध्ये महाराष्ट्र विधानसभेवर निवड. नगराध्यक्ष पदाच्या माध्यमातून राहुरीच्या विविध नागरी समस्या सोडवण्यासाठी विशेष प्रयत्न. उच्चविद्याविभूषित असलेल्या श्री. तनपुरे यांना ग्रामीण आणि नागरी प्रश्नांची उत्तम जाण. लोकांमध्ये मिसळून काम करण्यावर भर. तरूणांचे संघटन करून त्यामार्फत बदल घडवून पाहणारा नेता अशी त्यांची ओळख आहे. गरीब आणि वंचित समाज घटकांच्या उत्थानासाठी शासनाच्या विविध योजना त्यांच्यापर्यंत पोहोचवण्यासाठी त्यांनी राबवलेले विविध उपक्रम महत्त्वपूर्ण. विशेषतः शेती आणि शेतकरी हा त्यांच्या अभ्यासाचा विषय असून शेतकऱ्यांच्या आयुष्यात सकारात्मक बदल घडवून आणण्यासाठी प्रयत्नशील.

---

## श्री.राजेंद्र शामगोंडा पाटील (यड्रावकर)

**जन्म :** ५ मे १९७० **शिक्षण :** डिप्लोमा (सिविल) **ज्ञात भाषा :** मराठी, हिंदी, इंग्रजी. **पक्ष :** राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी **मतदारसंघ :** २८०-शिरोळ

**इतर माहिती :** अध्यक्ष, शरद सहकारी साखर कारखाना लि., नरंदे, ता. हातकणंगले अध्यक्ष; पार्वती को. ऑप. इंडस्ट्रियल इस्टेट लि., यड्राव, ता. शिरोळ अध्यक्ष पार्वती सहकारी सूतगिरणी लि., कुरुंदवाड, ता. शिरोळ अध्यक्ष दि ऑल इंडिया फेडरेशन ऑफ को ऑप. स्पिनिंग मिल्स लि., मुंबई अध्यक्ष पद्मावती यंत्रमाग औद्योगिक सहकारी संस्था मर्या., यड्राव, ता. शिरोळ अध्यक्ष पार्वती को - ऑप. हौसिंग सोसायटी लि., यड्राव, ता. शिरोळ संचालक महाराष्ट्र राज्य सहकारी औद्योगिक वसाहत फेडरेशन लि., संचालक कोल्हापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि., कोल्हापूर संचालक कोल्हापूर जिल्हा शेतकरी विणकरी सहकारी सूतगिरणी लि., यड्राव, ता. शिरोळ शैक्षणिक अध्यक्ष शामराव पाटील (यड्रावकर) एज्युकेशनल अँण्ड चॅरिटेबल ट्रस्ट, जयसिंगपूर संचलित-शरद इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी, कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, यड्राव, ता. शिरोळ-शरद इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नालॉजी (पॉलिटेक्निक), यड्राव, ता. शिरोळ - शरद कृषी महाविद्यालय, जैनापूर, ता. शिरोळ - शामराव पाटील (यड्रावकर) औद्योगिक प्रशिक्षण केंद्र, यड्राव, ता. शिरोळ ज्ञान गंगा हायस्कूल व प्राथमिक विद्यामंदिर, जयसिंगपूर, ता. शिरोळ-दानलिंग विद्यालय, उमळवाड, ता. शिरोळ शरद इंग्लिश मिडियम स्कूल, यड्राव, ता. शिरोळ शरद प्ले-ग्रुप अँण्ड नर्सरी, यड्राव, ता. शिरोळ-शरद कॉम्प्युटर इन्स्टिट्यूट, यड्राव, ता. शिरोळ आर्थिक-अध्यक्ष, यड्राव को. ऑप. बँक लि., यड्राव, ता. शिरोळ राजकीय-मा. कार्याध्यक्ष, कोल्हापूर जिल्हा राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी मा. अध्यक्ष, एन.एस.यु.आय. शिरोळ तालुका मा. उपाध्यक्ष; कोल्हापूर जिल्हा युवक काँग्रेस (आय) मा. संघटक सचिव; महाराष्ट्र युवक काँग्रेस (आय) (१९९५-९९) मा. सरचिटणीस; महाराष्ट्र राज्य राष्ट्रवादी युवक काँग्रेस पार्टी (१९९९ ते २००५) मा. सरचिटणीस; महाराष्ट्र प्रदेश राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी; ऑक्टोबर, २०१९ मध्ये महाराष्ट्र विधानसभेवर निवड.



**भयमुक्त, चिंतामुक्त आणि भूकमुक्त नवा प्रगत महाराष्ट्र घडवण्यासाठी आपले शासन प्राधान्याने लक्ष केंद्रित करणार प्रत्येक घटकाच्या विकासाकडे साकल्याने लक्ष पुरवण्यात येईल, असे प्रतिपादन मुख्यमंत्री श्री. उद्धव ठाकरे यांनी नागपूर येथील पहिल्याच अधिवेशनात स्पष्ट केले आहे. राज्याच्या विविध प्रश्नांबाबत विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहात आत्मविश्वासाने आणि सकारात्मकतेने उत्तरे देण्यात आली. लोकाभिमुख शासन देतानाच प्रगतीची नवी शिखरे गाठणारे राज्य निर्माण करून, देशातील इतर राज्यांपुढे आदर्श निर्माण करण्याचा मानस श्री. ठाकरे यांनी व्यक्त केला.**
**शेतकरी आणि कष्टकरी जनतेचे कल्याण, तरुणांच्या हाताला काम मिळवून देण्यासाठी रोजगारनिर्मितीवर विशेष भर, राज्यातील सिंचन, रस्त्यांसह पायाभूत विकासांच्या प्रकल्पांना गती देतानाच, त्यातून नवा समृद्ध आणि बलशाली महाराष्ट्र घडवण्याचा संकल्प श्री. ठाकरे यांनी व्यक्त केला.**



# घाबरायचे नाही, आश्वस्त राहा...

सुधारित नागरिकत्व कायद्याबाबत नागरिकांनी कोणताही गैरसमज मनात बाळगू नये. राज्यातील कोणत्याही जातिधर्माच्या नागरिकांच्या हक्काला शासन धक्का लागू देणार नाही, अशी ग्वाही मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी नागपूर येथील विधिमंडळ अधिवेशनात दिली.

सुधारित नागरिकत्व कायदा मंजूर झाल्यानंतर देशात अशांतता, भीती आणि गैरसमजाचे वातावरण आहे. देशभरात या कायद्याविरोधात आंदोलने होत असून आंदोलनादरम्यान काही

ठिकाणी हिंसाचार होत आहे. अशा वेळी सर्वांनी मिळून जनतेच्या मनातील गैरसमज दूर करण्याची गरज आहे. मुख्यमंत्री म्हणून आपण कायदा व सुव्यवस्थेबाबत विविध घटकांशी चर्चा केल्याचे त्यांनी सांगितले.

सर्वोच्च न्यायालयात कायद्याबाबत चर्चा व्हायची आहे. त्यामुळे नागरिकांनी मनात भीती बाळगू नये. कायद्याला विरोध करण्यासाठी लोकशाही मार्गाने आंदोलन करीत निवेदन द्यावे. त्याबाबत आपण संबंधितांशी चर्चा करण्यास तयार आहोत. आंदोलनात हिंसाचाराचा मार्ग न अवलंबता राज्याच्या लौकिकास धक्का लागू नये याची दक्षता घ्यावी, असेही श्री.ठाकरे म्हणाले.

### कर्जमुक्तीची वचनपूर्ती

शेतकरी चिंतामुक्त करण्यासाठी आवश्यक सर्व उपाय योजिले जातील, असे प्रतिपादन मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी विश्वासदर्शक ठरावाला सामोरे जाताना केले होते, विधिमंडळाच्या पहिल्याच अधिवेशनात शेतकऱ्यांसाठी कर्जमुक्तीची घोषणा करत मुख्यमंत्री ठाकरे यांनी आपले हे वचन पूर्ण केले,

शेतकऱ्यांना चिंतामुक्त करण्यासाठी 'महात्मा जोतिराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजना-२०१९' ची घोषणा मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहात करून, हे शासन शेतकऱ्यांच्या पाठीशी ठामपणे उभे असल्याचे स्पष्ट केले. सप्टेंबर २०१९ पर्यंत या योजनेंतर्गत प्रतिशेतकरी दोन लाख या कमाल मर्यादेपर्यंत लाभ मिळणार आहे. यामुळे शेतकऱ्यांची पत सुधारणार आहे. त्यांच्यावरील कर्जाचे ओझे कमी होणार आहे.

### 'शिव भोजन योजना'

शिवछत्रपती हे रयतेचे राजे होते. म्हणूनच गोरगरीब जनता त्यांना दैवत मानत असे. महाविकास आघाडीचे सरकार हे शिवाजी महाराजांनी दाखवलेल्या दिशेने राज्यकारभार करण्यास बांधील आहे, असे सांगून मुख्यमंत्र्यांनी दहा रुपयांत भोजन देणारी 'शिव भोजन योजना' राज्यात सुरू करण्यात येणार असल्याची घोषणा केली. सुरुवातीला प्रत्येक जिल्ह्याच्या मुख्यालयाच्या ठिकाणी ही योजना राबवण्यात येईल. पहिल्या टप्प्यात ५० ठिकाणे उघडण्यात येतील.

### सिंचन प्रकल्पांना गती

बळीराजा जलसंजीवनी योजनेतील विदर्भातील ५२ प्रकल्प रखडले आहेत. जून २०२३ पर्यंत ते टप्प्याटप्प्याने प्राधान्यक्रम ठरवून पूर्ण केले जाणार आहेत. अमरावती विभागातील सिंचनाचा अनुशेष दूर व्हावा म्हणून १०० प्रकल्प हाती घेण्यात आले होते. पण ४६ प्रकल्प अजून अपूर्ण असून तेसुद्धा २०२२ पर्यंत पूर्ण करण्यात येणार आहेत.

### समृद्धी महामार्ग

हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे महाराष्ट्र समृद्धी महामार्गाचे काम विदर्भासह राज्यासाठी महत्त्वाचे असल्याने हा महामार्ग दिलेल्या मुदतीपूर्वीच पूर्ण होईल, असे मुख्यमंत्री श्री. ठाकरे यांनी विधिमंडळात सांगितले. या महामार्गासाठी एकूण २८ हजार कोटींचे कर्ज उभारण्यात येणार होते. या कर्जावर ६४०० कोटी रुपये व्याज झाले असते. पण आता कर्जाची रक्कम ३५०० कोटी रुपयांनी कमी केल्याने शासनाचे व्याजापोटी जाणारे २५०० कोटी रुपये वाचणार आहेत. या महामार्गावर २० नवीनगरे कृषिसमृद्धी केंद्रे म्हणून विकसित करण्यात येतील. तसेच कृषी प्रक्रिया उद्योगांची स्थापनाही करण्यात येणार आहे. या महामार्गाच्या परिसरातील उद्योग, पर्यटन व्यवसाय मोठ्या प्रमाणावर वाढेल आणि त्यामुळे ५ लाख थेट रोजगार निर्मिती होणार आहे.

### भात शेती मिशन

गोंदिया, भंडारा, गडचिरोली आणि चंद्रपूर विदर्भातील या चार जिल्ह्यांत भातशेती केली जाते. ती वाढवण्यासाठी आणि ब्राऊन राईस उद्योगाला विकसित करण्यासाठी भातशेती मिशन राबवण्यात येणार आहे. यामुळे कृषी प्रक्रिया उद्योगसुद्धा मोठ्या प्रमाणावर वाढेल. धान उत्पादक शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी यापूर्वी शासनाने प्रतिक्विंटल ५०० रुपयांचे अनुदान दिले

## विदर्भ डायरी

### नुकसानभरपाई

अवकाळी पावसामुळे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना मदतीसाठी शासनाने ६ हजार ६०० कोटी रुपये मंजूर केले असून यापैकी २१०० कोटी रुपये वितरित करण्यात आले आहेत. अवकाळी पावसामुळे झालेल्या नुकसान भरून काढणे आणि पूरग्रस्तांच्या मदतीकरिता शासनाने १४ हजार ६०० कोटी रुपयांची मागणी केंद्र शासनाकडे केली आहे. अशी माहिती अर्थ मंत्री जयंत पाटील यांनी विधानसभेत दिली. राज्य शासनातर्फे मदतीचे वाटप सुरू आहे. मंजूर ६६०० कोटी रुपयांपैकी २१०० कोटी रुपये जिल्हाधिकाऱ्यांमार्फत वितरित केले आहेत. उर्वरित रक्कम जमा करण्याची कार्यवाही सुरू आहे.

### विमानतळांना सोयीसुविधा

राज्यातील सर्व विमानतळाच्या प्रलंबित समस्या सोडवण्यासाठी लवकरच उपाय योजिले जातील, अशी माहिती मुख्यमंत्र्यांनी विधानपरिषदेत दिली.

### भूकंप प्रभावितांना मदत

पालघर जिल्ह्यात मागील दोन वर्षात भूकंपाचे अनेक धक्के जाणवले. या भूकंप प्रभावित परिसरामधील नागरिकांना भूकंपाच्या धक्क्याच्या अनुषंगाने जनजागृती व आपत्कालीन कार्यवाहीचे प्रशिक्षण आणि सर्वतोपरी मदत देण्यात येत असल्याची माहिती भूकंप पुनर्वसन मंत्री सुभाष देसाई यांनी विधानपरिषदेत दिली.



### धान खरेदीची रक्कम

गोंदिया व भंडारा जिल्ह्यातील धान उत्पादक शेतकऱ्यांना त्यांच्याकडून खरेदी केलेल्या धानाचे चुकारे तातडीने देण्यासाठी सुमारे १३ कोटी ८० लाख रुपयांचा निधी वितरित करण्याची कार्यवाही सुरू आहे. कोकणातील धान खरेदीचे चुकारे तातडीने करण्याच्या सूचना देण्यात येत असल्याची माहिती अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री छगन भुजबळ यांनी विधानपरिषदेत दिली.

### ‘दिशा’कायदा

महिलांवरील अत्याचार रोखण्यासाठी, महिला व मुलींना निर्भयपणे वावरता यावे आणि गुन्हेगारांवर वचक बसावा, यासाठी आंध्र प्रदेशच्या धर्तीवर ‘दिशा’सारखा कायदा करण्याबाबत सरकार गांभीर्याने विचार करत असल्याची माहिती गृहमंत्री एकनाथ शिंदे यांनी विधानपरिषदेत दिली.

### महापोर्टलची क्षमता

पशुसंवर्धन विभागातील विविध पदांच्या भरतीसाठी मोठ्या प्रमाणात अर्ज आले असून एवढ्या मोठ्या प्रमाणातील विद्यार्थ्यांची ऑनलाइन परीक्षा घेण्यास महापोर्टलची क्षमता कमी पडणार आहे. त्यामुळे महापोर्टलची क्षमता वाढेपर्यंत या भरती प्रक्रियेला स्थगिती देण्यात आली आहे. महापोर्टलच्या संदर्भात परीक्षार्थींच्या भावना लक्षात घेऊन या परीक्षा पद्धतीत आवश्यक बदल करण्यात येणार असल्याची माहिती मुख्यमंत्र्यांनी विधानपरिषदेत दिली.

आहे. आता त्यात २०० रुपयांची वाढ करण्यात येईल, अशी घोषणा मुख्यमंत्र्यांनी केली.

### अन्नप्रक्रिया क्लस्टर

विदर्भात तयार होणाऱ्या कापसावर मूल्यवर्धन करून रोजगारनिर्मितीसाठी सूक्ष्म, लघू आणि मध्यम कापूस उद्योगांना चालना देऊन त्याचा दर्जा वाढवण्यात येईल. विदर्भात अन्न प्रक्रिया उद्योगाला चालना देण्यासाठी अन्नप्रक्रिया क्लस्टरची उभारणी करण्याचे शासनाने निश्चित केल्याचे मुख्यमंत्र्यांनी सांगितले.

### विशेष कार्यालये

आपल्या समस्या सोडवण्यासाठी ग्रामीण भागातून मुंबईत येणाऱ्या सामान्य नागरिकांचा वेळ, कष्ट आणि पैसा वाचावा यासाठी जिल्हा स्तरावर मुख्यमंत्री सचिवालयांतर्गत विशेष कार्यालय सुरू करण्याचा शासनाचा विचार आहे. प्रायोगिक स्तरावर प्रथम विभागीय स्तरावर असे कार्यालय सुरू करण्यात येईल. या कार्यालयाच्या माध्यमातून नागरिकांच्या समस्या, निवेदने यावर कार्यवाही करण्यासोबत स्वतंत्र वैद्यकीय कक्षदेखील तेथे सुरू करण्यात येतील.

### रस्ते निर्मिती ; नवे तंत्रज्ञान

रस्त्यांचे मजबुतीकरण व सुधारणांसाठी चालू असलेल्या हायब्रीड ॲन्युईटी मॉडेल या योजनेत बँकांकडून उपयुक्त प्रतिसाद मिळत नाही. या समस्येवर मात करण्यासाठी आंतरराष्ट्रीय वित्तीय संस्थांकडून निधीचे नवीन स्रोत निर्माण करून रस्त्यांच्या सुधारणेला गती देण्यात येईल.

### ‘आशां’चे मानधन

आरोग्य व्यवस्थेमध्ये ‘आशा’ कार्यकर्ती हा कणा आहे. मागील सरकारने आशा कार्यकर्तींना २००० रुपये जादा मानधन देण्याचा निर्णय घेतला. परंतु त्याबाबतचा शासन निर्णय निर्गमित केला नाही. हा शासन निर्णय त्वरित निर्गमित करण्यात येणार आहे.

### विकासाला चालना

विदर्भातील खनिज संपत्तीचा उपयोग करून रोजगाराला चालना देण्यासाठी जमशेदपूर-भिलाई सारखा मोठा स्टील प्लांट या भागात उभारण्यात येईल. वनहक्क कायद्यांतर्गत मिळालेल्या वनपट्ट्याच्या जमिनीवर शेती आणि संलग्न व्यवसाय करता यावा, यासाठी प्रभावी योजना आणण्यात येईल. दुर्गम आदिवासी भागात रस्ते आणि पूल झाले तर त्यांच्यापर्यंत विकास पोहोचेल. त्यामुळे यासाठी विशेष कार्यक्रम राबवण्यात येईल. मेळघाटसारख्या भागातील कुपोषणाचे प्रमाण कमी करण्यासाठी मध्यवर्ती स्वयंपाकगृह सुरू करून आदिवासी



वाशिम जिल्हा आढावा बैठकीत मार्गदर्शन करताना मुख्यमंत्री उद्धव ठाकरे.

मुलामुलींना पौष्टिक आहार देण्यात येईल.

पूर्व विदर्भात मत्स्यव्यवसायाला चालना देण्यासाठी फिशरीज हब बनवण्याबाबत विचार करण्यात येईल. ग्रामीण भागातील प्रत्येक घरात २०२४ पर्यंत नळाद्वारे पाणीपुरवठा करण्यात येईल. चंद्रपूर येथे वनविद्यान उभारण्याबाबत विचार करण्यात येईल.

### मिहानमधील गुंतवणूक

विदर्भातील महत्त्वाकांक्षी प्रकल्प असणाऱ्या मिहान प्रकल्पामध्ये विदर्भाचा कायापालट करण्याची क्षमता आहे. परंतु त्याच्या क्षमतेप्रमाणे तो भरारी घेऊ शकलेला नाही. शासन नवीन गुंतवणूकदारांना पाच वर्षांची मुदत देऊन रक्कम भरण्याची सवलत देणार आहे. मिहानमधील गुंतवणूक वाढवण्यासाठी नागपूर विमानतळाचा



विकास 'खासगी सार्वजनिक सहभागातून' वेगाने करण्यात येईल.

### सरन्यायाधीश बोबडे यांचे अभिनंदन

सर्वोच्च न्यायालयाच्या सरन्यायाधीशपदी श्री. बोबडे यांची नियुक्ती झाल्याबद्दल त्यांच्या अभिनंदनाचा प्रस्ताव मुख्यमंत्री श्री. उद्धव ठाकरे यांनी विधानसभेत तर मंत्री सुभाष देसाई यांनी विधान परिषदेत मांडला. या वेळी विधानसभेत मुख्यमंत्री श्री. ठाकरे म्हणाले, महाराष्ट्राचे सुपुत्र शरद बोबडे यांची सर्वोच्च न्यायालयाच्या सरन्यायाधीशपदी निवड झाल्यामुळे अभिमानाने ऊर भरून आला आहे. मूळचे नागपूरचे असलेले शरद बोबडे यांचे अभिनंदन नागपूरच्याच अधिवेशनात करता आले, हा दुर्मीळ योगायोग आहे. सध्या शरद ऋतू सुरू असून हा ऋतू म्हणजे नवचैतन्याचा आहे. सरन्यायाधीश बोबडे यांच्या रूपाने नवचैतन्य येईल. शेतकऱ्यांना न्याय मिळवून देण्यासाठी न्या. बोबडे यांनी प्रयत्न केले आहेत. बोबडे कुटुंबाचे नागपूरमधील निवासस्थान म्हणजे कायद्याचे झाड असून त्या माध्यमातून अनेक निष्णात कायदेतज्ज्ञ तयार झाले आहेत. रामशास्त्री बाण्याने ते न्यायदान केल्याशिवाय राहणार नाहीत.

### अमरावती जिल्ह्यातील कामांना गती

अमरावती जिल्ह्यातील रस्ते, जलसंधारणाची कामे गतीने पूर्ण करणार असून विविध योजनांमध्ये लोकप्रतिनिधींना विश्वासात घेऊन सुधारणा करण्यात येतील, असे मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी अमरावती जिल्ह्याच्या आढावा बैठकीत सांगितले.

अवेळी पावसामुळे पिकांचे नुकसान झाल्यास शेतकऱ्यांना पीकविम्याचा आधार असतो. मात्र, कंपन्याकडून शेतकऱ्यांना पीकविम्याचा लाभ मिळण्यास समाधानकारक प्रतिसाद मिळत नाही. त्यामुळे पीकविमा धोरणात सुधारणा करण्यात येतील. शेतकऱ्यांना हक्काचा लाभ मिळाला पाहिजे, अशी शासनाची भूमिका आहे. शेतकऱ्यांना सरसकट लाभ मिळण्यासाठी शासकीय यंत्रणेने केलेले पंचनामे आणि पावसाची आकडेवारी ग्राह्य मानण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. कर्जमाफीची रक्कम जिल्हा बँकेसह विविध बँकांकडून लाभार्थ्यांपर्यंत पोहोचवण्याचे प्रयत्न करण्यात येतील. जिल्ह्यातील खारपाणपट्ट्यात पोकरा योजनेतून वैयक्तिक लाभाच्या योजना राबवल्या जातात. त्यांना सामूहिक योजनांची जोड देण्यात येईल. सामूहिक शेततळ्याची योजना व्यापकपणे राबवण्यात येईल, ज्यामुळे शेतकऱ्यांना रब्बीसाठी पाणी मिळेल. यामुळे पावसामध्ये खंड पडला तरी शेतकऱ्यांच्या हाती निश्चित उत्पन्न येण्यास मदत होईल. मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेत २५६. ४२ कि.मी. लांबीचे ४१ रस्ते पूर्ण करण्यात आले. ३६२.१५ कि.मी. लांबीच्या

### अभ्यास गट रद्द

शाळांना प्रतिविद्यार्थी वेतन अनुदान देण्याचा व इतर मुद्द्यांबाबत अभ्यास करण्यासाठी शिक्षण आयुक्तांनी नेमलेले विविध ३३ अभ्यास गट रद्द करण्यात येत असल्याची घोषणा शालेय शिक्षण मंत्री बाळासाहेब थोरात यांनी विधानपरिषदेत केली.

### वैद्यकीय सहायता निधी कक्ष

विदर्भातील रुग्णांची सोय व्हावी म्हणून नागपूरच्या हैद्राबाद हाऊस येथील मुख्यमंत्री सचिवालयात मुख्यमंत्री वैद्यकीय सहायता निधी कक्ष पुन्हा सुरू करण्याच्या सूचना मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी दिल्या आहेत. राष्ट्रपती राजवटीच्या काळात या कक्षाचे कामकाज बंद होते. इंदिरा गांधी शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे वैद्यकीय अधिकारी डॉ. सोनपुरे हे या कक्षाचे काम पाहतील. मुख्यमंत्री वैद्यकीय सहायता कक्षासाठी नागपूर विभागीय आयुक्त, उपसंचालक आरोग्य सेवा आणि जिल्हा शल्यचिकित्सक यांची समिती स्थापन करण्यात आली आहे.

### अवैध सावकारीला आळा

अवैध सावकारींना आळा घालण्यासाठी व अशा सावकारांविरुद्ध कारवाई करण्यास टाळाटाळ करणाऱ्या शासकीय अधिकाऱ्यांविरुद्ध कारवाईची शिफारस करण्यासाठी, विधानपरिषद सदस्य विद्या चव्हाण यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमण्याची घोषणा सहकार मंत्री जयंत पाटील यांनी केली आहे.



**नागपूर येथील दीक्षाभूमीला मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी भेट देऊन भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन केले. या वेळी सामाजिक न्यायमंत्री डॉ. नितीन राऊत उपस्थित होते.**

### दीक्षाभूमीला भेट

मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी दीक्षाभूमीला भेट दिली. सर्वप्रथम त्यांनी दीक्षाभूमीच्या स्तूपासमोरील डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या अर्धाकृती पुतळ्याला पुष्प वाहून वंदन केले. स्तूपातील डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या अस्थिकलशाचे दर्शन घेऊन गौतम बुद्धाच्या मूर्तिला पुष्प वाहून वंदन केले. दीक्षाभूमीच्या विकासासाठी २०१८ मध्ये १०० कोटींच्या कामांना तत्त्वत: मंजुरी दिली असून त्यापैकी रुपये ४० कोटी नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडे वर्ग करण्यात आले आहेत. हा निधी प्राधिकरणाच्या खात्यावर सुरक्षित आहे. दीक्षाभूमीच्या विकासकामांना आवश्यकतेनुसार पाहिजे तेवढा निधी देण्यात येणार असल्याची माहिती सामाजिक न्याय मंत्री छगन भुजबळ यांनी विधान परिषदेत दिली.

रस्त्यांची ९० कामे प्रगतिपथावर आहेत. तथापि, ग्रामीण रस्त्यांमध्ये व्यापक सुधारणांसाठी निधी वाढवण्यात येईल. जिल्ह्यात मृद् व जलसंधारणाच्या १०५ योजना पूर्ण होऊन २८हजार ५९४ टीसीएम पाणीसाठा निर्माण झाला. या कामांना गती देण्यासाठी काही निकषांत बदल करण्यात येतील, असे मुख्यमंत्र्यांनी सांगितले.

अवेळी पावसाने बाधित झालेल्या जाहीर क्षेत्रात वरुड, मोर्शी या तालुक्यांचा समावेश नसल्याची बाब समोर आल्यानंतर ही बाब जिल्हाधिकाऱ्यांशी चर्चा करून शासकीय नियमाप्रमाणे मदत करण्यात येईल, असे मुख्य सचिव श्री. अजोय मेहता यांनी सांगितले.

वन्य प्राण्यांमुळे होणाऱ्या नुकसानाला आळा घालण्यासाठी सामूहिक कुंपण योजना राबवण्याचा विचार करण्यात येईल. तसेच वन्यप्राण्यांमुळे होणाऱ्या अपघातानंतर मदतीच्या निकषांमध्ये, रोही (नीलगाय) या प्राण्याचा समावेश करण्यात येईल, असेही ते म्हणाले.

### यवतमाळ जिल्ह्यातील सिंचन

यवतमाळ जिल्ह्यातील सिंचन प्रकल्पांद्वारे शेतकऱ्यांना सिंचनाच्या सुविधा उपलब्ध करून देण्याबरोबरच अपूर्ण प्रकल्प तातडीने पूर्ण करण्यासाठी लवकरात लवकर निधी उपलब्ध करून दिला जाईल, असे मुख्यमंत्र्यांनी विधिमंडळ सभागृहात यवतमाळ जिल्ह्याचा आढावा घेताना सांगितले. अवकाळी पावसामुळे बाधित शेतकऱ्यांसाठी शासकीय मदतीचा निधी जिल्ह्यांना पोहोचला आहे. यवतमाळ जिल्ह्यात पहिल्या टप्प्यात १०२ कोटींचे वाटप झाले असून द्वितीय टप्प्यातील २२२ कोटींची मदतवाटपाची कार्यवाही तालुका स्तरावर सुरू आहे. जिल्ह्यातील

अल्पसंख्याक विकासाचा निधी उपलब्ध करून देऊ, असेही मुख्यमंत्र्यांनी स्पष्ट केले.

### चंद्रपूरातील विकासकामे पूर्ववत

चंद्रपूर जिल्ह्यामध्ये सुरू असलेल्या विकासकामांसाठी कोणतीही स्थगिती दिली नसून, सर्व कामे वेळेत पूर्ण करण्यात येतील. तेलंगाणा व महाराष्ट्राच्या सीमेवरील वादग्रस्त १४ गावांचा प्रश्न सोडवण्यासाठी आणि चंद्रपूरसह, गडचिरोली, गोंदिया नक्षलग्रस्त जिल्ह्यांमध्ये कृषिपंपांना दिवसा ओलीत करण्यासाठी वीजपुरवठा उपलब्ध करण्यासंदर्भात बैठक घेण्यात येईल, असे मुख्यमंत्र्यांनी सांगितले. चंद्रपूर जिल्हा आढावा बैठकीत त्यांनी ही माहिती दिली. लोकप्रतिनिधींच्या विविध सकारात्मक सूचनांचे पालन करण्याचे निर्देशही प्रशासनाला दिले. चंद्रपूरच्या बाबुपेठ पुलाचा निधी लवकर वितरित केला जाईल. महाकाली मंदिराचा कृती आराखडा पूर्ण होईल.

### सूरजागड लोह खनिज उत्खनन

गडचिरोली जिल्ह्यातील सूरजागड लोह खनिज उत्खनन प्रकल्प हा जिल्ह्याच्या विकासाला चालना देणारा आहे. या प्रकल्पामुळे जिल्ह्यातील रेल्वे सुविधा, अन्य दळणवळण, वीज पुरवठा यासारख्या विकासकामांना चालना मिळून नक्षलवाद कमी होण्यास मदत होईल, त्यामुळे या प्रकल्पास गती द्यावी,असे निर्देश मुख्यमंत्र्यांनी दिले. मुख्यमंत्री श्री. ठाकरे यांनी गडचिरोली जिल्ह्यातील विविध समस्या जाणून घेतल्या. पदभरती, दूरसंचार समस्या, शेतीविषयक समस्या, धान खरेदी याबाबतचे प्रश्न तत्काळ मार्गी लावण्याच्या सूचना त्यांनी प्रशासनाला दिल्या. धान खरेदी प्रक्रिया सुरू होण्याआधी भविष्यात येणाऱ्या अडचणी दूर करण्यासाठी नियोजन करावे, असे निर्देश त्यांनी दिले आहेत.

तेलंगणा राज्यातील कालेश्वरम येथे होत असलेल्या मेडीगट्टा बॅरेजच्या कामामुळे गडचिरोली जिल्ह्यातील काही क्षेत्र बुडीत झाल्याने स्थानिक आदिवासींचे नुकसान झाले आहे. मेडीगट्टा सिंचन प्रकल्पाची एका समितीमार्फत तपासणी अहवाल तयार करावा, अशा सूचना मुख्यमंत्र्यांनी अधिकाऱ्यांना केल्या.

### खारपाणपट्टा विकास

अकोला, अमरावती व बुलढाणा जिल्ह्यातून जाणाऱ्या खारपाणपट्ट्यातील गावांमधील नागरिकांना पाणीपुरवठा करण्यासाठी, एकत्रित आढावा घेऊन स्वतंत्र धोरण तयार करा, असे निर्देश मुख्यमंत्र्यांनी अकोला जिल्ह्याच्या आढावा बैठकीत दिले. अकोला जिल्ह्यातील खारपाणपट्ट्यातील गावांच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्न हा तत्काळ सोडवणे आवश्यक आहे. हा प्रश्न एकट्या अकोला जिल्ह्यापुरता मर्यादित नसून, त्यात लगतच्या अमरावती, बुलडाणा या अन्य जिल्ह्यांनाही ही समस्या भेडसावत आहे. त्या दृष्टीने स्वतंत्र धोरण आखण्यासाठी प्रशासनाने पावले उचलावित. जिल्ह्याच्या सिंचनाच्या दृष्टीने महत्त्वाच्या असलेल्या पूर्णा बॅरेजचे काम मार्गी लावण्यासाठी आपण व्यक्तिगत लक्ष घालणार असून हा प्रकल्प लवकरात लवकर पूर्ण करण्यासाठी अधिकाऱ्यांनी मार्ग काढावा, असे निर्देश त्यांनी दिले. प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत घरांच्या बांधकामासाठी गुंठेवारी जागेचा प्रश्न सोडवण्यासाठी योग्य निर्णय घेण्यात यावा. तसेच प्रधानमंत्री आवास योजनेचा राज्यस्तरीय आढावा घेऊन समान अडचणी दूर करव्यात. बाळापूर येथील बांधकाम पूर्ण झालेली घरे लाभार्थ्यांना हस्तांतरित करण्याआधी घरांचा दर्जा तपासून घेण्याचे तसेच विहिरींच्या अनुदानासाठी निधी उपलब्ध करून देण्याबाबतच्या तांत्रिक अडचणी दूर कराव्यात, असे निर्देश त्यांनी दिले.

### वाशिम जिल्ह्यातील सिंचन

वाशिम जिल्ह्याला विकासाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी विविध योजनांखाली निधी उपलब्ध करून देण्यात येईल. त्याचबरोबर भौगोलिक रचनेमुळे जिल्ह्यात सिंचनासाठी मोठे प्रकल्प उभारणे शक्य नसले तरी लघुसिंचन प्रकल्पांसाठी निधी उपलब्ध करून सिंचनाचे प्रश्न मार्गी लावण्यात येतील, असे मुख्यमंत्र्यांनी वाशिम जिल्हा आढावा बैठकीत सांगितले.

जिल्ह्यात सिंचनासाठी मोठे प्रकल्प

### अपूर्ण एसआरए प्रकल्प

मुंबई शहर, उपनगरातील झोपडपट्टी पुनर्विकास धोरणानुसार (एसआरए) पुनर्विकासाचे प्रकल्प प्रभावीपणे राबवण्यासाठी विधिमंडळ सदस्य व या क्षेत्रातील तज्ज्ञांची एक समिती नेमणार असल्याची घोषणा गृहनिर्माण मंत्री जयंत पाटील यांनी विधानपरिषदेत केली. एसआरएनुसार अनेक प्रकल्पांना मंजुरी दिली जाते. मात्र, पुढे अडचणी येतात व विकासक ते प्रकल्प पूर्ण करत नाही. अशा प्रकल्पांची छाननी करून त्यावर निर्णय घेण्यासाठी झोपडपट्टी प्राधिकरणाकडे पाठवण्यासाठी ही समिती काम करेल. तसेच इमारतींच्या दर्जासंदर्भात ही समिती सूचना करेल.

### साखर कारखान्यांना मदत

साखर कारखान्यांची सध्याची आर्थिक स्थिती सुधारण्यासाठी व या स्थितीतून या क्षेत्राला बाहेर काढण्यासाठी राज्यशासन प्रयत्न करणार असल्याचे सहकार मंत्री जयंत पाटील यांनी सांगितले. साखर कारखान्यांकडून शेतकऱ्यांना थकीत एफआरपीची रक्कम देण्यासंदर्भात साखर आयुक्तांकडून प्रयत्न करण्यात येत आहे. २०१८-१९ या पूर्वीच्या गळीत हंगामातील थकीत १५५७.५९ कोटी रक्कमेपैकी ८४ टक्के म्हणजेच १३०५.४४ कोटी रक्कम वसूल करण्यात आली आहे. उर्वरित रक्कम वसूल करण्याची कार्यवाही सुरू आहे.

साखर उद्योगाला पुनरुज्जीवित करण्यासाठी कार्यक्षम कारखान्यांना मदत करण्याचे काम राज्यशासन करणार आहे. आर्थिक संकटात असलेल्या कारखान्यांची पुनर्रचना करण्याचा विचार सुरू आहे.

नाहीत. त्यामुळे सिंचनाचा भार हा लघू प्रकल्पांवर आहे. अडाण नदीवर ३ बॅरेजेस उभारण्याचा प्रस्ताव आहे. यास विशेष बाब म्हणून मान्यता देण्याबाबत कार्यवाही करावी, जिल्ह्यातील लघू प्रकल्पांचे कालवे दुरुस्ती झाल्यास पूर्ण क्षमतेने सिंचन होऊन सुमारे ५ हजार हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली येण्यास मदत होईल, ही बाब लोकप्रतिनिर्धीनी निदर्शनास आणली. मुख्यमंत्र्यांनी जिल्ह्यातील सिंचनाचे प्रश्न मार्गी लावण्यात येतील, तसेच जानोरी प्रकल्पाला सुधारित प्रशासकीय मान्यता निधीसाठी जलसंपदा विभागाने प्रस्ताव सादर करावा, असे निर्देश मुख्यमंत्र्यांनी बुलडाणा जिल्हा आढावा बैठकीत दिले.

बुलडाणा शहर खडकपूर्णा पाणीपुरवठा योजना व शहरातील अपूर्ण अवस्थेतील नाट्यगृह पूर्ण करणार असल्याचे सांगत मुख्यमंत्री म्हणाले, शहर पाणीपुरवठा योजना पूर्ण करण्यासाठी पाणीपुरवठा विभागाने कार्यवाही करावी. नाट्यगृह बांधकामासाठी आवश्यक असलेल्या निधीची तरतूद करण्यात यावी. जिल्ह्यात मंजूर असलेली कामे गतीने पूर्ण करण्यात तातडीच्या पर्यायी उपाययोजना करण्यात येतील. याबाबतचा प्रस्ताव जिल्हाधिकाऱ्यांनी शासनाला सादर करावा, असे मुख्यमंत्र्यांनी भंडारा जिल्हा आढावा बैठकीत सांगितले. तसेच भंडारा-गोंदिया एकत्रित पर्यटन विकास आराखडा, रिक्त पदे भरणे व वाळू धोरणाच्या अंमलबजावणीबाबत कार्यवाही करण्याच्या सूचनाही त्यांनी या वेळी संबंधित विभागांना दिल्या.

नाग नदीमध्ये सोडलेल्या नागपूर शहरातील सांडपाण्यामुळे वैनगंगा




**यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानच्या विभागीय नागपूर केंद्राच्या वतीने माजी राष्ट्रपती प्रतिभाताई पाटील यांच्या ८५व्या वाढदिवसानिमित्त मुख्यमंत्री उद्धव ठाकरे व ज्येष्ठ नेते शरद पवार यांच्या हस्ते नागरी सत्कार करण्यात आला.**

तातडीने देण्याबाबत कार्यवाही करण्यात येईल, असे सांगितले.

## जिगांव प्रकल्पासाठी निधी

बुलडाणा जिल्ह्याच्या सिंचनात भर घालण्यासाठी जिगांव प्रकल्प पूर्ण होणे आवश्यक आहे. या प्रकल्पाच्या पूर्णत्वासाठी नियमित तरतुदीव्यतिरिक्त अतिरिक्त निधी देण्यासाठी शासन सकारात्मक आहे. या प्रकल्पाच्या संदर्भात मंत्रालयात स्वतंत्र बैठक घेण्यात येईल. प्रकल्प पूर्णत्वासाठी आवश्यक अतिरिक्त यावी. खामगांव - जालना रेल्वे मार्गाचा विषय रेल्वे इन्फ्रास्ट्रक्चर बोर्डाकडे प्रलंबित आहे. याबाबतची प्रक्रिया गतीने पूर्ण करून शासन प्रकल्प पूर्ण करण्यासाठी सकारात्मक आहे. सिंदखेड राजा व लोणार विकास आराखडा पूर्ण करण्याची कार्यवाही करण्याच्याही त्यांनी सूचना केल्या.

## भंडाऱ्यास शुद्ध पाणीपुरवठा

भंडारा शहर व पवनी तालुक्यातील नागरिकांना शुद्ध पाणीपुरवठा करण्यासाठी नदीमधील पाणी दूषित होत आहे. त्यामुळे भंडारा शहर व पवनी तालुक्यातील काही गावांना दूषित पाणीपुरवठा होत आहे. नागपूर शहरातील सांडपाण्यावर प्रक्रिया करण्यासाठी सुमारे १५०० कोटींचा प्रकल्प उभारण्याबाबत कार्यवाही सुरू आहे. भंडारा व गोंदिया जिल्ह्यामध्ये पर्यटनाला मोठ्या प्रमाणात वाव आहे. त्यामुळे या दोन्ही जिल्ह्यांचा एकत्रित पर्यटन आराखडा तयार करण्यात यावा. याकरिता सर्व संबंधित विभागांनी समन्वयाने काम करावे, अशा सूचना

## विदर्भ डायरी

मुख्यमंत्र्यांनी दिल्या. भंडारा व तुमसर शहरातून जाणाऱ्या महामार्गामुळे वाहतुकीचा प्रश्न निर्माण होत आहे. या दोन्ही शहरांच्या बाह्यवळण रस्त्याचे (रिंग रोड) काम गतीने होणे आवश्यक आहे. त्यामुळे या कामाला प्राधान्य देण्यात यावे, अशा सूचना त्यांनी केल्या.

### धापेवाडा सिंचन प्रकल्प

गोंदिया जिल्ह्यातील धापेवाडा सिंचन प्रकल्पामुळे ९ तालुक्यातील २२७ गावांना फायदा होणार आहे. सिंचनाच्या दृष्टीने महत्त्वाच्या असलेल्या या प्रकल्पाचे काम गोसेखुर्दच्या धर्तीवर पूर्णत्वास नेण्याचा शासनाचा मानस आहे, असे मुख्यमंत्र्यांनी गोंदिया जिल्ह्याच्या आढावा बैठकीत स्पष्ट केले.

जिल्ह्यातील धापेवाडा सिंचन प्रकल्पामुळे ९० हजार हेक्टरवर सिंचनाची सोय होणार आहे. प्रकल्प त्वरित पूर्ण करण्याचा प्रयत्न केला जाई. अवकाळी पावसाबाबत मदत, पिकांचे पंचनामे आदींबाबत तक्रारी असल्यास जिल्हा प्रशासनाच्या पातळीवर त्वरित निकाली काढाव्यात. गोंदिया येथील मेडिकल कॉलेजचे काम कालबद्ध कार्यक्रमानुसार करण्यात येईल. गडचिरोलीच्या धर्तीवर जिल्ह्यातील रिक्त पदे भरण्यात येतील, असे त्यांनी सांगितले.

### सागरी मासेमारी अधिनियमात सुधारणा

एलईडी दिवे व पर्ससिन नेटद्वारे होणारी मासेमारी रोखण्यासाठी महाराष्ट्र सागरी मासेमारी नियमन अधिनियम १९८१ मध्ये काळानुरूप बदल करण्यात येणार असून नवीन नियमांची कडक अंमलबजावणी करणार असल्याची घोषणा पशुसंवर्धन मंत्री बाळासाहेब थोरात यांनी विधानपरिषदेत केली. वादळामुळे नुकसान झालेल्या मच्छीमारांना मदतीसाठी ५ कोटी रुपयांचे तातडीने वितरण करण्यात येणार असून आवश्यक असल्यास आणखी निधी देण्यात येणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

### डम्पिंग ग्राऊंड

कल्याण-डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रांतर्गत असलेल्या आधारवाडी डंम्पिंग ग्राऊंडच्या कचरा टाकण्यासंबंधीच्या व अन्य समस्या स्थानिक नागरिक व प्रशासनाशी चर्चा करून लवकरच सोडवणार असून राज्यातील इतर शहरातील असे प्रश्न सोडवण्यासाठी समिती स्थापन करू, अशी माहिती नगरविकास मंत्री एकनाथ शिंदे यांनी विधानपरिषदेत दिली.

### शिक्षकांना कॅशलेस आरोग्य योजना

मान्यताप्राप्त व अनुदानित खासगी, प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक आणि अध्यापक विद्यालय यातील पूर्णवेळ शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी व त्यांच्या कुटुंबीयांना कॅशलेस आरोग्य योजना लवकरच लागू करण्यात येणार असल्याची माहिती शालेय शिक्षण मंत्री श्री.बाळासाहेब थोरात यांनी दिली.

### 'सारथी' मार्फत शिष्यवृत्ती योजना

छत्रपती शाहू महाराज संशोधन, प्रशिक्षण व मानव विकास संस्थेमार्फत (सारथी) देण्यात येणारी कोणतीही शिष्यवृत्ती थांबवण्यात आलेली नाही. या योजना सुरूच राहणार असल्याची माहिती इतर मागास वर्ग, सामाजिक व शैक्षणिक मागास प्रवर्ग, विजाभज व विमाप्र कल्याण मंत्री डॉ. नितीन राऊत यांनी दिली.

सारथी संस्थेमार्फत मराठा समाजातील विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षेच्या तयारीसाठी शिष्यवृत्ती देण्यात येते. ही शिष्यवृत्ती यापुढील काळातही सुरूच राहणार आहे. यासंबंधी यापूर्वी काढलेले परिपत्रक रद्द करण्यात आले आहे. तसेच या संस्थेची स्वायत्तता संपुष्टात आणण्याचा अथवा मराठा, कुणबी, कुणबी मराठा समाजाच्या विद्यार्थ्यांच्या हिताच्या कल्याणकारी उपक्रमांवर बंदी घालण्याचा शासनाचा कोणताही हेतू नाही. संस्थेचे कामकाज शासकीय नियमानुसार व्हावे व मराठा समाजातील तरुणांना योजनांचा लाभ मिळावा, यासाठी शासन प्रयत्नशील आहे.

### रोजगारसंधी वाढवणार

शासकीय नोकऱ्यांमध्ये विदर्भ व कोकणातील तरुणांचा जास्तीत जास्त समावेश व्हावा, यासाठी त्यांना स्पर्धा परीक्षेचे प्रशिक्षण देण्यासंदर्भात राज्यशासन सकारात्मक आहे. त्यासाठी कालबद्ध कार्यक्रम आखण्यात येणार असल्याचे उद्योगमंत्री सुभाष देसाई यांनी सांगितले.

### विनाअनुदानित शाळांना अनुदान

कायम विनाअनुदानित शाळांना अनुदान देण्यासाठी पूर्वीचे प्रचलित अनुदान धोरण अमलात आणण्याबाबत शासन विचार करत असून लवकरच याबाबत मंत्रीमंडळ बैठकीत निर्णय घेण्यात येईल, अशी माहिती शालेय शिक्षण मंत्री बाळासाहेब थोरात यांनी विधानपरिषदेत दिली.



### वसतिगृहांसाठी बृहद आराखडा

आदिवासी विद्यार्थ्यांच्या वसतिगृहांच्या समस्या सोडविण्यासाठी बृहद आराखडा तयार करणार असून अनुसूचित जाती व जमातीसाठींच्या योजनांवर केंद्र व राज्य सरकारकडून उपलब्ध होणारा निधी शंभर टक्के खर्च होण्यासाठी कर्नाटक व तेलंगणा राज्याच्या धर्तीवर कायदा करणार असल्याची माहिती आदिवासी विकास मंत्री डॉ.नितिन राऊत यांनी विधानपरिषदेत दिली. यासंबंधीची लक्षवेधी सूचना सदस्य रवींद्र फाटक यांनी मांडली होती.

**टीम लोकराज्य**



# एकमेवाद्वितीय

**शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे महाराष्ट्रातील एक उत्तुंग अष्टपैलू व्यक्तिमत्त्व. उत्कृष्ट व्यंग्यचित्रकार, उत्कृष्ट वक्ता, गोरगरीब जनतेसाठी नेहमीच एक पाऊल टाकणारा नेता. सत्तेत कधीही थेट सहभाग घेतला नाही; परंतु लोकांच्या प्रश्नांसाठी थेट भिडणारे ते व्यक्तिमत्त्व होते. देशातील अनेक प्रश्नांवर त्यांनी घेतलेली रोखठोक भूमिका केवळ महाराष्ट्रातीलच नव्हे, तर देशातील अनेक नेत्यांना धडकी भरवणारी होती. शिवसैनिक किंवा अनेक लोकांसाठी ते मोटिव्हेटर होते. एक झंझावाती नेतृत्व म्हणून त्यांच्याकडे पाहिले जाते.**

**निखिल पंडितराव**

**२३ जानेवारी जयंती विशेष**

शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांनी १९ जून १९६६ ला शिवसेना या पक्षाची स्थापना केली. पक्षाच्या स्थापनेपासूनच त्यांनी शिवसेना पक्षात येणाऱ्या कार्यकर्त्याला 'शिवसैनिक' ही उपाधी दिली. छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळात त्यांच्या सैनिकांना छत्रपती शिवाजी महाराजांचे मावळे म्हणत अगदी त्याच धर्तीवर त्यांनी शिवसैनिक अशी उपाधी देऊन कार्यकर्त्यांमध्ये समाजाच्या हितासाठी समाजकारण करण्याची ज्योत तेवत ठेवली. ही ज्योत तेवत ठेवण्यामध्ये श्री. ठाकरे यांच्या अप्रतिम वक्तृत्वाचा मोठा वाटा होता. त्यांची वक्तृत्वकला ही उपजत होती. जनतेशी थेट संवाद साधण्याची त्यांची शैली आणि भाषणातील उत्स्फूर्तपणा शिवसैनिकांना खिळवून ठेवणारा होता. आवाजाची लय आणि बोलण्यातील नाट्य यामुळे सभेला कितीही मोठी गर्दी झाली तरी सगळे शिवसैनिक स्तब्ध होऊन ऐकायचे आणि नवप्रेरणा घेऊनच सभेतून निघायचे. हीच त्यांची मोठी ताकद.

### चुकीच्या गोष्टींवर प्रहार

समाजातील चुकीच्या गोष्टींवर प्रहार करण्यासाठी तर चांगल्याच्या पाठीशी राहण्यासाठी ते शिवसैनिकांना मदत करत असत. त्यांच्या भाषणामुळे एक नवी ठाकरे शैली म्हणून ती सर्वांना परिचित झाली.

श्री. ठाकरे यांच्या या भाषणांमधून त्यांच्यामध्ये दडलेला व्यंग्यचित्रकार नेहमी डोकावत राहिला. त्यांनी गाजवलेल्या प्रत्येक सभेतील भाषणामागे व्यंग्यचित्रकाराची कला होती. या कलेच्या माध्यमातून त्यांनी फटकारे ओढले. रंगरेषेच्या दुनियेतून त्यांनी अनेकांना चिमटे काढले तर अनेकांच्या मागेही तेवढ्याच ठामपणे उभे राहिले. ज्येष्ठ अभिनेते अमिताभ बच्चन यांना कुली' चित्रपटाच्या वेळी दुखापत झाली. त्या वेळी ते रुग्णालयात असताना यमाला 'या रुग्णालयाकडे फिरकू नको,' असे सांगणारे व्यंग्यचित्र श्री. ठाकरे यांनी काढले आणि त्यातून आपला श्री. बच्चन यांच्याशी किती स्नेहबंध आहे हे दाखवून दिले.

## भाषा आणि रेषेवर प्रभुत्व

भाषा आणि रेषा या दोन्हींवर प्रभुत्व गाजवणारा नेता म्हणूनच ते सर्वांना परिचित आहेत. प्रत्येक शिवसैनिकासाठी श्री. ठाकरे तितकेच जवळचे होते. त्यांचे मुंबईतील 'मातोश्री' हे निवासस्थान तर शिवसैनिकांसाठी हक्काचे घरच झाले होते. त्यांचे मन आकाशाएवढे मोठे होते आणि मनाचा दिलदारपणा त्यांनी प्रत्येक कृतीतून दाखवून दिला. श्री. ठाकरे यांची त्यांचे वडील प्रबोधनकार केशव ठाकरे यांच्याशी तुलना केली जात होती. शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्यावर त्यांचा प्रभाव होताच. फरक फक्त एवढाच होता, प्रबोधनकार ठाकरे यांच्याकडे ठाम विचार होता; परंतु या विचारामागे ठाम संघटना त्यांना उभी करता आली नाही; मात्र बाळासाहेब ठाकरे यांनी ठाम विचार तर दिलाच; शिवाय मोठी संघटना उभी करून समाजाचा पाठिंबाही त्यासाठी मिळवला.

## सडेतोड भूमिका

राष्ट्राच्या किंवा समाजाच्या अस्मितेच्या प्रश्नांवर सडेतोड भूमिका त्यांनी घेतली. देशभरातील दिग्गज नेत्यांमध्ये ज्या पद्धतीचे संघटन कौशल्य होते, त्याच पद्धतीचे संघटन कौशल्य त्यांनी उभ्या केलेल्या शिवसेनेतून दिसते. हेच संघटन कौशल्य त्यांची सध्याची पिढी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे आणि मंत्री आदित्य ठाकरे यांच्याकडेही दिसून येत आहे.

समाजातील दुर्लक्षित घटकाच्या मदतीसाठी त्यांनी नेहमीच पुढाकार घेतला. मुंबईमध्ये गरिबांसाठी पहिल्यांदा फिरती वैद्यकीय केंद्र सेवा सुरू केले. त्याचा लाभ अनेक गोरगरीब नागरिकांना झाला. राष्ट्रीय संकट किंवा भूकंपासारखे प्रसंग आल्यानंतर पहिली मदत घेऊन शिवसैनिक निघायचे, हे समाजाविषयी असलेल्या त्यांच्या आत्मीयतेचे प्रतीक होते. त्यांच्या दूरदृष्टीपणामुळेच आज मुंबईमध्ये विकासाची गंगा दिसते. छत्रपती शिवाजी महाराजांच्या धोरणानुसार काम करणे हे त्यांचे ब्रीद होतेच; पण त्यांनी सत्ता आल्यानंतर ते करूनही दाखवले. दळणवळण सेवा सुधारली तर विकासाचे नवे पर्व अवतरेल असे त्यांचे धोरण होते. त्या धोरणानुसारच त्यांनी राज्यात युतीची सत्ता आल्यानंतर दळणवळणाची अनेक कामे सुरू केली. विकासाला त्यातूनच सुरुवात झाली.

सिंधुदुर्ग जिल्ह्यातील एक आठवण नेहमी सांगितली जाते. सिंधुदुर्गमध्ये एका गावातील वाडीमध्ये चांगला रस्ता नसल्यामुळे एकाचा मृत्यू झाला. त्याला उपचारासाठी नेण्यासाठी दळणवळणाची साधनेच नव्हती. त्या वेळी श्री. ठाकरे यांनी स्वतः वापरत असलेली मोटार त्याच्यासाठी पाठवली होती. अशा घटनांतून त्यांनी दळणवळणाचे महत्त्व लक्षात घेऊन विकासासाठी प्रयत्न केला.

## प्रेम आणि विश्वास

प्रेम आणि विश्वासाच्या नात्यावर त्यांनी शिवसैनिकांशी नाळ जोडली होती. दक्षिण भारतात ज्या पद्धतीने नेत्यांना घरातील देव्हाऱ्यात स्थान दिले जाते, तसे स्थान महाराष्ट्रात श्री. ठाकरे यांना मिळाले. शिवसैनिकांचे तर ते श्रद्धास्थान होते. सीमालढ्यातील त्यांचा लढाऊ बाणा आजही सीमालढ्याला बळ देणारा ठरत आहे. १०० दिवस तुरुंगात राहून आल्यानंतर त्यांनी तेथील आठवणींच्या आधारावर व्यंग्यचित्रांतून अनेक गोष्टी जनतेसमोर मांडल्या व आपली भूमिकाही पटवून दिली.

विकासकामांचा आधारवड म्हणून श्री. ठाकरे व शिवसेनेकडे पाहिले जाते. शिवसैनिकांनी श्री. ठाकरे यांच्या विचारातूनच राज्यातील खेड्यापाड्यापर्यंत विकासकामे उभी केली. ८० टक्के समाजकारण हे त्यांचे ध्येय शिवसैनिकांनी प्रत्यक्षात अमलात आणले. माणसाच्या जगण्याशी संबंधित प्रत्येक गोष्टीसाठी शिवसैनिकांनी पुढाकार घेऊन ती मदत मिळवून दिली. यामध्ये अगदी चष्म्यापासून ते पॅनकार्ड, रेशनकार्डपर्यंत सारे काही गोरगरीब जनतेसाठी उपलब्ध करून दिले. एक रुपयात झुणका-भाकर ही संकल्पना श्री. ठाकरे यांनी राज्यात युतीची सत्ता आल्यानंतर राबवली आणि खऱ्या अर्थाने उपेक्षित, कष्टकरी, दुबळ्या लोकांच्या पोटाला अन्न मिळाले. यासाठी त्यांनी प्रत्येक ठिकाणी ही केंद्रे सुरू करून, दुर्लक्षित घटकाला अन्न मिळेल, अशी व्यवस्था उभी केली. यातून गोरगरीब जनतेमध्ये मदतीची भावना दृढ झाली.

## प्रेरणा

समाजकारण, जनसेवा, अन्याय व अत्याचाराविरुद्ध पेटून उठण्याची प्रेरणा त्यांनी प्रत्येक शिवसैनिकाला दिली. समाजातील सर्वसामान्य कुटुंबातील व्यक्तींना त्यांनी राजकारणात आणले. त्यांना मानाचे स्थान दिले. शिवसेनेतील अनेक नेते असे गरिबीतून उदयास आले. शिवसैनिकाचा राजकीय पिंड ओळखून त्याला मोठे करण्याची किमया श्री. ठाकरे यांनी केली. हेच नेते आज मंत्रिमंडळात असून जनतेची सेवाही करत आहेत. कला, सांस्कृतिक, नाट्य व चित्रपट अशा सर्वच क्षेत्रांत त्यांनी आपला ठसा उमटवला. त्यांनी या सर्व क्षेत्रांतही आपला एक वेगळा चाहतावर्ग तयार केला. कलावंतांवर त्यांनी अत्यंत प्रेम केले आणि त्यांच्या कलेला दादही मिळवून दिली. सर्वच क्षेत्रांत आपला ठसा उमटवणारा असा नेता म्हणजे शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे होय. म्हणूनच त्यांना अष्टपैलू नेता म्हणून महाराष्ट्रातील जनता आजही ओळखते व यापुढेही ओळखत राहील.

**निवासी संपादक, सकाळ, कोल्हापूर**

## डिसेंबर महिन्यातील महत्त्वाच्या घडामोडींचा आढावा..




महाराष्ट्र पोलीस प्रबोधिनीत ११७व्या दीक्षांत संचलनात मानवंदना स्वीकारताना मुख्यमंत्री उद्धव ठाकरे

### पोलीस प्रबोधिनी दीक्षांत समारंभ

महाराष्ट्र पोलीस प्रबोधिनी, नाशिक येथे प्रशिक्षणार्थी पोलीस उपनिरीक्षक सत्र क्र.११७ च्या दीक्षांत संचलन मुख्यमंत्री श्री. उद्धव ठाकरे यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडला. या कार्यक्रमाला गृहमंत्री एकनाथ शिंदे, पोलीस महासंचालक सुबोधकुमार जयस्वाल, महाराष्ट्र पोलीस प्रबोधिनीच्या संचालिका अश्वती दोरजे आदी उपस्थित होते.

सक्षम समाज घडवण्यासाठी समर्थपणे आपले कर्तव्य बजावावे. कठोर मेहनतीनंतर मिळालेल्या वर्दीला भ्रष्टाचार मुक्त ठेवत चारित्र्यावर कुठलाही कलंक लागू नये याची दक्षता घ्यावी, असे प्रतिपादन राज्याचे मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी केले.

मुख्यमंत्र्यांच्या हस्ते प्रशिक्षणादरम्यान उत्तम कामगिरी करणाऱ्या अधिकाऱ्यांना पारितोषिके प्रदान करण्यात आली. संतोष कामटे यांना सर्वोत्कृष्ट प्रशिक्षणार्थी 'स्वॉर्ड ऑफ ऑनर' व 'बेस्ट कॅडेट इनडोर स्टडिज' (सिल्व्हर बॅटन) ने सन्मानित करण्यात आले. अहिल्याबाई होळकर कप बेस्ट ऑल राऊंड वुमेन कॅडेट व सेकंड बेस्ट ट्रेनी ऑफ द बॅच विजया पवार, बेस्ट कॅडेट इन आऊट डोअर (गोल्ड कप) सागर साबळे यांना प्रदान करण्यात आला.

### धान उत्पादक शेतकऱ्यांना अनुदान

धान उत्पादक शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी शासनाकडून प्रती क्विंटल ५०० रुपयांचे अनुदान देण्यात येणार आहे.

२०१९-२० या हंगामातील धान उत्पादकांसाठी केंद्र शासनाने किमान आधारभूत किंमत निश्चित केली आहे. तथापि धान उत्पादनाच्या खर्चात वाढ झाली आहे. त्यावर शेतकऱ्यांना दिलासा देणे आवश्यक होते. त्यानुसार राज्यातील धान उत्पादक शेतकऱ्यांना पन्नास क्विंटलच्या मर्यादेत प्रतिक्विंटल ५०० रुपयांचे प्रोत्साहन अनुदान देण्याचा प्रस्ताव होता. या प्रस्तावाला मुख्यमंत्र्यांनी मान्यता दिली आहे. यामुळे राज्यातील धान उत्पादक शेतकऱ्यांना २०१९-२० मधील पणन हंगामात मोठा दिलासा मिळणार आहे.

### निवडणुकांसाठी १९० मुक्त चिन्हे

राज्य निवडणूक आयोगाकडे एकूण २६० राजकीय पक्षांची नोंदणी झाली असून यापैकी १६ मान्यताप्राप्त राजकीय पक्ष असल्याने त्यांची निवडणूक चिन्हे आरक्षित आहेत. उर्वरित २४४ नोंदणीकृत राजकीय पक्ष; तसेच अपक्ष उमेदवारांसाठी राज्य निवडणूक आयोगाने आता ४८ ऐवजी १९० मुक्तचिन्हे निश्चित केली आहेत, अशी माहिती राज्य निवडणूक आयुक्त यू. पी.एस. मदान यांनी दिली.

राज्यातील ग्रामपंचायती वगळता अन्य स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका पक्षीय पातळीवर लढवल्या जातात. त्यासाठी संबंधित राजकीय पक्षांना राज्य निवडणूक आयोगाकडे नोंदणी करणे बंधनकारक असते. भारत निवडणूक आयोगाकडून मान्यताप्राप्त पक्षाने राज्य निवडणूक आयोगाकडे नोंदणी केल्यास संबंधित पक्षाचे निवडणूक चिन्ह स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसाठीदेखील आरक्षित केले जाते. राज्य निवडणूक आयोगाकडे अशा एकूण १६ पक्षांनी नोंदणी केली आहे. त्यात सहा राष्ट्रीय, दोन महाराष्ट्रातील राज्यस्तरीय; तर आठ इतर राज्यातील राज्यस्तरीय राजकीय पक्षांचा समावेश आहे. उर्वरित २४४ नोंदणीकृत राजकीय पक्ष आहेत. यांच्यासाठी कुठलेही निवडणूक चिन्ह आरक्षित नसते. हे सर्व मिळून आतापर्यंत आयोगाकडे एकूण २४४ राजकीय पक्षांची नोंदणी झाली आहे.

आयोगाच्या १८ जानेवारी २०१७ च्या अधिसूचनेनुसार ४८ मुक्त चिन्हे निश्चित करण्यात आली होती. त्यात आता ३० नोव्हेंबर २०१९ रोजीच्या अधिसूचनेनुसार १४२ नव्या चिन्हांची भर घालण्यात आली आहे. त्यामुळे ही संख्या आता १९० झाली आहे.

### वन्यप्राण्यांसाठी डीएनए प्रयोगशाळा

वन्यप्राण्यांची डीएनए चाचणी करण्यासाठी राज्याच्या वन विभागाने स्वत:ची प्रयोगशाळा उभारण्याचा निर्णय घेतला आहे. अशी प्रयोगशाळा उभारणारा वन विभाग देशात पहिला ठरला आहे.

मानव वन्यजीव संघर्षात विशेषत: जेव्हा यात मनुष्यमृत्यूच्या घटना घडतात तेव्हा, त्या घटनेला कारणीभूत प्राण्याला ओळखून त्याला जेरबंद करणे अत्यंत महत्त्वाचे ठरते. आतापर्यंत अशा वन्य प्राण्याची ओळख पटवण्यासाठी पायांचे ठसे किंवा शरीरावरील ठिपके/पट्टयांचा वापर केला जात होता. आता प्राण्यांची तंतोतंत ओळख होण्याकरिता प्राण्यांची डी.एन.ए चाचणी करणे आवश्यक ठरत असल्याची बाब लक्षात घेऊन वन विभाग स्वत:ची प्रयोगशाळा उभारणार आहे.

सद्य:स्थितीत डी.एन.ए. चाचणी करण्यासाठीचे नमुने (हैदराबाद) व भारतीय वन्यजीव संस्थान (डेहराडून) यांच्याकडे पाठवले जातात. या चाचणीचे परिणाम मिळण्याकरिता अनेक महिने वाट पहावी लागते. दरम्यान मानव वन्यजीव संघर्षात कारणीभूत ठरलेल्या प्राण्याची तंतोतंत ओळख निश्चित न झाल्याने वन्यजीव संरक्षण अधिनियम १९७२ चे कलम ११ व राष्ट्रीय व्याघ्रसंवर्धन प्राधिकरण यांच्या मार्गदर्शक सूचनेनुसार प्राण्याला जेरबंद करण्याचे आदेश काढण्यास अडचण निर्माण होते. डी.एन.ए. चाचणीचे परिणाम लवकर प्राप्त व्हावेत, याकरिता वन विभागात स्वतंत्र डी.एन.ए. चाचणी प्रयोगशाळा स्थापन करणे अत्यंत आवश्यक होते.

### 'कदाचित अजूनही' काव्य संग्रहास साहित्य अकादमी पुरस्कार

प्रसिद्ध मराठी कवयित्री अनुराधा पाटील यांच्या 'कदाचित अजूनही' या काव्य संग्रहास वर्ष २०१९ साठीचा सर्वोत्कृष्ट मराठी कलाकृतीचा साहित्य अकादमी पुरस्कार जाहीर झाला.

### वनेतर क्षेत्रातील वृक्षाच्छादनात महाराष्ट्र देशात प्रथम

केंद्रशासनाने प्रसिद्ध केलेल्या भारतीय वन सर्वेक्षण अहवाल २०१९ नुसार महाराष्ट्राचे वनेतर क्षेत्रातील वृक्षाच्छादन २०१७ च्या तुलनेत ९८३१ चौ.कि.मी.हून वाढून २०१९ मध्ये १०,८०६ चौ.कि.मी. इतके झाले आहे. ही वाढ ९७५ चौ.कि.मी. आहे. वनेतर क्षेत्रातील वृक्षाच्छादनात महाराष्ट्र देशात पहिल्या क्रमांकावर आहे. राज्याच्या वनाच्छादनात सुद्धा ९६ चौ.कि.मी.ची वाढ नोंदवण्यात आली आहे.

देशातील वनक्षेत्र आणि वृक्षाच्छादनाबाबत भारतीय वन सर्वेक्षण अहवाल दर दोन वर्षांनी प्रसिद्ध होतो. २०१७ ते २०१९ मधील वनस्थिती अहवाल नुकताच प्रसिद्ध झाला असून त्यात ही माहिती देण्यात आली आहे.

**कांदळवन क्षेत्रात १६ चौ.कि.मी.ची वाढ :** राज्यातील कांदळवनक्षेत्रात १६.२७ चौ.कि.मी.ची वाढ झाल्याचे याच अहवालात नोंदवण्यात आले आहे. ही वाढ प्रामुख्याने रायगड, मुंबई उपनगर, ठाणे, रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्ह्यांत आहे. महाराष्ट्र यात देशात दुसऱ्या क्रमांकावर आहे. २०१४ ते २०१९ या कालावधीत १,४७,८१४ हेक्टर क्षेत्र नव्याने राखीव वनक्षेत्र म्हणून घोषित करण्यात आल्याबद्दल महाराष्ट्राचा विशेष उल्लेख भारतीय वन सर्वेक्षण अहवालात करण्यात आला आहे. पर्यावरण समतोल आणि संरक्षणाच्या दृष्टीने महाराष्ट्राच्या भरीव कामगिरीची दखल या अहवालात घेण्यात आली आहे.



**नावीन्यपूर्ण उपक्रमांची दखल :** महाराष्ट्राने वन आणि वन्यजीव संरक्षण आणि संवर्धनासाठी उपयोगात आणलेल्या माहिती तंत्रज्ञान सुविधांचा अहवालात आवर्जून उल्लेख करण्यात आला आहे. माय प्लँट ॲप, महाराष्ट्र हरित सेना, हॅलो फॉरेस्ट १९२६ आणि वनीकरणासाठी विविध घटकांचा सहभाग यासारख्या नावीन्यपूर्ण उपक्रमांबद्दलची विशेष दखल अहवालात विशेषत्वाने घेण्यात आली आहे.

**राज्याच्या हिताच्या अनेक योजनांना मंत्रिमंडळात सर्वात आधी मान्यता दिली जाते.
अशा निर्णयांचा विस्तृत आढावा..**

# मंत्रिमंडळात ठरले...

### समृद्धी महामार्ग

महाराष्ट्र समृद्धी महामार्गासाठी अतिरिक्त ३५०० कोटी रुपये निधी भागभांडवल म्हणून देण्याचा निर्णय घेण्यात आला. यामुळे महामार्गासाठीच्या कर्जावरील व्याज २५०० कोटी रुपये इतक्या रकमेने कमी होईल. तसेच १६५०० कोटी रुपयांच्या कर्जासाठी हमी देण्याची गरज पडणार नाही. या अनुषंगाने महामार्गाच्या मंजूर वित्तीय आराखड्यातील बदलास मान्यता देण्यात आली.

महाराष्ट्र समृद्धी महामार्गाची सुधारित किंमत ५५,३३५ कोटी रुपये इतकी असून या प्रकल्पासाठी आतापर्यंत २४ हजार ५०० कोटी रुपये इतक्या रकमेचे कर्ज विशेष उद्देशवाहन (NMSCEW Ltd.) यांना मंजूर झाले आहे. सद्य:स्थितीत महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने ३५०० कोटी रुपये, राज्यातील सार्वजनिक उपक्रमांनी ५५०० कोटी रुपये, गौण खनिजांच्या शुल्कांच्या माफीपोटी (रॉयल्टी) २४१४ कोटी, बांधकाम कालावधीतील कर्जावरील व्याजापोटी ६३९६ कोटी आणि जागेच्या किमतीपोटी ९५२५ कोटी रुपये असे २७ हजार ३३५ कोटी रुपये हे शासनाचे भागभांडवल आहे. जितके कर्ज कमी तितकी या प्रकल्पाची आर्थिक सुसाध्यता राहील, यासाठी शासनाने ३५०० कोटी रुपये निधी भागभांडवल म्हणून देण्याचा निर्णय घेतला.


### वित्तीय करारांना मुद्रांक शुल्क माफी

महाराष्ट्र समृद्धी महामार्ग प्रकल्पासाठी विविध वित्तीय संस्था तसेच महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ आणि नागपूर मुंबई सुपर कम्युनिकेशन एक्सप्रेस वे लि. यांच्या दरम्यान करण्यात आलेल्या वित्तीय करारांच्या नोंदणीसाठी मुद्रांक शुल्क आकारणीस सूट देण्यात येईल. नोंदणी अधिनियम-१९०८ मधील तरतुदीनुसार नोंदणी शुल्कात सूट देण्यात येईल.

### आकस्मिकता निधीच्या मर्यादेत वाढ

महाराष्ट्र आकस्मिकता निधीच्या मर्यादेत वाढ करून ५ हजार ३५० कोटी रुपये इतका निधी उपलब्ध करून देण्यास मान्यता देण्यात आली.

महाराष्ट्र राज्याचा आकस्मिकता निधी हा मुंबई आकस्मिकता नियम, १९५६ अन्वये स्थापन करण्यात आला आहे. त्याची कायमस्वरूपी मर्यादा १५० कोटी आहे. या कायमस्वरूपी मर्यादेत तत्कालिक कारणांमुळे वेळोवेळी तात्पुरती वाढ करावी लागते. गेल्या खरीप हंगामात राज्यातील परतीचा अवकाळी पाऊस तसेच महावादळामुळे भात, ज्वारी, बाजरी, मका, भुईमूग, सोयाबीन, तूर, कापूस, भाजीपाला,




**नियोजित द्रुतगती महामार्ग लांबी - 710 कि.मी.,
वेगमर्यादा -150 कि.मी. प्रतितास, प्रवासवेळ -फक्त 6 तास**

फळपिके यांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले.

या निर्णयामुळे नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना तातडीने मदत वाटप करण्याकरिता ५ हजार कोटी व न्यायालयीन प्रकरणांसाठी ३५० कोटी इतका निधी अग्रिमाद्वारे उपलब्ध करून देणे शक्य होईल.

## अवैध उत्खननावर कारवाई

गौण खनिजाचे अवैध उत्खनन व वाहतुकीस प्रभावीपणे आळा घालण्यासाठी जिल्हाधिकारी यांनी प्राधिकृत केलेल्या कोणत्याही महसुली अधिकाऱ्यास आता अधिकार देण्याच्या अध्यादेशाचे अधिनियमात रूपांतर करण्यास मान्यता दिली.

सध्या महाराष्ट्र जमीन महसूल संहिता १९६६ मधील कलम ४८ मध्ये खाणी व खनिजे यावरील शासनाच्या मालकी हक्काबाबत तरतूद आहे. यातील पोटकलम (८) नुसार तहसीलदारापेक्षा कमी दर्जाच्या अधिकाऱ्यांनी अवैध उत्खनन व वाहतुकीस आळा घालण्यासाठी यंत्रसामग्री व वाहने जप्त केल्यास संबंधित व्यक्तीकडून न्यायालयात आव्हान देण्यात येत होते. त्यामुळे हा निर्णय घेण्यात आला.

विद्यमान परिस्थितीत तहसीलदाराच्या दर्जापेक्षा खालच्या दर्जाच्या कोणत्याही महसूली अधिकाऱ्याने अनधिकृतपणे गौण खनिजे काढण्यासाठी वापरलेली यंत्रसामग्री व साधनसामग्री ताब्यात घेतल्यास किंवा ती सरकारजमा केल्यास त्याची कारवाई कलम (८) च्या खंड (१) च्या तरतुदीविरोधी ठरते. गौण खनिजे बेकायदेशीरपणे काढण्यास व त्यांच्या वाहतुकीस आळा घालण्यासाठी पोटकलम (८ ) च्या खंड (१) मधील 'तहसीलदाराच्या दर्जापेक्षा कमी दर्जाचा नसेल असा' हा मजकूर वगळता यावा म्हणून त्यात सुधारणा करणे आवश्यक होते.

## अधिसंख्य पदे

अनुसूचित जमातीचे जात वैधता प्रमाणपत्र सादर न केल्याच्या कारणास्तव सेवा समाप्त होणाऱ्या व यापूर्वी सेवा समाप्त करण्यात आलेल्या अंदाजे ५२९८ अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या संख्येइतकी अधिसंख्य पदे निर्माण करून त्यांना मानवतावादी दृष्टिकोनातून तात्पुरत्या स्वरूपात ११ महिन्यांकरिता नेमणूक देण्याचा निर्णय मंत्रिमंडळाने घेतला.

सर्व प्रशासकीय विभागांनी खुद्द व त्यांच्या अधिपत्याखालील शासकीय/ निमशासकीय कार्यालयातील अनुसूचित जमातीच्या खालील कर्मचारी/अधिकाऱ्यांची संवर्गनिहाय संख्या निश्चित करावी व त्यानंतर त्यांच्या सेवा अधिसंख्य पदांवर वर्ग करून त्यांची पदे ३१ डिसेंबर, २०१९ पर्यंत रिक्त करणाच्या सूचना करण्यात आल्या.

सर्व प्रशासकीय विभागांनी खुद्द व त्यांच्या अधिपत्याखालील कार्यालयातील वरीलप्रमाणे रिक्त होणारी अनुसूचित जमातीच्या प्रवर्गाची पदे अनुसूचित जमातीचे जात वैधता प्रमाणपत्र धारक उमेदवारांमधून सेवाप्रवेश नियमानुसार विहित कार्यपद्धतीचा अवलंब केला जाईल. कालबद्ध कार्यक्रम आखून पदे भरण्याची कार्यवाही केली जाईल.

अधिकारी व कर्मचारी यांना अधिसंख्य पदांवर तात्पुरत्या स्वरूपात ११ महिन्यांकरिता नेमणूक दिल्यानंतर त्यांना अनुज्ञेय करावयाच्या सेवाविषयक आणि सेवानिवृत्तीविषयक लाभांबाबत सविस्तर अभ्यास करून शासनास शिफारशी करण्यासाठी स्वतंत्र मंत्रिगटाची स्थापना करण्यात येईल.

## जीएसटी कायद्याची अंमलबजावणी

केंद्रीय वस्तू व सेवा कर तसेच राज्य वस्तू व सेवा कर यांची दुहेरी आकारणी राज्यांतर्गत व्यवहारांवर होते. १ ऑगस्ट २०१९ रोजी केंद्रीय वस्तू व सेवा कर अधिनियमांमध्ये सुधारणा झाल्या आहेत. एकाच व्यवहारावर दुहेरी कर आकारणी (सीजीएसटी आणि एसजीएसटी) होत असल्याने, या दोन्ही कायद्यांमध्ये एकवाक्यता असणे आवश्यक असल्याने महाराष्ट्र वस्तू व सेवा कर (सुधारणा) अधिनियम, २०१९ मध्ये एकूण २२ सुधारणा करण्यास मंत्रिमंडळाने मान्यता दिली.

केंद्रीय वस्तू व सेवा कर कायदा, २०१७ व एकत्रित वस्तू व सेवाकर कायदा २०१७ यामध्ये सुधारणा करण्यात आल्या आहेत. या अनुषंगाने राज्याने राज्य वस्तू व सेवा कर अधिनियमामध्ये तत्सम सुधारणा करणे आवश्यक होते.

करदात्यांसाठी आपसमेळ योजना, राष्ट्रीय आगाऊ अधिनिर्णय अपिल प्राधिकरण स्थापन करणे, करदात्यांसाठी सुलभ प्रक्रिया व अडचणींची सोडवणूक करून दिलासा देणे, कायद्याचे सुसूत्रीकरण करणे व तांत्रिक दुरुस्त्या अशा स्वरूपाचे प्रस्ताव या सुधारणा अधिनियमामध्ये समाविष्ट केले आहेत.

## जनतेच्या प्रश्नांची चांगली जाण असलेली 'बेस्ट टीम'

जनतेच्या प्रश्नांची चांगली जाण असलेले अनुभवी आणि उत्तम नेते राज्य मंत्रिमंडळात असून ही एक बेस्ट टीम आहे अशा शब्दात मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी मंत्रिमंडळाच्या विस्तारानंतर झालेल्या पहिल्या मंत्रिपरिषदेत आपल्या भावना व्यक्त केल्या.

या ठिकाणी भिन्न भिन्न विचारांचे पक्ष एकत्र आले असले तरी आपण जनतेतून निवडून आलेलो असल्याने त्यांचे प्रश्न सोडवणे यावर सगळे एक आहोत. एक कुटुंब म्हणून या ठिकाणी आपल्याला काम करायचे आहे. एखाद्या विषयावर वेगवेगळी भूमिका जरी असली तरी राज्याच्या हिताचे काय, त्याचा विचार आपल्याला करायचा आहे. आपली ही 'बेस्ट टीम' प्रत्येक सामना जिंकेलच आणि राज्याला अधिक प्रगतिपथावर पोहोचवेल, असा विश्वास मुख्यमंत्र्यांनी व्यक्त केला.



शिवनेरी किल्ला

गडकिल्ल्यांची भ्रमंती हा मराठी माणसाचा केवळ सुटीत वेळ घालवण्यासाठीचा उद्योग नाही, त्याकडे तो पर्यटन म्हणूनही पाहत नाही. गडावर जाणे ही त्याच्यासाठी अभिमानाची बाब असते. शिवछत्रपतींना त्याने केलेले ते वंदन असते. शिवाजी महाराजांच्या आणि त्यांच्या मावळ्यांच्या पराक्रमाचे पोवाडे ऐकतच आपण लहानाचे मोठे झालो आहोत. त्यामुळेच त्यांचा पावनस्पर्श झालेल्या कोणत्याही गडावर प्रवेश करताच आपण भूतकाळात शिरतो आणि पराक्रमाचे साक्षीदार असलेले किल्ले आपल्यासमोर इतिहास उलगडून ठेवतात. शिवनेरीवर शिवरायांचा जन्म झाला असल्याने त्यांच्याशी संबंधित असलेल्या सर्व गडकिल्ल्यांमध्ये या गडाला आगळेवेगळे स्थान आहे.

# महाराष्ट्राचा मानबिंदू : शिवनेरी

**सारंग खानापूरकर**

शिवबाचा जन्म १६३० मध्ये झाला अन् त्यांना घेऊन जिजाऊंनी १६३२ मध्ये गड सोडला. १६३७ मध्ये शिवनेरी मुघलांच्या ताब्यात गेला. या घटनांमुळे शिवजन्माच्या वेळेची परिस्थिती समजून घेण्यास अधिक मदत होते. अशा कठीण काळात शिवरायांनी निर्माण केलेल्या स्वराज्याचे महत्त्व लक्षात येते. त्यामुळे या किल्ल्यावर शिवाजीराजे केवळ जन्मानंतर दोनच वर्षे राहिले असले तरी त्यांचे जन्मस्थान म्हणून शिवप्रेमींना या किल्ल्याचे प्रचंड महत्त्व वाटते. शिवरायांनी मराठी माणसामध्ये पराक्रमाची ज्योत पेटवली. त्यांनी मराठी मनांमध्ये फुंकलेल्या स्वाभिमानामुळेच आज आपण ताठ मानेने जगत आहोत. त्यामुळेच त्यांचे जन्मस्थान असलेल्या शिवनेरीला भेट देऊन त्यांना वंदन करणे आपले कर्तव्य आहे.



किल्ले पर्यटन

## थोडक्यात इतिहास

जीर्णनगर अर्थात सध्याचे जुन्नर ही शक राजा नहपान याची राजधानी होती. गौतमीपुत्र सातवाहन सातकर्णीने शकांचा पराभव करून जुन्नर आणि परिसरावर आपले अधिराज्य प्रस्थापित केले. सातवाहनांच्याच काळातच नाणेघाट खोदला गेला. नाणेघाटातून मोठा व्यापार चालत असल्याने या व्यापारावर देखरेख ठेवण्यासाठी शिवनेरी गडाची निर्मिती करण्यात आली. अर्थात, नाणेघाटाचे रक्षण करणारा हा एकटाच किल्ला नाही. पूर्वेला नारायणगड, उत्तरेला हरिश्चंद्रगड, पश्चिमेला हडसर, चावंड, जीवधन, भैरवगड आणि दक्षिण दिशेला राजमाची, ढाक, गोरक्षगड, मच्छिंद्रगड आणि सिद्धगड असे भक्कम किल्ले चहूबाजूंनी द्वारपालासारखे उभे आहेत. सातवाहनांनंतर चालुक्य, यादव, बहामनी, निजाम यांच्या ताब्यात शिवनेरी होता. १५९५ मध्ये मालोजीराजे भोसले यांच्याकडे तो आला. याच गडावर भोसलेंची सून जिजाऊ यांनी १६३० मध्ये शिवबाला जन्म दिला आणि महाराष्ट्राच्या क्षितिजावर नवा सूर्य उगवला. गडावर शिवाई देवीचे देऊळ आहे. याच देवीच्या नावावरून ‘शिवाजी’ हे नाव ठेवले गेले आहे. जिजाऊ साहेबांनी १६३२ मध्येच हा गड सोडला. नंतर १६३७ मध्ये तो मुघलांच्या ताब्यात गेला. नंतरच्या काळात शिवाजी महाराजांनी अनेक प्रयत्न करूनही तो त्यांच्या हयातीत स्वराज्यात आला नाही. नंतर १७१६ मध्ये शाहू महाराजांनी तो स्वराज्यात आणला. ज्या शिवनेरीवर महाराष्ट्राचा मानबिंदू अवतरला, त्याच शिवनेरीवर शिवजन्मतिथीला २७ एप्रिल १९६० ला वेगळ्या महाराष्ट्र राज्याची घोषणा करण्यात आली होती.


शिवजन्मस्थान

**शिवाई देवीचे देऊळ** : गडावरील शिपाई दरवाजातून आत गेल्यावर शिवाई मंदिर आहे. या मंदिराच्या मागे




## अंबरखाना

किल्ल्यावर धान्य साठवून ठेवण्यासाठी याचा वापर होत असे. ईस्ट इंडिया कंपनीच्या डॉ. जॉन फ्रायर यांनी या गडाला भेट दिली होती. या गडावर एक हजार माणसांना सात वर्षे पुरेल इतके धान्य साठवून ठेवण्याची सोय आहे, अशी नोंद फ्रायर यांनी करून ठेवली आहे. अंबरखान्याच्या उजव्या हाताला इदगाह आणि कोळी चौथरा आहे. हा गड मुघलांच्या ताब्यात असताना जुन्नर परिसरातील कोळ्यांनी १६५० च्या सुमारास त्यांच्याविरोधात बंड केले होते. मुघलांनी आपल्या पाशवी सामर्थ्याने हे बंड मोडून काढले आणि कोळ्यांना पकडून शिवनेरीवर आणले आणि त्यांची कत्तल केली. जिथे कोळ्यांची मुंडके उडविली, त्या चौथऱ्याला कोळी चौथरा म्हणतात.

दगडामध्ये कोरलेल्या सहा ते सात गुंफा आहेत. या गुंफा राहण्यायोग्य नाहीत. देऊळ मूळचे लेणेच आहे. दर्शन घेऊन पुन्हा शिपाई दरवाज्यात या आणि पायऱ्या चढून वर जा, तुम्ही गडाच्या माथ्यावर येता. पुढे तुम्हाला अंबरखाना दिसेल.

## पाण्याचे टाके

गडावर गंगा, यमुना नावाने टाक्या आहेत. यामध्ये बारमाही पाणी असते. याशिवाय गडावर लहानमोठी अशी सुमारे पन्नास टाकी आहेत. या टाक्यांमध्ये मुबलक पाणी असते.

## शिवजन्मस्थान

शिवकुंजासमोरच शिवाजी महाराजांचा जन्म झाला ती दुमजली इमारत आहे. या इमारतीच्या तळमजल्यावर शिवबाचा जन्म झाला. या इमारतीमध्ये शिवाजी महाराजांचा पुतळा उभारण्यात आला आहे. जन्मस्थानासमोर उजव्या बाजूला कमानवजा मशीद आहे. या मशिदीच्या बाजूलाच किल्ल्याची चोरवाट असून ती तुम्हांला थेट जुन्नरमध्ये नेते. जन्मस्थानापासून उत्तरेला बदामी तलाव आहे. या मानवनिर्मित तलावाला चांगला चौथरा आणि कमान आहे. ब्रिटिशांनी केलेल्या हल्ल्यानंतर या तळ्यातील झरे बुजले आणि तो कोरडा झाला. तळ्याच्या मागे कैदखाना होता. आता त्याचे अवशेष शिल्लक आहेत.

## साखळीची वाट

शिवनेरीवर प्रवेश करण्यासाठीची ही अवघड वाट आहे. उंच चढ चढून जाण्यासाठी साखळ्यांची सोय केली असल्याने याला साखळीची वाट म्हणतात. दगड खोदून तयार केलेली ही पायऱ्यांची वाट आहे.

## शिवकुंज

बालशिवाजी हातात तलवार घेऊन जिजाऊ साहेबांना आपली स्वप्ने सांगत असल्याचे अत्यंत देखणे शिल्प शिवकुंजमध्ये उभारण्यात आले आहे. जवळच रामचंद्रअमात्यांचे आज्ञापत्र आहे. महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांनी शिवकुंज'ची पायाभरणी केली होती.


शिवकुंज

## सात दरवाजा


शिवनेरीमध्ये प्रवेश करण्यासाठीचा हा सोपा मार्ग आहे. संरक्षणाच्या दृष्टीने अत्यंत धोरणीपणाने उभारलेले हे सात दरवाजे शिवनेरीचे रक्षण करतात. सुबक पायऱ्यांनी हा मार्ग बनलेला आहे.

## शिवनेरीची रचना

गडाचा आकार बाणाच्या टोकासारखा त्रिकोणी आहे. हे बाणाचे टोक उत्तर दिशेकडे रोखलेले आहे. शिवनेरीवर प्रवेश

करण्यासाठी दोन मार्ग आहेत, जरा अवघड वाटणारी साखळीची वाट आणि सोपी असणारी सातवाहनकालीन सात दरवाज्यांची वाट. साखळीची वाट पूर्वी बिकटच होती. आता मात्र मजबूत साखळ्या लावून ती बिनधोक करण्यात आली आहे. हे दोन मार्ग पुरेसे नाहीत म्हणून की काय अडीअडचणीला हाताशी असावी म्हणून एक चोरवाटही आहे. महा दरवाजा, पीर दरवाजा, परवानगी दरवाजा, हत्ती दरवाजा, शिपाई दरवाजा, फाटक दरवाजा आणि कुलाबकर दरवाजा अशी या सात दरवाजांची नावे आहेत. परवानगी दरवाजाच्या दोन्ही बाजूंना शरभाची चित्रे आहेत. शरभ हा वाघ अथवा सिंहासारखा दिसणारा काल्पनिक पशू आहे. या शरभाच्या पायाखाली हत्ती दाखवण्यात आला आहे. येथे गंडभेरुंड या काल्पनिक पक्ष्याचेही चित्र आहे. शिपाई दरवाजाच्या कमानीवरही चित्रे आहेत. शिपाई दरवाजाची तटबंदी हा बांधकामाचा उत्कृष्ट नमुना आहे. गडाची मजबुती पाहून त्याला जुन्नरचा रक्षणकर्ता का म्हणतात, ते समजते. या किल्ल्याचा विस्तार साधारणपणे १.६ किमी आहे. गड पाहण्यासाठी दोन ते तीन तास लागतात.

शिवनेरी किल्ला बराच काळ दुर्लक्षित राहिला होता. नंतर मात्र १९२५ ला शिवजन्मस्थानाचा जीर्णोद्धार झाला. महाराष्ट्र राज्याची निर्मिती झाल्यावर किल्ल्याच्या दरवाजापर्यंत रस्ता गेला आहे. अजूनही गडावर सुधारणा होत आहेत.


कडेलोट

### कडेलोट कडा

कैदखान्याच्या मागेच कडेलोट कडा आहे. गुन्हेगारांना शासन करताना या कड्यावरून खाली दरीत ढकलून दिले जात असे. सुमारे दोन हजार फूट उंच असलेल्या या कड्यावर जोरदार वारे असते. त्यामुळे येथे जाताना जपूनच जावे.

### शिवनेरीची वैशिष्ट्ये

**समुद्रसपाटीपासून उंची :** ३५०० फूट
**तळापासून उंची :** १००० फूट
**पायथ्याचे गाव :** जुन्नर

### शिवनेरीच्या जवळील इतर पर्यटनस्थळे

अष्टविनायकांमधील एक लेण्याद्री, नारायणगड, खोदड येथील जगप्रसिद्ध दुर्बीण, हरिश्चंद्रगड, ओतूर, ओझरचा विघ्नेश्वर.

## शिवनेरीला कसे याल?

**पुण्यापासून -** पुणे जिल्ह्यातील जुन्नरमध्येच हा किल्ला आहे. पुण्यापासून शिवनेरी १०५ किलोमीटर अंतरावर आहे. एसटीने जुन्नरला येऊन गडावर जाता येते.

**मुंबईपासून -** मुंबई-ठाणे-कल्याण-आळे फाटा मार्गे जुन्नर. कल्याण-नगर रस्त्यावरील माळशेज घाट पार केल्यावर साधारण आठ किलोमीटरनंतर शिवनेरीकडे जाणारा फाटा लागतो. तेथून गड १९ किलोमीटरवर आहे.

**नाशिकहून-** नारायणगावमार्गे जुन्नर.

मुंबईहून अथवा पुण्याहून जायचे असले तरी गड एका दिवसात पाहून परतता येते.

**नोंदणी व मुद्रांक विभागाने, दस्तनोंदणी व मुद्रांकशुल्क व्यवस्थापन या दोन्ही सेवाक्षेत्रांमध्ये, संबंधित नागरिकांची कामे समान, सुलभ, पारदर्शीपणे व गतीने व्हावीत, या उद्देशाने विविध उपक्रम राबवले आहेत. त्या उपक्रमांची नागरिकांना माहिती व्हावी, तसेच त्यांनी या उपक्रमांचा पुरेपूर वापर करावा हे या लेखमालेचे प्रयोजन आहे.**



# सुलभ आणि जलद

**नयना बोदार्डे – गुरव**

विभागाने सुरू केलेल्या 'ऑनलाइन डिजिटल डॉक्युमेंट सबमिशन' उपक्रमाची आपण माहिती घेणार आहोत. हा उपक्रम दुय्यम निबंधक कार्यालयात होणाऱ्या दस्तनोंदणी कार्यपद्धतीशी संबंधित आहे.

## प्रचलित पद्धत

साधारणपणे, व्यवहार करणाऱ्या व्यक्ती, त्या व्यवहाराच्या पूर्ततेसाठी दस्तऐवज तयार करतात किंवा वकिलांसारख्या तज्ज्ञ व्यक्तींकडून तयार करून घेतात. त्यानंतर योग्य मुद्रांकशुल्क भरून त्या दस्तऐवजांवर सह्या केल्या जातात. दस्तनोंदणी करण्याच्या उद्देशाने विभागाच्या संकेतस्थळावरील 'पब्लिक डेटा एन्ट्री' सुविधेचा वापर करून त्याची डेटा एन्ट्री केली जाते. त्यानंतर मूळ दस्त संबंधित दुय्यम निबंधक कार्यालयात नोंदणीसाठी सादर केला जातो. दुय्यम निबंधक त्या दस्ताची तपासणी करतात व तो दस्त नोंदणीस स्वीकारण्यास पात्र असेल तर नोंदणीस स्वीकारून, पक्षकारांचे फोटो, अंगठ्याचे ठसे घेऊन दस्ताची नोंदणी पूर्ण करतात. त्यानंतर तो संपूर्ण दस्त, जोडलेली कागदपत्रे, फोटो व अंगठ्याचे ठसे घेतलेली पाने (ज्याला नोंदणीच्या भाषेत गोषवारा भाग-१ व भाग-२ संबोधले जाते) एकत्रित करून त्यावर पेजिंग केले जाते. तसेच दुय्यम निबंधक कार्यालयाची मोहोर उमटवली जाते. असा एकत्रित दस्त स्कॅन करून पक्षकारांना परत दिला जातो.

***नोंदणी व मुद्रांकशुल्क***

**नोंदणी व मुद्रांक विभागाशी संबंधित कायदे, नियम व विविध ई-उपक्रमांची माहिती देण्यासाठी हे सदर सुरू करण्यात आले आहे. नागरिकांच्या दृष्टीने महत्त्वाच्या असलेल्या विषयांना यात प्राधान्य देण्यात येईल.**

## आव्हाने

- व्यवसाय सुलभतेच्या दृष्टिकोनातून या कार्यपद्धतीचा आढावा घेतला असता, विभागाच्या लक्षात आले की, दस्तनोंदणीसाठी दुय्यम निबंधक कार्यालयात गेल्यानंतर, दुय्यम निबंधक यांना दस्तऐवजातील मिळकतीचे मूल्यांकन करणे, मुद्रांकशुल्क निश्चित करणे, दस्तांकित मिळकतीच्या हस्तांतरणावर न्यायालयाने अथवा एखाद्या कायद्याने काही प्रतिबंध घातले आहेत का? याची पडताळणी करणे इत्यादी बाबी तपासाव्या लागतात. या पडताळणीचे स्वरूप पाहता, त्यासाठी काही कालावधी लागणे स्वाभाविक असते. तथापि तेवढा वेळ संबंधित पक्षकारांना कार्यालयात थांबावे लागते.
- तपासणीमध्ये दुय्यम निबंधक यांनी एखादा कागदोपत्री पुरावा नसल्यामुळे दस्तनोंदणी करता येत नसल्याचे कारण दिल्यास, पक्षकारांना त्या दिवशी परत जावे लागते व त्रुटींची पूर्तता करून पुन्हा एखाद्या दिवशी यावे लागते. अशा त्रुटींची



माहिती अगोदरच समजल्यास, पक्षकारांचा हेलपाटा वाचू शकतो.

- मूळ दस्तऐवजांवर पेजिंग करणे व कार्यालयाची मोहोर उमटवणे आणि त्याचे स्कॅनिंग करणे, यासाठी लागणारा वेळ कमी करणे आवश्यक आहे.
- स्कॅनिंगमुळे डेटा साईझ मोठ्या प्रमाणात वाढत चालला आहे. व भविष्यात असा मोठ्या आकारातील डेटा सांभाळणे हे खर्च व तंत्रज्ञानाच्या दृष्टीने आव्हानात्मक होत जाणारे आहे.

या सर्व बाबींचा एकत्रित विचार करून, विभागाने 'ऑनलाइन डिजिटल डॉक्युमेंट सबमिशन' ही सुविधा विकसित करून १ एप्रिल २०१९ पासून नागरिकांना उपलब्ध करून दिली आहे.

## स्वरूप

या सुविधेचा वापर करताना, पक्षकारांनी त्यांचा दस्त प्रचलित पद्धतीनुसारच तयार करावयाचा आहे. मात्र तो निष्पादित करण्याऐवजी (त्यावर सह्या करण्याऐवजी) त्या दस्ताच्या मसुद्याच्या वर्ड फाईलचे पीडीएफ फाईलमध्ये रूपांतर करून, ती पीडीएफ फाईल विभागाच्या संकेतस्थळावर डेटा एन्ट्री पूर्ण केल्यानंतर अपलोड करावयाची आहे.



डेटा एन्ट्री व अपलोड केलेला दस्त मसुदा संबंधित दुय्यम निबंधक यांचेकडे ऑनलाइन प्राप्त होईल. दुय्यम निबंधक त्याची पडताळणी करतील. जर तो दस्तनोंदणीस स्वीकारण्यात काही अडचणी असतील तर तशी नोंद प्रणालीमध्ये करतील. संबंधित पक्षकारांना दुय्यम निबंधक यांच्या या नोंदी, विभागाच्या संकेतस्थळावर पब्लिक डेटा एन्ट्रीमध्ये पाहायला मिळतील, शिवाय त्याबाबतचा 'एसएमएस' देखील मिळेल ही कार्यवाही अर्ज दाखल/कागदपत्रे केल्यापासून साधारण कामकाजाचे ३ दिवसात होईल.

दुय्यम निबंधक यांनी काही त्रुटी कळवल्या असतील तर पक्षकारांनी त्याची पूर्तता करणे अभिप्रेत आहे. काही त्रुटी नाहीत असे कळवले असेल तर, पक्षकार त्यांना निर्धारित केलेल्या दिवशी दुय्यम निबंधक कार्यालयात जाऊन दस्त नोंदवू शकतात.

दस्तनोंदणीच्या वेळी दुय्यम निबंधक त्यांच्याकडे ऑनलाइन प्राप्त मसुद्याची प्रिंट काढून पक्षकारांना देतील, पक्षकार त्यावर सह्या करतील, त्यानंतर दस्ताची नोंदणी प्रक्रिया पूर्ण होईल. त्यानंतर दुय्यम निबंधक केवळ पक्षकारांच्या सह्यांचे पान, जोडलेली इतर कागदपत्रे, गोषवारे भाग-१ व भाग-२ यावरच पेजिंग करून मोहोर उमटवतील व केवळ त्याचेच स्कॅनिंग करतील. पक्षकारांनी ऑनलाइन पाठवलेल्या मसुद्यावर प्रणालीमध्येच पेजिंग व मोहोर उमटवली जाईल. हा मसुदा व स्कॅन्ड पेजेस यांच्या प्रणालीमध्ये एकत्रीकरण (Merging) होईल.

## फायदे

या सुविधेमुळे / पक्षकार दुय्यम निबंधक कार्यालयात जाण्यापूर्वी त्यांच्या नियोजित दस्ताची पडताळणी पूर्ण होणार आहे. काही त्रुटी असतील तर त्यांना पूर्वकल्पना मिळणार आहे.

- त्यामुळे दुय्यम निबंधक दस्त पडताळणीसाठी लागणारा वेळ व प्रतीक्षा कमी होणार आहे. मूळ दस्तावर पेजिंग, मोहोर उमटवणे व स्कॅनिंग करणे, यासाठी लागणारे मनुष्यबळ व वेळ वाचणार आहे. त्यामुळे कामकाजात गतिमानता येईल. स्कॅनिंग डेटा साईझ मर्यादित राहणार असल्याने, डेटा स्टोअरेज संबंधातील आव्हाने कमी होतील.
- ही सुविधा सध्या फक्त मुंबईमधील काही कार्यालयांपुरती मर्यादित असून, नजीकच्या काळात इतर शहरांसाठीही उपलब्ध करून देण्यात येतील.

हा उपक्रम नुकताच कार्यान्वित करण्यात आला असून, प्राथमिक अवस्थेत आहे. या उपक्रमांचा विस्तार व श्रेणीवाढ करून त्यामध्ये निष्पादित दस्तांचादेखील समावेश करणे, विभागाच्या मसुद्यांचा वापर करून दस्त तयार करणे, मसुद्याची प्रणालीद्वारे स्वयंछाननी (Auto Scrutiny) करणे अशा वैशिष्ट्यांचा समावेश करण्याचा विभागाचा प्रयत्न असणार आहे.

या सुविधेचा जास्तीत जास्त नागरिकांनी वापर करावा व या संदर्भात काही सूचना/अडचणी असतील तर विभागाला ८८८८००७७७७ या क्रमांकावर कळवाव्यात, जेणेकरून या सुविधा अधिकाधिक लोकाभिमुख व वापरासाठी सुलभ बनवणे विभागास शक्य होईल.

सहनोंदणी महानिरीक्षक तथा मुद्रांक अधीक्षक (मुख्यालय), पुणे.




# सुरक्षित बँकिंग

**ॲड. प्रशांत माळी**

सर्वसाधारणपणे ऑनलाइन बँकिंग म्हणजे सर्व बँकिंग सुविधांचा उपभोग घरबसल्या तुमच्या मोबाइल फोन किंवा संगणकाद्वारे घेणे. ऑनलाइन बँकिंगमुळे प्रत्यक्ष बँकेत न जाता तुम्ही तुमचे पैसे सहज आणि सोप्या रीतीने कधीही, कोठेही हाताळू शकता. ऑनलाइन बँकिंगचे असंख्य फायदे असल्यामुळे ती सुविधा हाताशी ठेवणे सर्वच ग्राहक पसंत करतात. दिवसाचे चोवीस तास आपल्या बँक खात्यामध्ये कोणतीही उलाढाल करणे शक्य असल्याने तसेच कोणत्याही वेळी पैसे हस्तांतरित करता येत असल्याने, ५० टक्क्यांहून अधिक भारतीय पारंपरिक बँकिंगपेक्षा ऑनलाइन बँकिंगचा पर्याय अवलंबतात. परंतु, ही ऑनलाइन सुविधा वापरत असताना तुम्ही प्रत्येक क्षणाला सतर्क असणे अत्यावश्यक आहे. कारण, ज्या वेळी तुम्ही तुमच्या घरी बसून आरामात बँकिंग सुविधा वापरता, त्याच वेळी दुसऱ्या बाजूला त्याला संलग्न असलेल्या व ऑनलाइन सुरक्षेला घातक ठरणाऱ्या अनेक धोक्यांना तुम्ही आपसूकच आमंत्रण देता. ऑनलाइन बँकिंगची सुरक्षा कशी डळमळीत आहे, याबाबत मत मांडताना मी असे म्हणेन की, गेल्या वर्षी राज्यभरात झालेल्या १०९६ सायबर गुन्ह्यांपैकी क्रेडिट, डेबिट, ऑनलाइन बँकिंग, ओटीपीच्या माध्यमातून सर्वसामान्यांची फसवणूक करण्याचे गैरप्रकार एकट्या मुंबईत सर्वाधिक म्हणजे ४६१ इतके आहेत. या गुन्ह्यांची उकल करण्याचे प्रमाणही अद्याप कमीच आहे. सायबर गुन्हेगारांचा पर्दाफाश करताना तंत्रज्ञानाबाबत येणाऱ्या मर्यादांबरोबरच मोबाइल कंपन्या आणि बँकांकडून पुरेसे सहकार्य मिळणे आवश्यक आहे.

पैसे गमावल्याने जीव जात नसला तरी बँकेच्या खात्यामधून कष्टाचे पैसे गायब झाल्यामुळे माणूस अगदी हबकून गेलेला मी माझ्या सायबर वकिलीच्या कारकिर्दीत पाहिला आहे. असे एक ना

**ऑनलाइन बँकिंगमुळे प्रत्यक्ष बँकेत न जाता तुम्ही तुमचे पैसे सहज आणि सोप्या रीतीने कधीही, कोठेही हाताळू शकता. ऑनलाइन बँकिंगचे असंख्य फायदे असल्यामुळे ती सुविधा हाताशी ठेवणे सर्वच ग्राहक पसंत करतात. दिवसाचे चोवीस तास आपल्या बँक खात्यामध्ये कोणतीही उलाढाल करणे शक्य असल्याने तसेच कोणत्याही वेळी पैसे हस्तांतरित करता येत असल्याने, ५० टक्क्यांहून अधिक भारतीय पारंपरिक बँकिंगपेक्षा ऑनलाइन बँकिंगचा पर्याय अवलंबतात. परंतु, ही ऑनलाइन सुविधा वापरत असताना तुम्ही प्रत्येक क्षणाला सतर्क असणे अत्यावश्यक आहे.**

अनेक जण मी नेहमी अनुभवतो. ही माणसे एका वेगळ्याच मानसिक आघातात जगतात. या आघाताचे कारणदेखील तसेच आहे. बँकांमधील खातेदार वर्गामध्ये बहुतांश लोक नोकरदार वर्गात मोडतात, ज्यांची पूर्ण पगाराची रक्कम गायब होते. काही मंडळींनी आपल्या मुलीच्या लग्नासाठी जमा करून ठेवलेली धनराशीची पुंजी गायब होते, तर काहींनी आपल्या आजाराच्या उपचारांसाठी साठवून ठेवलेले पैसे... आता हे एखाद्या सामान्य माणसाच्या जिवावर बेतण्याइतपतच गंभीर नाही का? बरं यापुढचा प्रकार आणखी भयावह असतो, तो म्हणजे गेलेले पैसे परत मिळवण्याचा. ज्यांचे पैसे जातात, त्यांना बँका चक्क गरागरा फिरवतात. अनेकदा नागरिकांची फसवणूक करून सायबर चोरांनी लुटलेले पैसे आरोपीच्या खात्यात दिसत असतात. मात्र, बँकांकडून खाते तत्काळ 'फ्रीझ' न झाल्यामुळे आरोपी सहजच पैसे काढून मोकळे होतात. बँकांच्या नियमांच्या जंजाळामुळे गुन्हेगारांचे फावते. देशभरातील बँकिंग क्षेत्राचे नियमन करणारी रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया (आरबीआय), यांनी जरी त्यांच्या नियमावलीमध्ये सर्व बँकांना स्पष्टपणे सूचित केले असले की, ग्राहकांना त्रास देऊ नका, ग्राहकांच्या खात्यातील पैसे जाण्याच्या तक्रारी ३ दिवसांमध्ये नोंदवल्या गेल्या असतील तर ग्राहकांचे पैसे परत करा, तरी खूप बँका त्यांचा माजोरी स्वभाव काही सोडत नाही आणि नियमांचे पालन करत नाही. बँकांच्या चुकीमुळे पैसे जातात आणि हे पैसे परत मिळाले नाही की ऑनलाइन बँकिंगवर असलेला जनतेचा विश्वास तुटतो. ज्याचे पैसे जातात, तो प्रत्येक माणूस मग डिजिटल बँकिंगविरुद्ध बोलणारा जणू ब्रँड अँबेसेडरच बनतो.

### काळजी घ्या

ऑनलाइन बँकिंग संदर्भातील सायबर गुन्ह्यांचा छडा लावताना पोलिसांकडे आरोपीचा मोबाइल क्रमांक अथवा त्याने वापरलेल्या संगणक किंवा मोबाइलचा सांकेतिक क्रमांकच काय तो हाताशी असतो. फसवणूक झालेल्यांनी फसवणाऱ्याला पाहिलेले नसते. त्यामुळे गुन्हेगारांना पकडताना पोलिसांना मोठी कसरत करावी लागते. सायबर गुन्ह्यातील एखाद्या आरोपीचा मोबाइल क्रमांक अथवा सांकेतिक क्रमांक यांची माहिती मोबाइल कंपनीकडे मागितल्यास ती मिळण्यास कमीत कमी १५ किंवा त्याहून अधिक दिवस लागतात. माहिती हातात येईपर्यंत मोबाइल बंद केला असल्याने त्याचा ठावठिकाणा मिळवणे अवघड होते. परिणामी, तपास पुढे जात नाही आणि आरोपी निसटतो. हाच प्रकार बँकांबाबतही घडतो. बँकांकडे सीसीटीव्ही फुटेजची मागणी केल्यास तेही वेळेत मिळत नाही. बँक एकच पण खाते दुसऱ्या शाखेत असल्यास बँकांचे अधिकारी विविध ठिकाणी हेलपाटे घालण्यास सांगतात. गुन्हे परराज्यातून घडले असल्यास माहिती मिळवणे आणखी कठीण होते. माहिती देण्यास टाळाटाळ करण्यात सार्वजनिक क्षेत्रातील बड्या बँकांचा क्रमांक सर्वाधिक असल्याचा माझ्या कारकीर्दितील स्वानुभव सांगतो. या अशा परिस्थितीत सामान्यजनांना जागरूक राहणे अत्यंत गरजेचे आहे. त्याच अनुषंगाने मी या लेखामध्ये ऑनलाइन बँकिंगच्या सुरक्षित वापरासाठी अत्यंत व्यावहारिक असे काही उपाय सुचवत आहे, ते पुढीलप्रमाणे:

**तुमच्या अकाऊंटचे नियमित परीक्षण करा** : ही अगदी साधी बाब दिसत असली तरी ऑनलाइन फ्रॉड टाळण्यासाठी आपल्या अकाऊंटचे नियमित निरीक्षण करणे गरजेचे आहे. यासाठी बँक स्टेटमेंट्सचे दरमहा परीक्षण करून त्यात काही संशयास्पद शुल्क, जमा अगर खर्च आढळून आल्यास त्वरित बँकेच्या कर्मचाऱ्यांना कळवून त्यासंबंधी खातरजमा करून घेणे तुमची जबाबदारी आहे.

**ऑनलाइन बँकिंग सुविधा वापरताना सिक्युअर साईट्स / नेटवर्क यांचा वापर करा** : फ्री किंवा पब्लिक वाय-फाय नेटवर्क सहसा एन्क्रिप्टेड नसल्या कारणाने तुमची वैयक्तिक माहिती चोरण्यासाठी हॅकर्सकरिता सहज आणि सोपे स्रोत असतात. यावर उत्तम उपाय म्हणजे तुमची सारी आर्थिक स्वरूपाची कामे, ज्या वेळी तुम्ही तुमच्या घरी सुरक्षित नेटवर्क वापरत असाल, त्या वेळेसाठी राखून ठेवा आणि शक्य असेल त्या ठिकाणी बँकिंगसाठीचे समर्पित असे ब्राउझर वापरण्याचा कल ठेवा. परंतु, अगदीच पर्याय नसेल तर तुमच्या स्मार्टफोनच्या डेटा हॉटस्पॉटचा वापर करून व्यवहार करा. दुसरी महत्त्वाची गोष्ट म्हणजे जेव्हा ऑनलाइन बँकिंग व्यवहार


### भक्कम पासवर्ड बनवा; ते वारंवार बदला




सेफ ऑनलाइन बँकिंग करताना लक्षात घ्यावयाचा सर्वात पहिला आणि महत्त्वाचा नियम म्हणजे तुमच्या ऑनलाइन अकाऊंट निर्मितीच्या वेळेस भक्कम असा पासवर्ड बनवा आणि तो नियमितपणे बदलत राहा. पासवर्ड सेट करत असताना किंवा बनवत असताना नेहमी विविध अक्षरांचा, अंकांचा तसेच चिन्हांचा चातुर्याने वापर करा. जेणेकरून, तुमच्या व्यतिरिक्त इतर कोणालाही तो सहज ओळखणे शक्य नसेल. पासवर्डमध्ये तुमच्या वैयक्तिक माहितीचा, म्हणजेच, वाढदिवसाची तारीख, आवडते ठिकाण, आवडत्या व्यक्तीचे नाव, इत्यादी माहितीचा उल्लेख कटाक्षाने टाळा. कारण, ही माहिती सहज कोणीही मिळवू शकतात.

## बँकिंग नोटिफिकेशनचा वापर करा

आजघडीला जवळपास सर्वच बँका त्यांच्या ग्राहकांना विविध व्यवहारांसाठी मेसेज आणि इ-मेल अलर्ट्सची सुविधा पुरवितात. या नोटिफिकेशन्समध्ये नेमके काय असते, तर समजा, एखादा व्यवहार विशिष्ट मर्यादेपेक्षा जास्त रकमेचा असेल, तर त्याबद्दलची पूर्वसूचना खातेदाराला अ‍ॅलर्टद्वारे दिली जाते. तसेच, तुमच्या अकाऊंटमधील पैसे विशिष्ट मर्यादेपेक्षा कमी किंवा जास्त झाले की, अलर्टद्वारे तुम्हाला सांगितले जाते.




त्यामुळे माझे असे मत आहे की, ही नोटिफिकेशन्सची सुविधा प्रत्येकाने जरूर अवलंबवावी. जेणेकरून, तुमच्या बँकेमध्ये काही जरी हालचाल झाली तरी लगेच तुम्हाला त्याबद्दल जाणकारी मिळेल आणि तुमच्या बँकेत होणारे व्यवहार तुमच्याव्यतिरिक्त दुसऱ्या कोणत्या व्यक्तीने केले नाहीत, याबाबत तुम्ही नेहमी जागरूक राहाल आणि समजा, जर कधी असे काही व्यवहार झाले जे तुम्ही केलेच नाहीत, तर ताबडतोब बँकेला कळवून तुम्हाला ते व्यवहार थांबवता येतील.

करीत असाल, तेव्हा वेबसाईटवरील वेब अ‍ॅड्रेस बारवर कुलपाचे चिन्ह असून एचटीपीपीएस असे संबोधन असल्याची खात्री करा. याचा अर्थ तुमची वेबसाईट १०० टक्के एन्क्रिप्टेड असून तुमचा सर्व डेटा सुरक्षित आहे, असा होतो.

**लॉग-आऊट करायला विसरू नका :** ऑनलाइन बँकिंगचा व्यवहार पूर्ण झाल्यावर सेशन लॉग-आऊट करायला विसरून तुमच्या अकाऊंट डिटेल्स हायजॅक करण्यास किंवा क्रॉस-साईट स्क्रिप्टिंगचा बळी ठरण्यास सायबर गुन्हेगारांना संधी देऊ नका. संगणक असो वा स्मार्टफोन, प्रायव्हेट ब्राऊझर वापरून तुम्ही तुमचे ऑनलाइन सेशन व्यवहाराअंती सुरक्षितपणे लॉग-आऊट करणे अपेक्षित आहे.

**मल्टी-फॅक्टर ऑथेंटिकेशनचा पर्याय :** मल्टी-फॅक्टर ऑथेंटिकेशन पर्यायाचा उपयोग करून आयडेंटिटी थेफ्ट आणि त्यामुळे निर्माण होणाऱ्या इतर अडचणींना तुम्ही शह देऊ शकता. बऱ्याच बँका टू-फॅक्टर ऑथेंटिकेशन पर्याय उपलब्ध करून देतात, ज्यामध्ये लॉग-इन करते वेळी बँक तुम्हाला मेसेज किंवा इ-मेलद्वारे विशिष्ट असा व्हेरिफिकेशन कोड पाठवते, जो बँकेच्या वेबसाईटवर तुमच्या युझरनेम व पासवर्ड सोबत टाकावा लागतो आणि मग तुम्ही तुमच्या अकाऊंटमध्ये प्रवेश करू शकता.

**ई-मेल स्कॅम्सपासून सावध राहा :** कोणतीही बँक तुमच्याकडे तुमची वैयक्तिक माहिती मागण्यासाठी, तुमच्या अकाऊंटसंबंधी माहिती घेण्यासाठी इ-मेल्स अथवा मेसेजेस पाठवत नाही, ही बाब लक्षात ठेवणे गरजेचे आहे. बँकेकडून जरी कोणती शंका उपस्थित झाली, तरी बँकेचे कर्मचारी थेट तुमच्यासोबत संपर्क साधून त्यांना आवश्यक ती माहिती मागून घेतात. फसव्या ई-मेलसचे स्वरूप सांगायचे झाले, तर तुम्ही एखादी गडगंज लॉटरी जिंकलेले आहात, त्याची रक्कम तुमच्या खात्यात जमा करण्यासाठी तुमच्या अकाऊंटबद्दल माहिती मागण्यात येते. किंवा कोण्या एका व्यक्तीला आर्थिक मदतीची नितांत गरज असून त्यासाठी काही पैसे जमा केले जावेत, अशी मागणी करणारेदेखील ई-मेल्स पाठवले जातात. अशा प्रकारच्या ई-मेल्सना कोणतेही उत्तर देऊ नका. त्याबद्दल पुढे काय करता येईल, ते ई-मेल्स खरच विश्वासार्ह आहेत का, अशी शंका जर तुमच्या मनात येत असेल आणि त्याचे निरसन तुम्हांला करावयाचे असेल, तर तुम्ही तुमच्या बँकेच्या कर्मचाऱ्यांशी संपर्क करून त्याबद्दल खात्री करू शकता.



**अँटी-व्हायरस सॉफ्टवेअर वापरा :** तुमची वैयक्तिक माहिती सुरक्षित ठेवण्याचा एक साधा आणि सरळ उपाय म्हणजे तुमच्या स्मार्टफोन तसेच संगणकामध्ये अँटी-व्हायरस सॉफ्टवेअर इन्स्टॉल करा. केवळ इन्स्टॉल करू नका तर ते नियमितपणे अपडेटसुद्धा करा.

**ऑपरेटिंग सिस्टिम अपडेट करत राहा :** सॉफ्टवेअर अपडेट म्हटले की बऱ्याच जणांना कंटाळवाणी बाब वाटते. परंतु, खूप वेळा त्या अपडेटमध्ये आवश्यक असलेल्या सिक्युरिटी संबंधी नियोजन केलेले असते, ज्यामुळे नवनवीन मालवेअर्स नियंत्रित केले जाऊ शकतात. म्हणून, कधीही ऑपरेटिंग सिस्टम संदर्भातील अपडेट नजरेआड करू नका.

**केवळ अधिकृत अ‍ॅप्सचाच वापर करा :** कधी-कधी अजाणतेपणाने ट्रोजन हॉर्स किंवा तत्सम मालवेअर्स तुमच्या सिस्टिममध्ये डाऊनलोड होऊन तुमच्या सिस्टिममधील सर्व माहिती नष्ट करू शकतात. त्यामुळे बँकेने निर्माण केलेले एन्क्रिप्टेड मोबाइल अ‍ॅप वापरणे, केव्हाही सुरक्षित. मात्र, असे अ‍ॅप्ससुद्धा नियमित अपडेट करीत राहा.

तंत्रज्ञान जसजसे विकसित होत चालले आहे, तसतसे त्यासंबंधीचे धोकेही तितक्याच वेगाने वाढत आहेत. अशा परिस्थितीत आपण सर्वांनी दक्ष राहून या तंत्रज्ञानाचा जास्तीत जास्त फायदा करून घेऊन त्यातील धोके कसे टाळता येतील, याबाबतीत जागरूकता ठेवणे काळाची गरज आहे. वर नमूद केल्याप्रमाणे सर्व गोष्टी लक्षात ठेवून आणि अमलात आणून ऑनलाइन बँकिंग, सुरक्षित बँकिंग म्हणून वापरता येईल, याची जबाबदारी प्रत्येक नागरिकाने घेणे अपरिहार्य आहे.

**सायबर कायदा आणि सुरक्षा तज्ज्ञ**

**नागरी सेवेत दाखल होण्यासाठी विविध स्पर्धा परीक्षांची माहिती असणे आवश्यक आहे. परीक्षेतून सुयोग्य उमेदवाराची निवड व्हावी या उद्देशाने भारतीय संविधान अनुच्छेद ३१५ अन्वये महाराष्ट्र लोकसेवा आयोगाची निर्मिती करण्यात आली आहे. राज्यसेवेतील नेमणुकीसाठी परीक्षा घेणे हे आयोगाचे प्रमुख कार्य आहे. यासाठी आयोगामार्फत स्पर्धापरीक्षा आणि सरळसेवा परीक्षा या माध्यमातून विविध पदांच्या परीक्षा घेतल्या जातात.**

# अशा आहेत स्पर्धा परीक्षा

सुनील अवताडे

## सहायक मोटार वाहन निरीक्षक परीक्षा

परिवहन विभागाच्या अखत्यारीतील सहायक मोटार वाहन निरीक्षक, गट-क संवर्गातील पदे शासनाच्या मागणीनुसार व पदांच्या उपलब्धतेनुसार या परीक्षेमधून भरण्यात येतात.

**परीक्षेचे टप्पे- दोन**

**अर्हता :** महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाची माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा (एस.एस.सी) किंवा महाराष्ट्र शासनाने एस.एस.सी च्या समतुल्य म्हणून घोषित केलेली अर्हता, आणि माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा उत्तीर्ण झाल्यानंतर स्वयंचल अभियांत्रिकी (ऑटोमोबाइल इंजिनिअरिंग) किंवा यंत्र अभियांत्रिकी (मेकॅनिकल इंजिनिअरिंग) विषयातील किमान तीन वर्षांची पदविका वा केंद्र वा राज्य शासनाने त्यास समकक्ष म्हणून घोषित केलेली अर्हता.

स्वयंचल अभियांत्रिकी किंवा यंत्र अभियांत्रिकी विषयातील मान्यता प्राप्त विद्यापीठाची पदवी किंवा त्यापेक्षा उच्च अर्हता धारण केलेले किंवा केंद्र किंवा राज्य शासनाने त्यास समकक्ष म्हणून घोषित केलेली अर्हता धारण केलेले उमेदवार देखील पात्र राहतील.

### समतुल्य शैक्षणिक अर्हता

डिप्लोमा इन प्रॉडक्शन टेक्नॉलॉजी, डिप्लोमा इन प्रॉडक्शन इंजिनिअरिंग, डिप्लोमा इन मशिन टूल्स मेन्टेनन्स, डिप्लोमा इन फॅब्रिकेशन टेक्नॉलॉजी, डिप्लोमा इन फॅब्रिकेशन अँड इरेक्शन इंजिनिअरिंग, डिप्लोमा इन प्लॅन्ट इंजिनिअरिंग, डिप्लोमा इन मेटॅलर्जी, बॅचलर डिग्री इन मेकॅनिकल इंजिनिअरिंग, बॅचलर डिग्री इन ऑटोमोबाइल इंजिनिअरिंग, बॅचलर डिग्री इन इंडस्ट्रिअल इंजिनिअरिंग.

**अनुभव :**

- स्वयंचल अभियांत्रिकी किंवा यंत्र अभियांत्रिकीमधील पदविका/ पदवी/उच्च अर्हता अथवा वरीलप्रमाणे समकक्ष अर्हता धारण केल्यानंतर मुख्य परीक्षेकरिता अर्ज सादर करण्याच्या शेवटच्या दिनांकास हलकी मोटार वाहने, जड मालवाहू वाहने व जड प्रवासी वाहने यांची दुरुस्ती व देखभाल करण्याचा पूर्ण वेळ कर्मचारी म्हणून केंद्र अथवा राज्य शासनाच्या विभागामध्ये किंवा अंगीकृत व्यवसायांच्या अखत्यारीतील यंत्रशाळामध्ये घेतलेला अथवा शासन वेळोवेळी निर्देशित करेल अशा संस्थामध्ये घेतलेला किमान एक वर्ष कालावधीचा अनुभव आवश्यक.
- अनुभवाच्या प्रयोजनार्थ प्रशिक्षणार्थी अथवा ॲप्रेंटिस म्हणून वरील ठिकाणी घेतलेला अनुभव गृहीत धरला जाऊ शकेल.
- मुख्य परीक्षेस अर्ज सादर करण्याच्या शेवटच्या दिनांकास वर नमूद केल्याप्रमाणे किमान एक वर्ष कालावधीचा पूर्ण वेळ कर्मचारी म्हणून अनुभव नसेल अशा उमेदवारांनी नियुक्तीनंतर परिवीक्षाधीन कालावधीमध्ये शासनाच्या विभागात अथवा अंगीकृत व्यवसायामध्ये अथवा शासन वेळोवेळी निर्देशित करेल अशा संस्थामध्ये किमान एक वर्ष कालावधीचा अनुभव घेणे बंधनकारक राहील.
- मुख्य परीक्षेकरिता अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांकास गिअर्स असलेली मोटारसायकल, हलके मोटार वाहन आणि परिवहन वाहन (जड मालवाहू आणि जड प्रवासी वाहन) या संवर्गातील वाहन चालविण्यासाठी सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेली वैध अनुज्ञप्ती परवाना आवश्यक.
- अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांकास वर नमूद वाहनांपैकी जड माल वाहतूक वाहन किंवा जड प्रवासी वाहतूक वाहन यापैकी एखादे किंवा वाहने चालवण्याचा अनुज्ञप्ती परवाना नसेल तर अशा उमेदवारास अशी अनुज्ञप्ती, नियुक्तीनंतरच्या दोन वर्षाच्या परिवीक्षा कालावधीमध्ये प्राप्त करणे बंधनकारक असेल.
- वाहन चालवण्याच्या अनुज्ञप्तीचे वेळोवेळी नूतनीकरण केले पाहिजे.

**शारीरिक अर्हता :**

**पुरुष**

- उंची - किमान १६३ सें. मी. (अनवाणी)
- छाती - किमान ७९ सें.मी. (प्रसरणाशिवाय) व किमान ५ सें.मी

(प्रसरण)

**महिला**

- उंची - किमान १५५ सें.मी. (अनवाणी)
- वजन- किमान ४५ कि.ग्रॅ.

## महाराष्ट्र गट-क सेवा परीक्षा

राज्य शासनाच्या सेवेतील दुय्यम निरीक्षक राज्य उत्पादन शुल्क, कर सहायक व लिपिक-टंकलेखक या तिन्ही पदावरील भरतीकरिता एकच संयुक्त पूर्व परीक्षा घेण्यात येते. या परीक्षेच्या स्वतंत्र मुख्य परीक्षा घेण्यात येते. तिन्ही पदांकरिता मुख्य परीक्षेचा पेपर क्रमांक एक सामाईक असेल व या पेपरची परीक्षा एकाच दिवशी एकत्र घेण्यात येईल. मुख्य परीक्षेचा पेपर क्रमांक दोन मात्र, संबंधित पदांच्या कर्तव्ये व जबाबदाऱ्या विचारात घेऊन स्वतंत्रपणे घेण्यात येईल. संबंधित पदाच्या परीक्षा योजना व अभ्यासक्रमाच्या आधारे उमेदवारांची मुख्य परीक्षा घेण्यात येते.

**शैक्षणिक अर्हता** : मान्यताप्राप्त विद्यापीठाची पदवी किंवा महाराष्ट्र

**लिपिक-टंकलेखक**

**मराठी -** मराठी टंकलेखनाचा वेग किमान ३० शब्द प्रतिमिनिट. या अर्हतेची शासकीय वाणिज्य प्रमाणपत्र परीक्षा अथवा या उद्देशासाठी शासनाने समकक्ष म्हणून घोषित केलेली प्रमाणपत्र परीक्षा उत्तीर्ण. **इंग्रजी -** इंग्रजी टंकलेखनाचा वेग किमान ४० शब्द प्रतिमिनिट. या अर्हतेचे शासकीय वाणिज्य प्रमाणपत्र परीक्षा अथवा या उद्देशासाठी शासनाने समकक्ष म्हणून घोषित केलेली प्रमाणपत्र परीक्षा उत्तीर्ण.

## महाराष्ट्र कृषी सेवा परीक्षा

राज्य शासनाच्या कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्सव्यवसाय विभागाच्या अखत्यारीतील महाराष्ट्र कृषी सेवेतील खालील पदे शासनाच्या मागणीनुसार व पदांच्या उपलब्धतेनुसार या परीक्षेमधून भरण्यात येतात.

(१) महाराष्ट्र कृषी सेवा गट-अ :-कृषि उपसंचालक, कृषी अधिकारी

(२) महाराष्ट्र कृषी सेवा गट-ब :- तालुका कृषी अधिकारी, कृषी अधिकारी, कृषी अधिकारी (कनिष्ठ)



**परीक्षेचे टप्पे** :तीन टप्पे, पूर्व परीक्षा - २०० गुण. मुख्य परीक्षा - ४०० गुण. मुलाखत-५० गुण

**शैक्षणिक अर्हता** : मान्यताप्राप्त संस्थेकडून कृषी किंवा अभियांत्रिकी अथवा उद्यानविद्या या विषयातील पदवी किंवा त्याच विद्याशाखेतील अन्य कोणतीही समतुल्य अर्हता.

प्रस्तुत भरतीकरिता खालील शैक्षणिक अर्हता शासनाने बी. एसस्सी (कृषी) बी. टेक (कृषी अभियांत्रिकी) व तत्सम पदव्यांशी समतुल्य म्हणून मान्य केल्या आहेत : बी. एसस्सी (कृषी जैव तंत्रज्ञान), बी.एसस्सी (कृषी व्यवसाय व्यवस्थापन), बी.एसस्सी (गृह विज्ञान), बी. टेक (अन्नतंत्र), बी. एफ एसस्सी, बी.एसस्सी (उद्यानविद्या), मराठी भाषेचे ज्ञान आवश्यक.

जाहिरातीस अनुसरून, अर्ज करणाऱ्या उमेदवारांकडून ते यांपैकी एक, दोन किंवा तिन्ही पदांसाठी बसू इच्छितात काय, याबाबत विकल्प (ऑप्शन) घेण्यात येईल. संबंधित पदाकरिता उमेदवाराने दिलेला/ले विकल्प हा/हे संबंधित पद भरतीकरिता अर्ज समजण्यात येतो. संयुक्त पूर्व परीक्षेस अर्ज करताना दिलेला विकल्प तसेच, भरावयाच्या पदसंख्येच्या आधारे, संबंधित पदाच्या मुख्य परीक्षेसाठी पात्र करावयाच्या उमेदवारांची संख्या निश्चित करून, सामाईक पूर्वपरीक्षेच्या आधारे तिन्ही पदांकरिता स्वतंत्र निकाल जाहीर करण्यात येतो. संयुक्त पूर्व परीक्षेच्या निकालाच्या आधारे संबंधित पदाकरिता घेण्यात येणाऱ्या मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र ठरणाऱ्या उमेदवारांची शासनाने विहित केलेली समतुल्य अर्हता. दुय्यम निरीक्षक पदासाठी विकल्प नमूद करणाऱ्या उमेदवारांकडे उपरोक्त शैक्षणिक अर्हतेसोबत खालीलप्रमाणे किमान शारीरिक अर्हता असणे आवश्यक आहे :-

**पुरुष** ● उंची - किमान १६५ सें. मी. (अनवाणी) ● छाती - किमान ७९ सें.मी. आणि फुगवून त्यापेक्षा ५ सें.मी. जास्त. **महिला** ● उंची - किमान १५५ सें.मी. (अनवाणी) ● वजन- किमान ५० कि.ग्रॅ.**कर सहायक**-मराठी टंकलेखनाचा वेग किमान ३० शब्द प्रतिमिनिट आणि इंग्रजी टंकलेखनाचा वेग किमान ४० शब्द प्रतिमिनिट या अर्हतेची शासकीय वाणिज्य प्रमाणपत्र परीक्षा उत्तीर्ण.

**संगणक टंकलेखन अर्हता -** बेसिक कोर्स इन कॉम्प्युटर टायपिंग मराठी ३० शब्द प्रतिमिनिट अथवा बेसिक कोर्स इन कॉम्प्युटर टायपिंग इंग्रजी ४० शब्द प्रतिमिनिट (लागू असेल त्यापेक्षा) समकक्ष अर्हता म्हणून स्वीकारार्ह आहे.

शासकीय वाणिज्य परीक्षा मंडळाची उपरोक्त टंकलेखक अर्हता मुख्य परीक्षेकरिता अर्ज/माहिती सादर करण्याच्या अंतिम दिनांकापर्यंत प्राप्त करणे आवश्यक आहे.

**टंकलेखन अर्हता धारण करण्यातून तात्पुरती सूट (केवळ लिपिक-टंकलेखक पदाकरिता)**

दिव्यांग उमेदवाराने विहित टंकलेखन अर्हतेचे प्रमाणपत्र धारण केले नसेल तर टंकलेखनाची परीक्षा उत्तीर्ण होण्यासाठी त्याच्या नियुक्तीच्या दिनांकापासून २

वर्षांचा कालावधी व २ संधी देण्यात येतील.

माजी सैनिक वर्गातून अर्ज करण्यास पात्र असलेल्या उमेदवारांनी विहित टंकलेखन अर्हता धारण केली नसेल अशा उमेदवारास, ही अर्हता त्याच्या नियुक्तीच्या दिनांकापासून अकरा महिन्याच्या कालमर्यादेत प्राप्त करील या अटीवर या पदासाठीच्या स्पर्धा परीक्षेकरिता अर्ज करण्यास तात्पुरती परवानगी दिली जाईल.

लिपिक-टंकलेखक (इंग्रजी) पदावर नियुक्त होणाऱ्या उमेदवारांना एतदर्थ मंडळाची प्रतिमिनिट ३० शब्दगतीची मराठी टंकलेखनाची परीक्षा शासन सेवेत प्रविष्ट झाल्याच्या दिनांकापासून ४ वर्षांच्या आत उत्तीर्ण होणे आवश्यक आहे. ज्या इंग्रजी लिपिक-टंकलेखकांनी मूळ नियुक्तीच्या वेळी यथास्थिती, शासकीय सेवेत रुजू झाल्याच्या दिनांकापासून ४ वर्षांच्या कालावधीत मराठी टंकलेखनाचे ३० शब्द प्रतिमिनिट गतीचे अथवा अधिक गतीचे शासकीय वाणिज्य प्रमाणपत्र धारण केले असेल, अशा इंग्रजी लिपिक-टंकलेखकांना एतदर्थ मंडळाची ३० शब्द प्रतिमिनिट गतीची मराठी टंकलेखनाची परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून सूट देण्यात येईल.

## महाराष्ट्र अभियांत्रिकी सेवा परीक्षा

जलसंपदा विभाग, सार्वजनिक बांधकाम विभाग, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग, मृद् व जलसंधारण विभाग या विभागांमध्ये खालील संवर्गातील पदे शासनाच्या मागणीनुसार व पदांच्या उपलब्धतेनुसार या परीक्षेमधून भरण्यात येतात.

**गट-अ:** सहायक कार्यकारी अभियंता स्थापत्य, सहायक अभियंता स्थापत्य,

**गट-ब:** सहायक अभियंता (स्थापत्य), उपविभागीय जलसंधारण अधिकारी (स्थापत्य), जलसंधारण अधिकारी (स्थापत्य), सहायक अभियंता (यांत्रिकी), सहायक अभियंता (विद्युत), सहायक अभियंता (विद्युत व यांत्रिकी)

**परीक्षा टप्पे :** ● संयुक्त पूर्वपरीक्षा ● प्रत्येक संवर्गाची स्वतंत्र मुख्य परीक्षा ● प्रत्येक संवर्गाची स्वतंत्र मुलाखत

स्थापत्य अभियांत्रिकी, यांत्रिकी

## महाराष्ट्र वन सेवा परीक्षा

राज्य शासनाच्या वनसेवेतील सहायक वनसंरक्षक, गट-अ तसेच वनक्षेत्रपाल, गट-ब संवर्गातील भरतीकरिता एकत्रित भरती प्रक्रिया राबविण्यात येते.

**परीक्षेचे टप्पे** :तीन टप्पे- (१) पूर्व परीक्षा-१०० गुण (२) मुख्य परीक्षा-४०० गुण (३) मुलाखत-५० गुण

### सहायक वनसंरक्षक पदाकरिता:

(अ) खालील विषयांपैकी किमान एका विषयाची मान्यताप्राप्त विद्यापिठाची पदवी : वनस्पतिशास्त्र, रसायनशास्त्र, वनशास्त्र, भूशास्त्र, गणित, भौतिकशास्त्र, सांख्यिकी, प्राणिशास्त्र, उद्यानविद्या, पशुसंवर्धन व पशुवैद्यकशास्त्र किंवा (ब) कृषी, अभियांत्रिकी यातील स्नातक पदवीधर

### वनक्षेत्रपाल पदाकरिता:

(अ) वनस्पतीशास्त्र, रसायनशास्त्र, वनशास्त्र, भूशास्त्र, गणित, भौतिकशास्त्र, सांख्यिकी, प्राणिशास्त्र, उद्यानविद्या शास्त्र, कृषिशास्त्र, कृषी अभियांत्रिकी,रसायन अभियांत्रिकी, स्थापत्य अभियांत्रिकी, संगणक अभियांत्रिकी, विद्युत अभियांत्रिकी, इलेक्ट्रॉनिक्स अभियांत्रिकी, यंत्र अभियांत्रिकी, संगणक ॲप्लिकेशन, संगणक विज्ञान, पर्यावरणीय विज्ञान, पशुवैद्यकीय विज्ञान यांपैकी कोणत्याही विषयातील सांविधिक विद्यापीठाची विज्ञान शाखेची पदवी किंवा

(ब) विज्ञान शाखेव्यतिरिक्त इतर शाखेतील गणित विषयासह पदवीधारक.

(क) विज्ञान शाखेव्यतिरिक्त इतर शाखेतील गणित विषयासह पदवीधारक उमेदवाराने विज्ञान शाखेतील उच्च माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक आहे.

**शारीरिक अर्हता :-**

**अनुसूचित जमातीव्यतिरिक्त अन्य उमेदवार -**

**पुरुष:** उंची -१६३ सें.मी. पेक्षा कमी नसावी छाती- ● न फुगवता ७९ सें.मी.पेक्षा कमी नसावी, ● न फुगवलेली छाती व फुगवलेली छाती यातील फरक ५ सें.मी. पेक्षा कमी नसावा.

**महिला:** उंची -१५० सें.मी.पेक्षा कमी नसावी.



**अनुसूचित जमाती प्रवर्गातील उमेदवार (पात्रता) -:**

**पुरुष:** उंची -१५२.५ सें.मी. पेक्षा कमी नसावी. छाती- ● न फुगवता ७९ सें.मी.पेक्षा कमी नसावी ● न फुगवलेली छाती व फुगवलेली छाती यातील फरक ५ सें.मी. पेक्षा कमी नसावा. **महिला:** उंची-१४५ सें.मी.पेक्षा कमी नसावी.

सुधारणेनंतर (आफ्टर करेक्शन) + ४.०० डी सह प्रत्येक डोळ्याची दृष्टीक्षणता (व्हिज्युअल ॲक्विटी ) ६/६ असावी. बाह्य डोळ्यावर कोणतेही रोग संक्रमण झालेले नसावे किंवा तिरळेपणा नसावा.

सहायक वनसंरक्षक, गट-अ पदाकरिता पुरुष व महिला उमेदवारामध्ये अनुक्रमे २५ कि.मी. व १४ कि.मी. अंतर ४ तासात चालून पूर्ण करण्याची शारीरिक क्षमता असणे आवश्यक आहे. वनक्षेत्रपाल, गट-ब पदाकरिता पुरुष व महिला उमेदवारामध्ये अनुक्रमे २५ कि.मी. व १६ कि.मी. अंतर ४ तासात चालून पूर्ण करण्याची शारीरिक क्षमता असणे आवश्यक आहे.

अभियांत्रिकी, विद्युत अभियांत्रिकी, तसेच विद्युत व यांत्रिकी अभियांत्रिकी, संवर्गातील पदांवरील भरतीकरिता एकच संयुक्त पूर्व परीक्षा घेण्यात येते.

**शैक्षणिक अर्हता :**

### महाराष्ट्र स्थापत्य अभियांत्रिकी सेवा, गट-अ व गट-ब

- मान्यताप्राप्त विद्यापीठाची स्थापत्य अभियांत्रिकीमधील पदवी किंवा महाराष्ट्र शासनाने या पदवीस समतूल्य म्हणून मान्य केलेली अर्हता.



- बी.ई (सिव्हिल ॲण्ड वॉटर मॅनेजमेंट किंवा सिव्हिल ॲण्ड एन्व्हॉयरमेंट किंवा स्ट्रक्चरल किंवा कंस्ट्रक्शन इंजिनिअरिंग/टेक्नॉलॉजी) या अर्हता पदवी अभ्यासक्रमाशी समतुल्य आहेत.

### महाराष्ट्र यांत्रिकी अभियांत्रिकी सेवा, गट-ब

मान्यताप्राप्त विद्यापीठाची यंत्र अभियांत्रिकीमधील पदवी.

### महाराष्ट्र विद्युत अभियांत्रिकी सेवा, गट-ब

- मान्यताप्राप्त विद्यापीठाची विद्युत अभियांत्रिकीमधील पदवी किंवा महाराष्ट्र शासनाने या पदवीस समतूल्य मान्य केलेली अर्हता.
- बी.ई (इलेक्ट्रिकल ॲण्ड पॉवर किंवा इलेक्ट्रॉनिक्स ॲण्ड पॉवर किंवा पॉवर सिस्टिम किंवा इलेक्ट्रिकल ॲण्ड इलेक्ट्रॉनिक्स) या अर्हता पदवी अभ्यासक्रमाशी समतुल्य आहेत.

### महाराष्ट्र विद्युत/यांत्रिकी अभियांत्रिकी सेवा, गट-ब

मान्यताप्राप्त विद्यापीठाची विद्युत अभियांत्रिकीमधील किंवा विद्युत व यांत्रिकी अभियांत्रिकीमधील पदवी.

**अर्हतेतून सूट :** ● दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर व न्याय दंडाधिकारी, प्रथम वर्ग परीक्षा वगळता वरील सर्व स्पर्धा परीक्षेकरिता पदवीच्या शेवटच्या वर्षाच्या परीक्षेस बसलेले उमेदवार पूर्वपरीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र असतील. परंतु मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी विहित पद्धतीने आवश्यक माहिती व परीक्षा शुल्क सादर करण्याच्या अंतिम दिनांकापर्यंत पदवी परीक्षा उत्तीर्ण होणे अनिवार्य राहील. ● आंतरवासिता किंवा कार्यशाळेतील प्रत्यक्ष कामाचा अनुभव आवश्यक असेल अशा पदवी धारकाने शैक्षणिक अर्हतेबाबतची अट मुख्य परीक्षेची माहिती/अर्ज स्वीकारण्याच्या विहित दिनांकापर्यंत पूर्ण केली पाहिजे.

सर्व पदांकरिता मराठी भाषेचे ज्ञान आवश्यक. पूर्वपरीक्षेचे गुण अंतिम निवडीच्या वेळी विचारात घेतले जाणार नाहीत.

तसेच, पूर्वपरीक्षेचे गुण उमेदवारांना कळवले जाणार नाहीत. मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी उमेदवारांची संख्या विहित मर्यादेत सीमित करण्यासाठी पूर्वपरीक्षा घेण्यात येते. पूर्वपरीक्षेसाठी आयोगाने विहित केलेल्या किमान सीमारेषा किंवा त्यापेक्षा जास्त गुण मिळवणाऱ्या या उमेदवारास मुख्य परीक्षेसाठी पात्र समजण्यात येते. संबंधित परीक्षा व अभ्यासक्रमाच्या आधारे उमेदवारांची मुख्य परीक्षा घेण्यात येते.

प्रत्येक परीक्षेची अर्हता, अभ्यासक्रम, निवड प्रक्रिया इत्यादी विषयक सविस्तर तपशील आयोगाच्या www.mpsc.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. आयोगाकडून वेळोवेळी करण्यात येणारे बदल, आयोगाच्या या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येतात. पुढील वर्षीच्या स्पर्धा परीक्षांचे अंदाजित वेळापत्रक आयोगाच्या संकेतस्थळावर साधारणपणे नोव्हेंबर/डिसेंबर महिन्यामध्ये प्रसिद्ध करण्यात येते. तसेच वेळापत्रकाची सद्य:स्थिती प्रत्येक महिन्याला अद्ययावत करण्यात येते.

उपसचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग

**सरळसेवा भरतीच्या माध्यमातून राज्य शासनाच्या सेवेत दाखल होता येते. तृतीय व चतुर्थ श्रेणीतील कर्मचाऱ्यांची भरती मोठ्या प्रमाणावर सरळसेवेने होते. वर्ग एक व वर्ग दोनचीदेखील काही पदे सरळसेवेने भरली जातात. ही पदे सरळसेवेने भरली जात असली तरी त्यासाठी परीक्षा व आवश्यकता भासल्यास मुलाखती घेतल्या जातात. या परीक्षेची तयारी, तिचे स्वरूप, अभ्यासक्रम याबाबत जाणून घेऊ या..**


# सरळसेवेची तयारी

**सोमनाथ दारवंडे**

यूपीएससी व एमपीएससीच्या परीक्षांप्रमाणेच सरळसेवा पदभरतीत मोठी स्पर्धा निर्माण झाली आहे. त्यामुळे या परीक्षेचे स्वरूप समजून घेऊन अभ्यास करणे महत्त्वाचे ठरते. सरळसेवेंतर्गत महसूल, कृषी, आरोग्य, जलसंपदा, वने, गृह आदी विभाग तसेच जिल्हा परिषदांच्या विविध पदांसाठी जाहिरात दिली जाते.

**या पदांसाठीची पात्रता** : या सर्व पदांसाठी मान्यताप्राप्त विद्यापीठाची पदवी परीक्षा उत्तीण असणे आवश्यक आहे. तर लिपिक -टंकलेखक पदासाठी मराठी ३० व इंग्रजी ३०, ४० शब्द प्रतिमिनीट टंकलेखन अभ्यासक्रम उत्तीर्ण होणे आवश्यक आहे.

**वयोमर्यादा** : १८ ते ३५ वर्षे, मागासवर्गीयांसाठी ५ वर्षे शिथिल



## परीक्षेचे स्वरूप

या परीक्षांमध्ये १०० प्रश्नांचा पेपर असतो. त्यासाठी काही जिल्ह्यांमध्ये १०० गुण असतात तर काही जिल्ह्यांमध्ये १०० प्रश्नांसाठी २०० गुण असतात.

**स्वरूप** : इंग्रजी व्याकरण २५ प्रश्न, मराठी व्याकरण, २५ प्रश्न, अंकगणित व बुद्धिमत्ता, २५ प्रश्न तर सामान्यज्ञान व चालू घडामोडींसाठी २५ प्रश्न असतात.

## परीक्षेचा अभ्यासक्रम

**इंग्रजी (२५ प्रश्न)** : शब्दाच्या जाती (पार्ट्स ऑफ स्पीच), सर्वनाम (प्रोनाउन), विशेषण (ॲडजेक्टिव्ह), उपपदे (आर्टिकल्स), क्रियापद (व्हर्ब), क्रियाविशेषण (ॲडव्हर्ब), शब्दयोगी अव्यय (प्रिपोझिशन), केवलप्रयोगी आणि उभयान्वयी अव्यय (कंजक्शन ॲण्ड इंटरजेक्शन), काळ (टेन्स), कर्मनी आणि कर्तरी प्रयोग (ॲक्टीव्ह ॲण्ड पॅसिव्ह व्हॉईस), सहाय्यकारी क्रियापद (मोडल ऑग्झिलरी), प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष कथन (डायरेक्ट ॲण्ड इंन्डायरेक्ट स्पीच), उपवाक्य (क्लॉज), काळाचे प्रकार, समानार्थी व विरुद्धार्थी शब्द, शब्दसमुहाबद्दल एक शब्द (वन वर्ड फॉर ग्रुप), म्हणी व वाक्प्रचार (एडियम्स ॲण्ड फ्रेजेस).

**मराठी व्याकरण व शब्दसंग्रह (२५ प्रश्न)** : वर्णमाला व त्याचे प्रकार, नाम, सर्वनाम, विशेषण, क्रियापद, क्रियाविशेषण अव्यय, शब्दयोगी अव्यय, उभयान्वयी अव्यय, केवलप्रयोगी अव्यय, संधी, शब्दसिद्धी व त्याचे प्रकार, समास व त्याचे प्रकार, काळ व त्याचे प्रकार, प्रयोग व त्याचे प्रकार, विभक्ती, वाक्यपृथक्करण व त्याचे प्रकार, विरामचिन्हे, समूहदर्शक शब्द, ध्वनिदर्शक शब्द, समानार्थी शब्द, विरुद्धार्थी शब्द, म्हणी व त्याचे अर्थ आदी.

**अंकगणित व बुद्धिमता (२५ प्रश्न्न)** : अंकगणित : प्राथमिक क्रिया, कंचेभागुबेव, वर्ग, वर्गमूळ, घन, घनमुळे, अपूर्णांक, लसावी-मसावी, सरासरी, शेकडेवारी, गुणोत्तर प्रमाण, सरळव्याज, चक्रव्याज, नफा-तोटा, काळ-काम, वेग, भूमिती इ. बुद्धिमत्ता चाचणी : संख्यामालिका, अक्षरमालिका, समान संबध, विसंगत घटक, चुकीचे पद ओळखा, लयबद्ध मालिका, सांकेतिक भाषा, आकृत्यांची संख्या मोजणे, वयवारी, दिशा, दिनदर्शिका, घड्याळ, नातेसंबध, व्हेन आकृत्या, तर्क व अनुमान, कुट प्रश्न.

**सामान्य ज्ञान (२५ प्रश्न)** : महाराष्ट्राचा व भारताचा भूगोल, आधुनिक भारताचा इतिहास, भारताची राज्यघटना व ग्रामप्रशासन, महाराष्ट्रातील समाजसुधारक, सामान्यविज्ञान व चालू घडामोडी.

## प्रश्नांचे स्वरूप

या अभ्यासक्रमाशिवाय विद्यार्थ्यांनी प्रश्नांचे स्वरूप समजून घेणे आवश्यक ठरते. त्यासाठी सरळसेवेच्या मागील परीक्षांच्या प्रश्नपत्रिका सोडवण्याचा सराव करावा. यामुळे परीक्षेचे स्वरूप लक्षात येते. शिवाय परीक्षा देण्यासाठी तयारीदेखील होत जाते. नेमकेपणाने अभ्यास कसा करावा याचा ताळेबंद बांधता येतो. आपल्याकडील वाचन साहित्यापैकी काय वाचायला पाहिजे आणि काय वाचण्याची आवश्यकता नाही याची अंदाज विविध प्रश्नपत्रिका सोडवल्यानंतर येतो. या परीक्षांसाठी शिकवणी वर्ग लावले पाहिजेत असे नाही. आवश्यक मार्गदर्शन घेऊन अभ्यासक्रमानुसार तयारी केली तर ग्रामीण भागात राहून अभ्यास करणाऱ्या उमेदवाराला या परीक्षेत यश मिळवणे सहज सोपे होते.

**वडील चांगल्या पगाराची नोकरी सोडून आदिवासी मुलांना शिकवण्याचा वसा घेतात, यातूनच मुलाच्या सामाजिक जाणिवा घट्ट होतात, त्यावर सामाजिक जबाबदारीचे संस्कार होतात आणि उदरनिर्वाहासोबतच आपल्याला समाजाचेही हित साधता आले पाहिजे ही खूणगाठ मनाशी बांधली जाते. त्यामुळे १०वी पर्यंत आश्रम शाळेत शिकून पुढे तंत्रज्ञान विषयात पदवी मिळवल्यानंतर गलेलठ्ठ पगाराची संधी समोर असतानाही वडिलांचा वसा पुढे सुरू ठेवण्यासाठी, चार लोकांच्या जीवनात बदल घडवून आणण्यासाठी हा युवक मार्ग निवडतो यूपीएससीचा, प्रशासनात दाखल होण्याचा. प्रेरणेला चांगल्या उद्देशाची आणि प्रयत्नांची जोड मिळते आणि हा युवक २०१८ च्या परीक्षेत ३९ व्या गुणांकसह उत्तीर्ण होतो. पालघरमधील आदिवासी भागातील शिल्लोत्तर या छोट्याशा गावातील हेमंत केशव पाटील यांची ही प्रेरणादायी कहाणी. उमेदवारांना मार्गदर्शन व त्यांचा यशापर्यंतचा प्रवास याबाबत साधलेला संवाद त्यांच्याच शब्दात...**

# चांगला उद्देश आणि प्रयत्नांची जोड

यूपीएससीची तयारी करताना प्रेरणा हा घटक खूप महत्त्वपूर्ण ठरतो. मग ती इतरांकडून मिळालेली असेल अथवा स्वयंप्रेरणा असेल. माझे बाबा कल्याण-भिवंडी येथे चांगल्या पगाराची संधी असताना आदिवासी भागातील मुलांना चांगले शिक्षण मिळावे या उद्देशाने पालघरमधील शिलोत्तर गावी आले. येथे आश्रम शाळेत मुलांना शिकवू लागले. त्यांचा हा आदर्श त्यांच्या डोळ्यासमोर सदैव होता. माझे प्राथमिक शिक्षणही येथेच झाले.

## टर्निंग पॉइंट

लोणेरे (जि. रायगड) येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर टेक्नॉलॉजीकल युनिव्हर्सिटीमधून बी.टेक (केमिकल)ची मी पदवी मिळवली. गुजरातमधील अंकलेश्र्वर येथे अभियंता म्हणून काही दिवस नोकरी केली. परंतु मन रमले नाही. आपल्या शिक्षणाचा उपयोग केवळ आपल्यापुरताच मर्यादित राहत असल्याची जाणीव झाली. आपल्या हातूनही वडिलांप्रमाणेच सामान्य नागरिकांच्या, गरीब व वंचितांच्या जीवनात बदल घडावा अशी सुप्त इच्छा मनात सदैव घर करून होती. तीच स्पर्धा परीक्षेच्या मार्गावर घेऊन आली. मोठा भाऊ आयआयटी खरगपूर येथून एमटेक झाला आहे. सध्या तो पुण्यात असतो. मात्र त्याने किंवा वडिलांनी माझ्या या निर्णयाला विरोध न करता प्रोत्साहन दिले. मात्र हा निर्णय



**हेमंत केशव पाटील**

आएएस, रँक ३९, वर्ष २०१८

कसा योग्य आहे ते सिद्ध करण्याची जबाबदारी आता माझी होती.

## तयारी व यश

अंकलेश्वर येथील नोकरी सोडल्यानंतर पूर्णवेळ यूपीएससीची तयारी करण्याचा निर्णय घेतला. काही वर्गमित्र पुण्यात स्पर्धा परीक्षेची तयारी करत होते. सुरुवातीला त्यांचे मार्गदर्शन मोलाचे ठरले. काही दिवस क्लासेस करून स्वतः अभ्यास करण्यावर भर दिला. पहिले दोन प्रयत्न अयशस्वी गेले असले तरी त्यातून आपण बरेच काही शिकलो. गेल्या दोन प्रयत्नांमध्ये आपण कोठे कमी पडलो याचे चिंतन करून तयारी केली. तिसऱ्या प्रयत्नात पूर्व, मुख्य व मुलाखतीत यश मिळाले आणि भारतीय राजस्व सेवेसाठी निवड झाली. मात्र प्रशासकीय सेवेत येण्याचा निर्धार पक्का होता. पुन्हा आयएएससाठी तयारी सुरू ठेवली. दरम्यान प्रशिक्षणार्थी सहायक आयुक्त, आयकर म्हणून नियुक्ती झाली. नॅशनल अकॅडमी ऑफ डायरेक्ट टॅक्सेस येथे प्रशिक्षण पूर्ण करण्यापूर्वीच चौथ्या प्रयत्नात यशाला गवसणी घालता आली. यूपीएससीच्या २०१८ च्या परीक्षेत देशात ३९ व्या क्रमांकाने उत्तीर्ण होऊन आयएएस होत प्रशासनात येण्याचे स्वप्न पूर्ण करण्यात यश आले. हैदराबाचे आयपीएस महेश भागवत सरांचे मार्गदर्शनही मोलाचे ठरले. त्यांनी मराठी व होतकरूंचा एक स्वतंत्र गट तयार केला होता. त्यांच्याकडे त्यांनी वैयक्तीकरीत्या लक्ष दिले.

प्रशासनात खूप चांगले अधिकारी असतात. त्यांची इच्छाशक्तीदेखील खूप असते. मात्र काही वेळा पुढाकार घेणे, प्रभावी लीडरशिपची कमतरता भासते. ती भरून काढण्याची इच्छा श्री. पाटील यांनी बोलून दाखवली. आपल्यातील नेतृत्वगुणाची चुणूक दाखवून प्रशासनात गरीब, सामान्य नागरिकांसाठी चांगली कामगिरी करण्याचे त्यांचे ध्येय आहे.

## अभ्यास

या परीक्षेची तयारी करण्यासाठी जास्तीत जास्त अभ्यास करणे क्रमप्राप्त ठरते. मात्र तो किती करायचा, कसा

करायचा, अभ्यासाच्या कुठल्या क्लुप्त्या वा पद्धती वापरायच्या हे व्यक्तिपरत्वे ठरते. मात्र अभ्यासाचे नियोजन करणे आवश्यक ठरते. अभ्यासाचे टप्पे ठरवावे, आपली किती तयारी बाकी आहे, कुठला अभ्यासक्रम अधिक वाचणे गरजेचे आहे त्यानुसार लाँगटर्म व शॉर्टटर्म टार्गेट ठेवून अभ्यास करायला हवा.

पहिल्या दोन प्रयत्नांमध्ये माझा ऑप्शनल विषय भूगोल होता. मात्र हा विषय रटाळ वाटल्याने मानववंशशास्त्र या विषयाची निवड केली. आदिवासी भागातून आलेलो असल्याने आणि इतर बोलीभाषेची जाण असणाऱ्या मित्रांच्या सहवासामुळे या विषयाची तयारी करणे काही अंशी सोपे गेले. त्यामुळे पुन्हा एकदा नमूद करावेसे वाटते की, या परीक्षेची तयारी ही व्यक्तिपरत्वे बदलू शकते. वर्तमानपत्रांचे नियमित वाचन हा एक सामान्य घटक आहे. आपले मत घडवण्यात आणि विविध घटनांचे विश्लेषण करण्याची क्षमता नियमित वृत्तपत्र वाचनातून अधिक विकसित होते.

### अडचणी आव्हान म्हणून स्वीकारा

प्रत्येकाच्या आयुष्यात संघर्ष असतो. त्याचा प्रकार वेगळा असू शकतो. आर्थिक, सामाजिक, भावनिक, वैयक्तिक अनेक कारणांमुळे आपल्याला संघर्ष करावा लागू शकतो. अगदी या परीक्षेतील यशापुरते बोलायचे झाले तरी दोन तीन प्रयत्नांनंतर आपले मित्र, नातेवाईक प्रश्न करून लागतात आणखी किती दिवस...? अशा वेळी आपल्याला नैराश्य येता कामा नये. किंबहुना या सर्व बाबींचा विचार करून, मनाची तयारी ठेवून या परीक्षेची तयारी करायला हवी. अडचणींमुळे खचून न जाता आपण त्या अडचणी आव्हान म्हणून स्वीकारायला हव्यात.

### मुलाखत

मुलाखत ही प्रक्रिया अगदी सहज सोपी असते. आपण आपल्या बायोडाटामध्ये जे काही नमूद करतो, त्याच आधारवर आपली मुलाखत घेतली जाते. त्यामुळे स्वत:चे विश्लेषण करता यायला हवे. पॅनेलने विचारलेल्या प्रश्नांच्या उत्तरांमध्ये कृत्रिमपणा दिसायला नको. सहज, सोपे आणि प्रामाणिक उत्तर अधिक प्रभावी ठरते. मुलाखतीच्या माझ्या पहिल्या प्रयत्नात आपल्याकडून काहीशी कृत्रिम उत्तरे दिली गेल्याची मला जाणीव झाली. दुसऱ्या वेळेस मात्र मी अगदी सामान्य स्थितीत राहून सहज उत्तरे दिली. दुसरे असे की मुलाखत इंग्रजीमध्येच दिली. कारण यामुळे सरळ संवाद साधता येतो. पॅनल आणि आपल्यात अनुवादक आल्यास डायरेक्ट कम्युनिकेशन होत नाही. आपल्या उत्तरात जो भाव, प्रभाव आहे तो अनुवादकाने अनुवादित केलेल्या उत्तरात असेलच असे नाही. त्यामुळे ज्यांना इंग्रजी थोडफार जमतं त्यांनी डायरेक्ट संवाद साधण्याची संधी सोडू नये. इंग्रजीत साधी आणि सोप्या वाक्यांमध्ये उत्तरे दिली तरी ते प्रभावी ठरू शकतात. मात्र ज्यांना इंग्रजीमध्ये मुलाखत देणे अशक्य वाटते त्यांनी मराठीत दिली तरी चालते.

### यशाची सूत्रे

यशाची विशेष सूत्रे मी सांगणार नाही फक्त एवढेच सांगेन की मी परिश्रम घेतले, अभ्यासाचा आनंद घेतला आणि यश मिळाले. स्पर्धा परीक्षेची तयारी करणाऱ्या उमेदवारांना एवढेच सांगेन की परीश्रम घेण्याची तयारी ठेवा. आपण खूप कुशाग्र बुद्धिमत्तेचे असायला पाहिजे असेही नाही. कठोर परिश्रम घेण्याची तयारी असेल तर शहरी अथवा ग्रामीण भागातील कुठल्याही विद्यार्थ्याला या परीक्षेत यश मिळवणे अवघड नाही. फक्त आधी आपण या परीक्षेची तयारी का करतोय, सर्व अडचणींना सामोरे जाण्याची, परिश्रम घेण्याची आपली तयारी आहे का या प्रश्नांची उत्तरे आपल्याकडे हवीत.

### चुका सुधारणे आवश्यक

पूर्व, मुख्य परीक्षा व मुलाखतीची तयारी करताना यापूर्वी परीक्षा व तयारी दरम्यान झालेल्या चुका आपल्याला ओळखता यायला हव्यात व त्या सुधारल्या जाणे आवश्यक असते. चुका न सुधारता येणं हे अपयशाचं व नैराश्याचं मुख्य कारण आहे. शिवाय या परीक्षेचा यशाचा टक्का विचारात घेता आपल्याकडे प्लॅन-बी तयार असायला हवा. कारण दोन तीन प्रयत्नांनंतर नैराश्य येणे ही सामान्य बाब आहे. मात्र करीअरसाठी प्लॅन-बी तयार असेल तर अशा नैराश्यापासून, ताणापासून आपण दूर राहू शकतो.

**शब्दांकन : राजाराम देवकर**

### सोशल मीडियाचा वापर

स्पर्धा परीक्षेच्या तयारीदरम्यान सोशल मीडियाचा वापर आपण कसा करतो यावर त्याचे फायदे-तोटे ठरतात. आपण फेसबुकचा वापर केला नाही मात्र व्हाट्सॲपचा आवश्यकतेनुसार वापर केला. व्हॉट्सॲपवर मी काही स्टडी ग्रुपला जॉइन होतो. त्यामुळे बऱ्याच गोष्टींची अपडेट्स, माहिती ग्रुपवर मिळत असे. या माध्यमांची उपयुक्तता किती आहे हे आपले आपण तपासायला हवे. फक्त अभ्यासात व्यत्यय येणार नाही याची काळजी घ्यायला हवी. इंटरनेटचा वापर माहिती मिळवण्यासाठी करता येतो.



# महाराष्ट्र लोकसेवा आयोग
## Maharashtra Public Service Commission

मुख्य कार्यालय : ५½ ७ व ८ वा मजला, कुपरेज टेलिफोन निगम इमारत, महर्षि कर्वे मार्ग, कुपरेज, मुंबई ४०००२१ दूरध्वनी-२२७९५९०० फॅक्स:२२८८०५२४
फोर्ट कार्यालय : बँक ऑफ इंडिया इमारत, ३ रा माळा, फोर्ट, मुंबई ४००००१ दूरध्वनी :२२६७०२१०/१५८/२४८,२२१०२२२२, फॅक्स : २२६७३११६

ई-मेल – sec.mpsc@maharashtra.gov.in वेबसाईट - www.mpsc.gov.in, https://mahampsc.mahaonline.gov.in


## राज्य सेवा पूर्व परीक्षा - २०२०

**क्रमांक :एडीव्ही ३११६/सीआर-६९/२०१९/तीन** **जाहिरात क्रमांक : १९/२०१९**

महाराष्ट्र शासनाच्या विविध विभागांतर्गत खालील संवर्गातील एकूण २०० पदांच्या भरतीकरीता महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत **राज्य सेवा पूर्व परीक्षा-२०२०, रविवार, दिनांक ५ एप्रिल, २०२० रोजी महाराष्ट्रातील ३७ जिल्हा केंद्रांवर घेण्यात येईल** :-

| प्रवर्ग | अ.जा. | अ.ज. | वि.जा. (अ) | भ.ज. (ब) | भ.ज. (क) | भ.ज. (ड) | इ.मा.व. | वि.मा.प्र. | सा. व शै. मागासवर्ग | आ.दु.घ. | एकूण मागासवर्गीय | खुला | एकूण पदे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **(१) सहायक राज्यकर आयुक्त, गट-अ (एकूण १० पदे)** | | | | | | | | | | | | | |
| पदसंख्या | १ | -- | -- | -- | १ | -- | १ | -- | १ | १ | ५ | ५ | १० |
| रिक्त जागांचे प्रवर्गनिहाय सामाजिक/समांतर आरक्षणाचे विवरणपत्र खालीलप्रमाणे आहे :- | | | | | | | | | | | | | |
| सर्वसाधारण | १ | -- | -- | -- | १ | -- | १ | -- | १ | १ | ५ | ३ | ८ |
| महिला | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | २ | २ |
| **(२) उपमुख्य कार्यकारी अधिकारी/गट विकास अधिकारी, गट-अ (एकूण ७ पदे)** | | | | | | | | | | | | | |
| पदसंख्या | १ | -- | १ | १ | -- | -- | २ | -- | १ | १ | ७ | -- | ७ |
| रिक्त जागांचे प्रवर्गनिहाय सामाजिक/समांतर आरक्षणाचे विवरणपत्र खालीलप्रमाणे आहे :- | | | | | | | | | | | | | |
| सर्वसाधारण | १ | -- | १ | १ | -- | -- | १ | -- | १ | १ | ६ | -- | ६ |
| महिला | -- | -- | -- | -- | -- | -- | १ | -- | -- | -- | १ | -- | १ |
| **(३) सहायक आयुक्त/प्रकल्प अधिकारी, श्रेणी-२, गट-अ (एकूण १ पद)** | | | | | | | | | | | | | |
| पदसंख्या | १ | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | १ | -- | १ |
| रिक्त जागांचे प्रवर्गनिहाय सामाजिक/समांतर आरक्षणाचे विवरणपत्र खालीलप्रमाणे आहे :- | | | | | | | | | | | | | |
| सर्वसाधारण | १ | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | १ | -- | १ |
| **(४) उद्योग उप संचालक, तांत्रिक, गट-अ (एकूण १ पद)** | | | | | | | | | | | | | |
| पदसंख्या | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | १ | १ |
| रिक्त जागांचे प्रवर्गनिहाय सामाजिक/समांतर आरक्षणाचे विवरणपत्र खालीलप्रमाणे आहे :- | | | | | | | | | | | | | |
| सर्वसाधारण | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | १ | १ |
| **(५) सहायक संचालक, कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता, गट-अ (एकूण २ पदे)** | | | | | | | | | | | | | |
| पदसंख्या | -- | -- | -- | -- | -- | -- | १ | -- | -- | -- | १ | १ | २ |
| | | | | | | | | | | | | | |
| सर्वसाधारण | -- | -- | -- | -- | -- | -- | १ | -- | -- | -- | १ | १ | २ |
| **(६) उपशिक्षणाधिकारी, महाराष्ट्र शिक्षण सेवा, गट-ब (प्रशासन शाखा) (एकूण २५ पदे)** | | | | | | | | | | | | | |
| पदसंख्या | ३ | १ | -- | १ | -- | -- | ३ | -- | ३ | ३ | १४ | ११ | २५ |
| रिक्त जागांचे प्रवर्गनिहाय सामाजिक/समांतर आरक्षणाचे विवरणपत्र खालीलप्रमाणे आहे :- | | | | | | | | | | | | | |
| सर्वसाधारण | २ | १ | -- | १ | -- | -- | २ | -- | २ | २ | १० | ७ | १७ |
| महिला | १ | | -- | -- | -- | -- | १ | -- | १ | १ | ४ | ३ | ७ |
| खेळाडू | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | १ | १ |
| दिव्यांग | एकूण पद १ - अंधत्व किंवा क्षीणदृष्टी | | | | | | | | | | | | |
| **(७) कक्ष अधिकारी, गट-ब (एकूण २५ पदे)** | | | | | | | | | | | | | |
| पदसंख्या | ५ | २ | १ | -- | २ | १ | ४ | -- | ३ | ३ | २१ | ४ | २५ |
| रिक्त जागांचे प्रवर्गनिहाय सामाजिक/समांतर आरक्षणाचे विवरणपत्र खालीलप्रमाणे आहे :- | | | | | | | | | | | | | |
| सर्वसाधारण | ३ | १ | १ | -- | १ | १ | ३ | -- | २ | २ | १४ | ३ | १७ |
| महिला | २ | १ | -- | -- | १ | -- | १ | -- | १ | १ | ७ | १ | ८ |
| दिव्यांग | एकूण पद १ - चलनवलन विषयक विकलांगता किंवा मेंदूचा अर्धांगवायू | | | | | | | | | | | | |
| **(८) सहायक गट विकास अधिकारी, गट-ब (एकूण १२ पदे)** | | | | | | | | | | | | | |
| पदसंख्या | २ | १ | -- | -- | १ | -- | ५ | -- | २ | १ | १२ | -- | १२ |
| रिक्त जागांचे प्रवर्गनिहाय सामाजिक/समांतर आरक्षणाचे विवरणपत्र खालीलप्रमाणे आहे :- | | | | | | | | | | | | | |
| सर्वसाधारण | १ | १ | -- | -- | १ | -- | ३ | -- | १ | १ | ८ | -- | ८ |
| महिला | १ | -- | -- | -- | -- | -- | २ | -- | १ | -- | ४ | -- | ४ |

| | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **(९) सहायक निबंधक सहकारी संस्था, गट-ब (एकूण १९ पदे)** | | | | | | | | | | | | | |
| पदसंख्या | २ | २ | -- | -- | -- | २ | २ | -- | २ | २ | १२ | ७ | १९ |
| रिक्त जागांचे प्रवर्गनिहाय सामाजिक/समांतर आरक्षणाचे विवरणपत्र खालीलप्रमाणे आहे :- | | | | | | | | | | | | | |
| सर्वसाधारण | १ | २ | -- | -- | -- | १ | २ | -- | १ | १ | ८ | ५ | १३ |
| महिला | १ | -- | -- | -- | -- | १ | -- | -- | १ | १ | ४ | १ | ५ |
| खेळाडू | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | १ | १ |
| दिव्यांग | एकूण पद १ - स्वमग्नता (Autism) /मंदबुध्दी किंवा आकलन क्षमतेची कमतरता (Intellectual Disability)/विशिष्ट शिक्षण अक्षमता (specific learning disability)/मानसिक आजार (mental illness)/बहिरेपणा व अंधत्वासहबहुदिव्यांगता (multiple disability) | | | | | | | | | | | | |
| **(१०) उप अधीक्षक, भूमी अभिलेख, गट- ब (एकूण ६ पदे)** | | | | | | | | | | | | | |
| पदसंख्या | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | १ | १ | ५ | ६ |
| रिक्त जागांचे प्रवर्गनिहाय सामाजिक/समांतर आरक्षणाचे विवरणपत्र खालीलप्रमाणे आहे :- | | | | | | | | | | | | | |
| सर्वसाधारण | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | १ | १ | ३ | ४ |
| महिला | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | २ | २ |
| **(११) उप अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, गट- ब (एकूण ३ पदे)** | | | | | | | | | | | | | |
| पदसंख्या | -- | -- | १ | -- | -- | -- | १ | -- | -- | -- | २ | १ | ३ |
| रिक्त जागांचे प्रवर्गनिहाय सामाजिक/समांतर आरक्षणाचे विवरणपत्र खालीलप्रमाणे आहे :- | | | | | | | | | | | | | |
| सर्वसाधारण | -- | -- | १ | -- | -- | -- | १ | -- | -- | -- | २ | १ | ३ |
| **(१२) सहायक आयुक्त राज्य उत्पादन शुल्क, गट-ब (एकूण १ पद)** | | | | | | | | | | | | | |
| पदसंख्या | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | १ | १ |
| रिक्त जागांचे प्रवर्गनिहाय सामाजिक/समांतर आरक्षणाचे विवरणपत्र खालीलप्रमाणे आहे :- | | | | | | | | | | | | | |
| सर्वसाधारण | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | १ | १ |
| **(१३) कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन अधिकारी, गट-ब (एकूण ४ पदे)** | | | | | | | | | | | | | |
| पदसंख्या | -- | १ | -- | -- | -- | -- | १ | -- | १ | -- | ३ | १ | ४ |
| रिक्त जागांचे प्रवर्गनिहाय सामाजिक/समांतर आरक्षणाचे विवरणपत्र खालीलप्रमाणे आहे :- | | | | | | | | | | | | | |
| सर्वसाधारण | -- | १ | -- | -- | -- | -- | १ | -- | १ | -- | ३ | १ | ४ |
| **(१४) सहायक प्रकल्प अधिकारी / संशोधन अधिकारी व तत्सम, गट-ब (एकूण ११ पदे)** | | | | | | | | | | | | | |
| पदसंख्या | २ | १ | -- | -- | -- | -- | २ | -- | १ | १ | ७ | ४ | ११ |
| रिक्त जागांचे प्रवर्गनिहाय सामाजिक/समांतर आरक्षणाचे विवरणपत्र खालीलप्रमाणे आहे :- | | | | | | | | | | | | | |
| सर्वसाधारण | १ | १ | -- | -- | -- | -- | १ | -- | १ | १ | ५ | ३ | ८ |
| महिला | १ | -- | -- | -- | -- | -- | १ | -- | -- | -- | २ | १ | ३ |
| **(१५) नायब तहसिलदार, गट-ब (एकूण ७३ पदे)** | | | | | | | | | | | | | |
| पदसंख्या | ८ | ४ | -- | १ | २ | २ | २० | २ | ९ | ७ | ५५ | १८ | ७३ |
| रिक्त जागांचे प्रवर्गनिहाय सामाजिक/समांतर आरक्षणाचे विवरणपत्र खालीलप्रमाणे आहे :- | | | | | | | | | | | | | |
| सर्वसाधारण | ५ | ३ | -- | १ | १ | १ | १३ | १ | ५ | ५ | ३५ | ११ | ४६ |
| महिला | २ | १ | -- | -- | १ | १ | ६ | १ | ३ | २ | १७ | ५ | २२ |
| खेळाडू | १ | -- | -- | -- | -- | -- | १ | -- | १ | -- | ३ | १ | ४ |
| अनाथ | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | १ | १ |

**२.** जाहिरातीत नमूद केलेल्या अटींची पुर्तता करणा-या उमेदवारांकडून ऑनलाईन पध्दतीने अर्ज मागविण्यात येत आहेत.

**३.** प्रस्तुत जाहिरातीमध्ये परीक्षेसंदर्भातील संक्षिप्त तपशील दिलेला आहे. अर्ज करण्याची पद्धत, आवश्यक अर्हता, आरक्षण, वयोमर्यादा, शुल्क, निवडीची सर्वसाधारण प्रक्रिया, परीक्षा योजना, अभ्यासक्रम, इत्यादीबाबतच्या सविस्तर तपशीलासाठी आयोगाच्या www.mpsc.gov.in तसेच https://mahampsc.mahaonline.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आलेल्या माहितीचे व सविस्तर जाहिरातीचे कृपया अवलोकन करावे.

**४.** ऑनलाईन अर्ज https://mahampsc.mahaonline.gov.in या संकेतस्थळाद्वारे **दिनांक २३ डिसेंबर, २०१९ ते १३ जानेवारी, २०२०** या कालावधीतच सादर करणे आवश्यक राहील.

ठिकाण : मुंबई
दिनांक : २३ डिसेंबर, २०१९

उप सचिव, परीक्षा पूर्व
महाराष्ट्र लोकसेवा आयोग.

# फुलपाखरांचे बारसे

**देशात आढळून येणाऱ्या १५०० आणि महाराष्ट्रात आढळून येणाऱ्या २७९ फुलपाखरांची नावे इंग्रजीत आहेत. ही नावे मराठीत का असू नयेत असा विचार करून राज्य जैवविविधता मंडळाचे अध्यक्ष श्री. विलास बर्डेकर आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी फुलपाखरांच्या इंग्रजी नावांचे मराठीकरण केले.**

**डॉ. सुरेखा मुळे**

नीलवंत हे नाव तुम्हास ठाऊक आहे का? निलवंत हे ब्ल्युमॉरमॉन या राज्य फुलपाखराच्या प्रजातीला दिलेले मराठी नाव असून, हे नामकरण महाराष्ट्र राज्य जैवविविधता मंडळाचे अध्यक्ष विलास बर्डेकर आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी केले आहे.

देशात आढळून येणाऱ्या १५०० आणि महाराष्ट्रात आढळून येणाऱ्या २७९ फुलपाखरांची नावे इंग्रजीत आहेत. ही नावे मराठीत का असू नयेत असा विचार करून श्री. बर्डेकर आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी फुलपाखरांच्या इंग्रजी नावाचे मराठीकरण केले. यातूनच त्रिमंडळ, तरंग, मनमौजी, यामिनी, रुईकर, रत्नमाला, तलवार, पुच्छ, गडद सरदार, भटक्या, मयुरेश, नायक यासारखी आकर्षक मराठी नावे फुलपाखरांच्या वेगवेगळ्या प्रजातींना देण्यात आली. अशा प्रकारचा हा देशातील पहिलाच प्रयोग ठरला आहे. मराठी नावांमध्ये फुलपाखराचे रूप दडलेले असले पाहिजे, ते लोकांना आपले वाटले पाहिजे या सगळ्या बाबींचा त्यात विचार करण्यात आला. मग पाच प्रकारात फुलपाखरांची नावे मराठीत आणण्यात आली. यात फुलपाखराचा रंग, रूप, पंख याचा विचार झाला. त्यातून त्रिमंडल, तरंग सारखी नावे पुढे आली. नामकरण करण्यासाठी फुलपाखरांच्या सवयी, त्यांचे पंख उघडण्याची, मिटण्याची लकब, बसण्याची पद्धत याचा विचार करण्यात आला. त्यातून मनमौजी सारखे नाव ठेवले गेले.













फुलपाखरांना मराठी नाव देण्यासाठी ज्या वनस्पतींचा त्यांना खाद्य म्हणून उपयोग होतो त्यातून यामिनी, रुईकर ही नावे पुढे आली. गवतावर बसणाऱ्या फुलपाखराचे नाव 'तृणासुर' करण्यात आले. फुलपाखरांच्या अधिवासाचाही यात विचार करून त्यातून रत्नमाला हे नाव ठेवण्यात आले.

नीलवंती, तलवार, पुच्छ गडद सरदार, भटक्या, मयुरेश, नायक यासारखी नावे फुलपाखरांच्या दिसण्यावरून ठेवण्यात आली. यामफ्लाय फुलपाखरांची खाद्य वनस्पती आहे म्हणून त्याचे नाव यामिनी ठेवण्यात आले. ग्रास डेमन या फुलपाखराचे नाव तृणासुर असे रूपांतरित झाले. ब्ल्यूओकलिफ नावाच्या फुलपाखराचे नीलपर्ण नावाने बारसे झाले.

जैवविविधता बोर्डाच्या मंडळींनी फक्त फुलपाखराचेच मराठीत नामकरण केले असे नाही तर त्यांनी त्यांचे कूळही मराठीत आणले. म्हणजेच निम्फालिडी या फुलपाखरू कुळाचे नाव कुंचलपाद असे झाले. हेस्पिरिडीचे चपळकूळ झाले तर लायसनेडीचे नीळकूळ झाले. अशाच पद्धतीने पुच्छ, मुग्धपंखी, कूळ अस्तित्वात आले. राज्यातील फुलपाखरे आणि त्यांची मराठी नावे याची माहिती देणारे पुस्तक उत्तम छायाचित्रांसह वन विभागाने नुकतेच प्रकाशित केले आहे.

**विभागीय संपर्क अधिकारी**

# महामानवाला अभिवादन



चैत्यभूमी येथे महापरिनिर्वाणदिनानिमित्त डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन करताना राज्यपाल भगत सिंह कोश्यारी, विधानसभा अध्यक्ष नाना पटोले, मुख्यमंत्री उद्धव ठाकरे आदी.



परळ येथील 'बीआयटी' चाळीत असणाऱ्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस अभिवादन करताना विधानसभा अध्यक्ष नाना पटोले, मुख्यमंत्री उद्धव ठाकरे आदी.

R.N.I.No. 14140/57/Postal Registration No. MCS-072/2018-20
Posted at Mumbai Patrika Channel Sorting Office, From 12th to 17th Every Month
Date of Publication : 10th of Every Month

# देशातील सर्वाधिक खपाचे मासिक




सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

# लोकराज्य

अधिकृत आणि अचूक माहिती

'एबीसी'ने उमटवली अधिकृत मोहोर

## लोकराज्य (मराठी)

## ६,२९,७९२

अन्नदाता (तेलुगू)
३,४३,३६६

वनिता (मल्याळम)
३,४०,९८०

गृहलक्ष्मी (हिंदी)
३,०४,२०३

मल्याळम मनोरमा (मल्याळम)
२,४१,१९३

माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, महाराष्ट्र शासन

Visit: www.mahanews.gov.in | Follow Us: /MahaDGIPR | Like Us: /MahaDGIPR | Subscribe Us: /MaharashtraDGIPR

प्रति / TO

O.I.G.S. भारत सरकार सेवार्थ
लोकराज्य LOKRAJYA

*If undelivered, please return to:*

प्रेषक / From

अनिल आलूरकर
उपसंचालक (प्रकाशने), माहिती व जनसंपर्क महासंचालनालय
लोकराज्य शाखा, ठाकरसी हाऊस, २रा मजला, मुंबई पोर्ट ट्रस्ट, पोर्ट हाऊसजवळ, शुरजी वल्लभभाई मार्ग, बेलार्ड इस्टेट, मुंबई - ४०० ००१

लोकराज्य हे मासिक महाराष्ट्र शासनाच्या वतीने मुद्रक व प्रकाशक अनिल आलूरकर, उपसंचालक (प्रकाशने), माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई यांनी मे. मुद्रण प्रिंट एन पॅक प्रा.लि., ए-१८०/४, टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७०३ येथे मुद्रित करून माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२ येथे प्रसिद्ध केले.
मुख्य संपादक: ब्रिजेश सिंह